प्रख्यात

महापंडित, तत्त्ववेत्ता, सगुणभक्त, व कवि

वामनपंडित.

ह्याचें

चरित्र, ग्रंथ व काव्यसंबंधी गुणदोष,

आणि

त्याची व मोरोपंताची कवितासंबंधानें तुलना.

यांविषयीं

बाळकृष्ण मल्हार हंस वकीलकृत

निबंध

(ज्याबद्दल पुणें दक्षिणा प्राइज कमिटीकडून इनाम मिळालें असे)

मुंबईत-

" निर्णयसागर छापखान्यांत छापिलें "

इस १८८४

Price Rupees four

कैलासवासी

तीर्थस्वरूप

रा० रा० नारो मल्हार हंस त्रिडकर

यांची

आत्मनिष्ठा, सगुणभक्ति, सात्विकवृत्ति, बंधुप्रीति,

इत्यादि सद्गुण स्मरून

हे पुस्तक

त्यांच्या भावानें

त्यांस

कृतज्ञतापूर्वक अर्पण केलें आहे.

ग्रंथकर्ता.

प्रस्तावना.

वामनपंडित हें नांव विशेषेंकरून महाराष्ट्र लोकांत काशीपासून रामेश्वरापर्यंत गाजत आहे. ह्या प्रचंड विद्वानाच्या विशाल कीर्तीचे अत्यंत शुभ्र किरणच असे, त्याचे शतशः ग्रंथ चोहींकडे पसरले असून, ते जगांतील अज्ञानतमास दूर करीत आहेत. अशा पुरुषाचें चरित्र व कृत्य अवलोकन करण्याची इच्छा प्रत्येक जिज्ञासूस होणें साहजिक आहे. तशांत याच पुरुषाचें चरित्र आणि ग्रंथ यांजविषयीं कोणी निबंध लिहिला व तो पसंत ठरला तर इनाम दिलें जाईल, अशी पुणें एथील दक्षिणा प्रैज् कमिटीनें जाहिरात प्रसिद्ध केली. हें पर्व पाहून मी वामनपंडिताच्या ग्रंथोदधींत मज्जन केलें, आणि यदृच्छेनें जो मुक्ताफळांचा लाभ झाला त्यांचा निबंध करून तो त्या कमिटीपुढें ठेविला. त्याचा त्या कमिटीनें सादर स्वीकार केल्यामुळें, तो विद्वज्जनांच्या अनुग्रहास पात्र आहे असें अनुमान करण्यास जागा झाली.

या निबंधांत, वामनपंडिताचें उपलब्ध चरित्र, त्याच्या ग्रंथांचें सामान्य स्वरूप, त्याच्या ग्रंथांचे गुणदोष, आणि त्याची व मोरोपंताची, ग्रंथरचना आणि कवित्वशक्ति या संबंधानें तुलना, अशा विभागांनीं विवेचन केलें आहे.

श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर सरकार ह्यांच्या नीतिमान् राजछायेखालीं, परमेश्वरकृपेनें आनंदांत कालक्रमण होत असतां, पुणें येथील दक्षिणाप्रैज् कमिटीच्या उदार उत्तेजनानें माझ्या हातून, तुकाराम, मोरोपंत, वामनपंडित, रामदास, एकनाथ आणि ज्ञानेश्वर या प्रत्येक साधुकवींवर एक याप्रमाणें सहा निबंध निर्माण झाले. यांपैकीं तुकाराम व मोरोपंत यांजवरील निबंध यापूर्वी छापून प्रसिद्ध झाले असून, सांप्रत वामनपंडितावरील निबंध मुद्रणद्वारा लोकसमूहाच्या अनुग्रहार्थ सादर पुढें केला आहे.

इंदुर तारीख ६ आगस्ट
सन १८८४ इसवी.

ग्रंथकर्त्ता.

श्रीः

वामनपंडित.

वाटे सूक्तिश्रवणें मस्तक वाल्मीकिनेंहि डोलविला।
प्रभुनें भुलवाया मन वामन हा वेणुसाचि बोलविला॥
मोरोपंत.

या अखंडदंडायमानकालांत अविनाश व विमल यश संपादन करण्याकरितां, सहस्त्रावधि कविजनांनीं अपरिमित परिश्रमानें बुद्धिवैभवाचा अतोनात व्यय करून, ग्रंथमिषानें आपल्या चिरस्थायी मानसमूर्त्तीच जगांत ठेविल्या आहेत. संसारांतील नानाप्रकारच्या त्रासांनीं चित्त उदास झालें असतां त्यास महाकवींच्या वचनामृतपानासारखी आनंदजनक विश्रांति दुसरी कोणती आहे! रसिक कवींचें काव्य वाचीत असतां आपण नव्याच आनंदसृष्टींत आहों असें वाटूं लागतें.

ह्या कविसृष्टीचें वर्णन काव्यप्रकाशांत केलें आहे तें असें:—

नियतिकृतनियमरहितां ह्लादैकमयीमनन्यपरतन्त्राम्।
नवरसरुचिरां निर्मितिमादधती भारती कवेर्जयति॥ १॥

ह्या दृष्टसृष्टीशीं काव्यसृष्टीची तुलना करून, काव्यसृष्टीचा उत्कर्ष वरील पद्यांत किती मनोहर रीतीनें वर्णन केला आहे!!

• सृष्टिसौंदर्य, आकाश, नक्षत्रें, सूर्य, चंद्र, समुद्र, पर्वत, मानसव्यापार ह्यांच्या अवलोकनानें चमत्कारिक

कल्पना उत्पन्न होणें हा मनुष्यस्वभाव सर्व काळीं व सर्व देशीं दिसून येतो. यामुळें सर्व भाषांत आनंद व विश्रांति होण्याच्या हेतूनें कविता केलेल्या आढळतात. संस्कृतादि प्रगल्भ, प्राचीन आणि पूर्णत्वास पोहोंचलेल्या भाषांतून तर काव्याची रेलचेल होऊन गेली आहे. कविता हा केवळ मनोरंजनाचाच विषय आहे असें नाहीं, कवितेपासून अनेक लाभ आहेत.

काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये ।
सद्यःपरनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशयुजे ॥

काव्यप्रकाश.

या कारणास्तव काव्यावर मोठमोठाले शास्त्रग्रंथ बनले व सहस्त्रावधि विद्वानांचीं आयुष्यें कविता रचण्यांत आणि तत्संबंधी शास्त्रें बनविण्यांत खर्च झालीं आहेत.

सरासरी[१] ७०० वर्षांपूर्वीं महाराष्ट्रभाषेंत कोणी क-

---

१ मुकुंदराज यास मराठी भाषेचा आद्य कवि मानितात. तो सरासरी बाराशें वर्षांपूर्वीं झाला असें म्हणतात, परंतु यास कांहीं आधार नाहीं; म्हणून जुन्या नवनीताच्या आरंभीं जो कवींविषयीं निबंध आहे त्यांत म्हटलें आहे, व भरतखंडाचा अर्वाचीन कोश या नांवाच्या पुस्तकांत, मुकुंदराजास होऊन ६६८ वर्षें झालीं असें म्हटलें आहे. या दोहोंतून कोशांतील लेख अधिक प्रमाणभूत आहे असें दिसतें. तथापि उपलब्ध महाराष्ट्र कवींत मुकुंदराज हाच जुनाट आहे याविषयीं कांहीं विवाद नाहीं. यास्तव सांप्रत उपलब्ध असलेली माहितीच प्रमाणभूत मानून चाललें पाहिजे. मुकुंदराजाच्या ग्रंथाची भाषा चांगली शुद्ध व प्रौढ मराठी आहे. यावरून तो होता त्या काळीं विद्वान् लोक या भाषेचा पुष्कळ उपयोग करित होते, व त्या योगानेंच ती इतकी सुधारली होती हें खास अनुमान आहे. तेव्हां मुकुंदराजापूर्वींही अनेक विद्वानांनी व कवींनीं महाराष्ट्रभाषेंत

विताग्रंथ लिहिलेला आढळत नाहीं. त्या आलीकडील काळांत बरेच ग्रंथकार झाले आहेत. पण त्या सर्वांचा वर्णनीय विषय ईश्वरभक्ति, वैराग्य, मोक्ष इत्यादि परमार्थसाधनाचा बहुतकरून असल्यामुळें परलोक साधक अशा वृद्धलोकांच्या समाधानास मात्र तो पात्र झाला आहे. वस्तुतः ज्यांनीं नुकताच विषयानुभव घेण्यास आरंभ केला आहे, ज्यांचे कामक्रोधादि विकार केवल बाल्यावस्थेंत असून शृंगारादि रससेवनाविषयीं जे आ पसरून बसले आहेत, अशा तरुणजनसमूहास शृंगारादि रसांनीं पूरित असें काव्यामृत पान करण्यास मिळण्याची त्यापासून आशाच नको. हिंदुस्थानांत व विशेषेंकरून महाराष्ट्रभाषेंतील ग्रंथकारांत पारलौकिक विचार करणारेच पुष्कळ[१] झाले, व एकानें जें केलें तें

अनेक ग्रंथ लिहिले असतील; परंतु छापखाना, राजाश्रय, शांतता यांचा अभाव इत्यादि गैरसोईमुळें, राज्यांच्या भयंकर व निरंतरच्या घडामोडीमुळें,मुसलमानांचे जुलमी अंमल व त्या योगानें देशाची दुर्दशा इत्यादि कारणांनीं तशा जुन्या ग्रंथांचा मागमूसही उरला नसावा असें वाटतें. वस्तुतः महाराष्ट्रभाषा अति जुनाट आहे असा तर्क होतो.

१ थोड्या काळापूर्वी होऊन गेलेल्या मराठे राज्यकर्त्यांच्या हकीकतीच्या बखरी मराठी भाषेंत लिहून ठेविलेल्या काव्येतिहाससंग्रह नांवाच्या मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध होत असतात. त्यांतील वर्णन तपशीलवार व सत्य रीतीनें केलेलें दिसतें. त्यांत अतिशयोक्ति नाहीं. तरी ह्या तपशीलवार लिहिलेल्या बखरी सरासरी चालू शतकांत किंवा गेल्या शतकाच्या अखेरीसच लिहिल्या गेल्या आहेत. यास्तव वामनपंडिताविषयीं विचार करीत असतांना मराठी भाषेंत त्या वेळीं लौकिकविषयावर बहुतकरून ग्रंथ लिहिले जात नव्हते, असें म्हणावयास कांहीं हरकत दिसत नाहीं.

पाहून तसेंच दुसरा, तिसरा, याप्रमाणें करूं लागले; यामुळें ईश्वरप्राप्तीच्या हेतुहून अन्य प्रकारचें शृंगारादि वर्णन ज्यांत केलें आहे असे गद्यपद्यात्मकग्रंथ करण्याची कल्पना कोणाच्या मनांत आली नसावी. अथवा ईश्वरगुणवर्णनावांचून काव्यादि ग्रंथ करणें फार गौणकृत्य आहे अशा समजुतीवर ते कोणी केले नसावे असें वाटतें.

वामनपंडित व त्याच्या पूर्वीं होऊन गेलेले महाराष्ट्र ग्रंथकार यांतून कोणाच्याही विचारांत परलोकसाधनाखेरीज दुसरें तत्त्व सांपडत नाहीं. फार तर काय, पण भारत, रामायणांतील अनेक रसयुक्त धीरोदात्त पुरुषांचीं चरित्रें महाराष्ट्रकवींनीं गाइलीं नसतीं तर महाराष्ट्र लोकांत जी थोडीबहुत वीरश्री आढळून येत्ये तिचें बीजही राहिलें नसतें असें आह्मांस वाटतें. आतां हीं चरित्रेंही परलोकसाधन ह्मणूनच कवींनीं रचिलीं आहेत; तथापि चरित्रसंबंधानें शृंगारवीरादि रस, नीतिशास्त्र व तर्कशास्त्र ह्यांचा त्यामध्यें अनायासें संग्रह झाला आहे. असो.

महाराष्ट्रभाषेंत मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम, वामनपंडित, मुक्तेश्वर, श्रीधर, मोरोपंत, रघुनाथपंडितप्रभृति जे ग्रंथकार व कवी झाले; त्यांतून मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम, रामदास, यांस तर ईश्वरी अवतार व जीवन्मुक्त मानितात, व बाकीच्या ग्रंथकारांत वामनपंडित ब्रह्मनिष्ठ असून श्रीधरादि मुमुक्षु होते असें दिसतें. ज्ञानेश्वरादिकांतील अवतारकल्पना सोडून पाहिलें तर वामनपंडित हा सर्वांत अग्रगण्य दिसतो. कारण आत्मज्ञान, वै-

राम्य आणि भक्ति या संबंधानें वामनाची योग्यता फा-रच मोठी असून, संस्कृतभाषाभिज्ञत्व आणि शास्त्राध्ययन यांत तर त्याच्या तुलनेस कोणीच ग्रंथकार लागत नाहीं. याशिवाय त्याचें कवित्व सरस आहे असें मोरोपंतानें ह्मटलें आहे:—

“सगुण श्रीहरिभक्त ख्यात ज्ञात्याजनांत हा शुकसा ॥
“बहुजन्मसिद्ध ऐसा साधेल सुपक्व योग आशु कसा ॥२॥
“केली श्रीगीतेची व्याख्या बहुभक्ति जींत गाजविली ॥
“साजविली साधुसभा भाषाकविकवनशक्ति लाजविली ९
“अन्यत्र नसे कवनीं यावे रस सर्व हा नियम कांहीं ॥
“केली भाषा कवि जे त्यांची तों गर्वहानि यमकांहीं॥१॥
“ यान्या सद्रसभवनें कवनें तो नाचलाचि नाकपी ॥

वामनपंडितस्तुति.

“ नमिला साष्टांग श्रीपतिभक्तिरसज्ञ वामनस्वामी ॥
“ रसभवना तत्कवना मानी या तेंवि वाम न स्वामी ॥

सन्मणिमाला.

वामनपंडित हा महाराष्ट्रभाषेंतील अक्षरगणांच्या छ-न्दांनीं कविता रचणारा आद्य कवि इसवीच्या सतराव्या

१ विठ्ठल कवीनें महाराष्ट्रभाषेंत अक्षरगणानीं कविता रचिलेली आढळते. तिची समाप्ति वामनपंडित मरण पावल्यानंतर सुमारें एक वर्षानें व चार वर्षांनी झाली आहे असें खालील पद्यावरून दि-सतें. “ आनदाब्दकशालिवाहनशके (१५९६) षण्णन्द बाणक्षमा । मा-साचा नृप मार्गशीर्षक महा बोले कवीसत्तमा ॥ श्रीमत्कौशिकगोत्र वस्ति-नगरी गौरीपुरी जाणिजे । मुख्यस्थानक बीड नीड तरफे मध्यें नृपें राहिजे ॥ ६६ ॥ ‘मिद्रुक्मिणिचें स्वयंवरनिकें संपूर्ण हें वाचिजे ।

शतकांत झाला. वामनानें आपलें वृत्त किंवा कुलवृत्तांत पृथक्‌पणें लिहून ठेविला नसून भीष्मयुद्ध व प्रियसुधा या प्रकरणांच्या शेवटीं त्यानें आपली जी माहिती जाणविली आहे ती फारच थोडी आहे. तिजवरून कालनिर्णय किंवा स्थलनिर्णय मुद्धां होत नाहीं. याशिवाय दुसऱ्यानेंही कोणी स्वतंत्रपणें वामनपंडिताचें चरित्र लिहिलेलें आढळत नाहीं. यामुळें या कवीचें चरित्र समजण्यास कांहींच साधन नाहीं. आपल्या देशांत मोठमोठाल्या चक्रवर्तीराजांचाही असावा तसा इतिहास लिहून ठेवण्याची पूर्वी चाल नव्हती, या कारणानें गतकालाकडे दृष्टि दिली तर, महाघोरांधकारांत कोठें कोठें मंद मंद लिकलिकणारे दिवे व काजवे चमकतात अशीं कांहीं महापुरुषांचीं सूक्ष्मवृत्तें मात्र आढळतात. दिनमणीसारख्या तेजस्वी राजांची जर इतिहाससंबंधानें ही दशा, तर मग आमच्या कविमणीचा तेथें इतिहास नाहीं ह्याचें कांहींच आश्चर्य नाहीं.

आतां वामनाविषयीं त्यानें स्वतः किंवा दुसऱ्यानें कोणीही लिहून ठेविलेलें वृत्त जरी आढळत नाहीं, तरी वामनाला मरून सगसरी २०५ वर्षें झालीं असून,

ऋग्वेदोत्तम आश्वलायन महा शाखाध्यायी जाणिजे ॥ वर्णी विठ्ठल दुग्धसागरकुलालंकारचूडामणी । पद्यें प्राकृत सपसर्ग तिनशें त्रेपन्न चिंतामणी ॥६७॥ रुक्मिणीस्वयंवर ॥ स्वस्तिश्री नृपशालिवाहनशके (१५९९) त्र्याण्णवू पंधरा । अब्दा पिंगल चैत्रशुद्ध नवमी श्लोकांकसंख्या धरा ॥ श्रीषट्कें शिवनेत्र श्लोकरचना संपूर्ण झाली कथा । वक्तासत्कविराज विठ्ठल ह्मणे दोषाक्षमानान्यथा ॥ ४६ ॥ सीतास्वयंवर सर्ग ७, यावरून वामनपंडितास श्लोकांचा आद्यकवि ह्मणण्यास हरकत येत नाहीं.

त्याचें ग्रंथभांडारं निर्मल, दिव्य व पुष्कळ कवितारत्नांनीं भरलेलें आपणापुढें आहे. त्या भांडाराचा या देशांतील साधारण वक्त्यांच्या व रसिकजनांच्या वाणीस अलंकृत करण्यांत पुष्कळ उपयोग होत आला आहे; या कारणानें त्या कविरत्नाकराविषयीं रसिकजनांकडून कांहीं तरी माहिती मिळेल असें वाटतें; परंतु शोधाअंतीं तोही तर्क निष्फल होऊन जातो. यास्तव वामनाच्या ग्रंथांतील उल्लेखावरून व दंतकथांवरून जेवढें त्याचें वृत्त समजतें तेवढेंच येथें दर्शित करण्याखेरीज दुसरा इलाज नाहीं.

वामन हा सातारा जिल्ह्यांतील कोरेगांव कुमठें एथला जोशी होता. हा जातीचा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. ह्याच्या बापाचें नांव नृहरिपंडित, आईचें नांव लक्ष्मीबाई आणि बायकोचें नांव गिरीबाई. ह्याचें गोत्र शांडिल्य व कुलदैवत नृसिंह होतें.

वामनपंडिताविषयीं दंतकथा अशी आहे कीं, त्यानें संस्कृतभाषेचा अभ्यास करून काशीस शास्त्राध्ययन पुष्कळ केलें व वादविवाद करून पुष्कळ पंडितांस जिंकिलें. हा महापंडित वादविवादांत अजिंक्य होता. एके दिवशीं सायंकाळीं अश्वत्थाच्या पारावर एकटाच निश्चल बसला असतां त्यानें अश्वत्थावरील ब्रह्मराक्षसांचा चमत्कारिक संवाद श्रवण केला तो:—पहिला

१ ताताभिधा नृहरिपंडित मायलक्ष्मी । दे सर्वदा सुगुणयुक्त उदारलक्ष्मी ॥ शांडिल्यगोत्र कुळदैव नृसिंह ज्याचा । दासानुदास निजवामन हो निजाचा ॥ २१ ॥

वामन, भीष्मयुद्ध.

ब्रह्मराक्षस दुसऱ्यास ह्मणूं लागला कीं, मला अश्वत्थाच्या या खांदीवर बसावयास जागा दे, तेव्हां दुसरा ह्मणाला, या खांदीवर बसण्याची तुझी योग्यता नाहीं व माझीही नाहीं, कांतर एथें वामन ह्मणून मोठा पंडित आहे त्यानें वादविवादांत पुष्कळ पंडितांस जिंकिलें आहे, तो मरण पावला ह्मणजे मोठा ब्रह्मराक्षस होईल; त्याच्या योग्यते-प्रमाणें त्याला बसण्याकरितां जागा पाहिजे ह्मणून ही ठेविली आहे. असे शब्द ऐकतांच वामनास अनुताप हो-ऊन उपरति झाली. तेव्हां त्यानें विचार केला कीं, इतकी मेहनत करून इतकें शास्त्राध्ययन केलें, वादविवादांत अजिंक्य झालों, त्याचें फल केवळ गर्वानें व भूतद्रोहानें इतकें दुष्ट होणार आहे; त्यापक्षीं इतःपर वादविवाद करण्याचें सोडून भगवत्पदीं लीन व्हावें, व ईश्वरगुण वर्णन करण्यांत कालक्षेप करावा हेंच उत्तम आहे असा त्यानें दृढ निश्चय केला.

ही दंतकथा खरी आहे किंवा खोटी आहे ह्याचा विचार करण्याचें येथें कांहीं कारण नाहीं, तथापि या चालत आलेल्या कथेपासून आमच्या महापंडिताविषयीं लोकांचा काय अभिप्राय होता हें चांगलें काढतां येतें. वादविवाद करून दुसऱ्यास जिंकणारे महापंडित नेहमीं क्रोध आणि गर्व ह्यांचें अधिष्ठान असतात, व तमोगुणाच्या आश्रयानें राहणारे लोक अधोगतीस जातात हें शास्त्रप्रसिद्धच आहे. अर्थात् वामनपंडितास ब्रह्मराक्षसयोनि प्राप्त होण्याचा संभव त्या वेळीं लोकांनीं मानिला होता असें वाटतें. दुसरें वामनपंडित हा संस्कृतभाषेंत व शास्त्रांत अप्रतिम विद्वान् होता हेंही दिसतें.

वामनपंडितास उपरति झालीच होती, त्यानंतर परमवैराग्यशील रामदासस्वामी यांचा त्यास समागम झाला. तेव्हांपासून महाराष्ट्रभाषेंत लोकोपयोगी काव्य करण्यास त्यानें आरंभ केला. त्याच्या कवितेंत यमकांचा भरणा अतिशय असल्यामुळें रामदासस्वामींनीं त्याचें नांव " यमक्यावामन " ठेविलें होतें असें ह्मणतात.

वामनपंडिताविषयीं संतविजयग्रंथांत खालीं लिहिल्याप्रमाणें गोष्ट लिहिली आहे:—

महान् विख्यात प्रतापादित्य छत्रपति शिवाजीमहाराज ह्यांजला राज्याभिषेक करणारे वेदशास्त्रसंपन्न गागाभट्ट आणि वामनपंडित असे उभयतां एके समयीं तुकारामबावाच्या कीर्तनास गेले होते. त्या समयीं रामदासस्वामीही तेथेंच होते. तुकारामाच्या निस्पृह व सरस वक्तृत्वानें हरिकीर्तनास मोठा रंग आला असून तुकारामाच्या मुखांतून श्रुत्यर्थाचाही अनुवाद तेथें होत होता. तुकाराम हा जातीचा वाणी असून श्रुत्यर्थ बोलतो व आपण ब्राह्मणांनीं तें व्याख्यान श्रवण करावें हें अगदीं उचित नाहीं, असें गागाभट्टास वाटून त्यानें ती गोष्ट त्या हरिकीर्तनप्रसंगीं प्रदर्शित केली; तेव्हां त्याविषयीं त्याच प्रसंगीं वामनपंडितानें श्रुतिप्रमाणासह समाधान केलें तें:—

वेदींही हरिकीर्तनींच महिमा केला असे आदरें ।
कोठेंसा तरि विष्णुसूक्त अववें शोधोनि पाहा बरें ॥
त्या मध्येंच तृतीय वर्गिहि 'भवानुमित्रो' असे त्या पहा ।
त्यामध्यें तिसरी ऋचा तव 'तमुस्तोतार' नामें पहा ॥१॥

जयाची वदे पूर्ण वेदार्थ वाणी ।
ह्मणावें कसेंहो तयालागिं वाणी ॥
परब्रह्मरूपी असा हा तुका वा ।
तयाचे तुकीं कोण दूजा तुकावा ॥ २ ॥

मयूराचे आंगी विपुल नयनाळजें निलमनी ।
परी एके दृष्टीविण समुळ ती व्यर्थ दिसती ॥
तशी नानाविद्या जपतपव्रतें वैभवकळा ।
कळा त्या जाणाव्या हरिगुरुकृपेवीण विकळा ॥ ३ ॥

आत्मा जगज्जीवन वामनाचा ।
जो सोहळा नित्य नवा मनाचा ॥
नामामृतें ग्रंथ कली करीतो ।
नामें जना तारक लोकरी तो ॥

यांतील पहिल्या दोन पद्यांत हरिकीर्तनमहत्त्व व तुकाराममहत्त्व वर्णिलें असून तिसऱ्या पद्यांत, हरिकृपेचें महत्त्व दाखवून, केवळ विद्याकला मात्र जाणतो, परंतु अभक्त आहे अशाचें विडंबन व हरिभक्त अतएव हरिकृपापात्र अशा तुकारामाचें मंडन इंगित केलें आहे.

या गोष्टीवरून वामनपंडिताची भगवन्निष्ठा, समदृष्टि, साधुत्व, निरहंकृति इत्यादि सद्गुण जागृत होते असें दिसतें. वस्तुतः पंडित म्हटला म्हणजे संस्कृताचा व वेदांचा मोठा अभिमानी, प्राकृतभाषेस व प्राकृतलोकांस आणि विशेषेंकरून शूद्रादिकांस तर अगदीं कसपटाप्रमाणें तुच्छ मानणारा, व गर्वमदाची केवळ मूर्तिच असा असतो; परंतु वामनपंडित हा तसा नव्हता. तो आत्मा-

नुभवानें लीन झाल्यामुळें समदर्शन, शांति, तितिक्षा इत्यादि अमूल्यगुणांचा त्यास स्वाभाविक लाभ झाला होता. ब्राह्मणांनींच वेदार्थ सांगावा, इतर जातीस तो अधिकार नाहीं; तसेंच वंशपरंपरेनें ब्राह्मणांस झालेली संतति ब्राह्मणच, मग तिचे गुण चांडालासारखे असले तरी ब्राह्मणत्वास न्यूनत्व येत नाहीं; व एकाद्या शूद्रांत जरी ब्राह्मणाचे निर्मलगुण वसत असले तरी त्याचें शूद्रत्व दूर होत नाहीं. ही समजूत सांप्रतही प्रबल आहे. तेव्हां वामनाच्या वेळीं ती किती प्रबल असेल याचें सहज अनुमान करितां येतें. अशा स्थितींत वामनानें अशा प्रबलमतास दूर झोंकून दिलें !! व पंडितांची व इतर स्वजातीयांची भीति न धरितां त्यानें आपलें सत्यमत प्रकट केलें हें त्याचें कांहीं सामान्य धैर्य नव्हे.

ईश्वरगुणवर्णनाशिवाय लोकवार्तेचें काव्य करणें निरर्थक आहे अशी वामनाची समजूत होती. ईश्वरानें हरिकथेचा छंद आपल्या मनास लावून दिला हें आपलें मोठें भाग्य आहे असें तो मानित होता. ज्या काव्यांत मनुष्याच्या उद्देशानें शृंगारादिरसात्मक वर्णन असतें त्या काव्याचें व तें रचणाऱ्याचेंही विडंबन पंडितानें केलें आहे.

करी धन्य गोपाळजी वामनातें ।
कथाछंद लावूनि त्याच्या मनातें ॥
महाभाग्य हें अन्यथा काव्यरीति ।
वृथा ज्या कवी लोकवार्ता करीती ॥ ४४ ॥

वेणुसुधा.

काव्यांत ज्या कुनर आणि अपूत नारी ।
वर्णूनि वर्णिति जयांत न पूतनारी ॥
तें काकतीर्थचि कदापि न मानसाच्या ।
हंसाचिया रमति हो गति मानसाच्या ॥ २५ ॥

उष्टीं धुतां अन्न न काय सांचे ।
गर्ताजळीं त्या मग वायसांचे ॥
समूह धाती न कदापि जाती ।
त्या काकतीर्थाप्रति हंसजाती ॥ ३७ ॥

उच्छिष्ट ताटांतिल अन्न सांचे ।
धृतां जळीं त्या मग वायसांचे ॥
समूह तें घेउनि तृप्त जाती ।
न पाहति ते शुकहंसजाती ॥

धनाकारणें जे पराधीनवाणी ।
कवी नाचवीती वृथा दीनवाणी ॥
अहो त्यांत अन्योन्य उच्छिष्ट सारें ।
कवित्वें जना वाटती तीच सारें ॥ ३९ ॥

वामन, द्वारकाविजयसर्ग २.

कितीएक तत्त्ववेत्ते पंडित काव्याला तुच्छ मानितात; "रंडागीतानि काव्यानि" असे त्यांचे नेहमी उद्गार निघत असतात. दुसरें, "काव्यालापांश्च वर्जयेत्" अशी एक स्मृतिही आहे. तेव्हां वामनपंडितानें मनुष्यपर काव्य करणाऱ्यांस जें दूषण दिलें आहे तें निराधार नाहीं.

ईश्वरगुण वर्णन करणें हा काव्यालाप नाही ही गोष्ट

श्रुतीसही मान्य आहे. यास्तव केवळ ईश्वरगुण वर्णन करण्याचाच वामनानें दृढ निश्चय केला होता व त्याच्या वैराग्यशील, प्रगल्भ आणि विस्तृत अंतःकरणास तो भूषणभूत व आनंदजनक झाला असें दिसतें.

वामनाचें चित्त निरंतर ब्रह्मविचारांत निमग्न असे. त्यानें श्रीकृष्णलीला मोठ्या प्रेमानें वर्णन केली आहे तरी तींत मधून मधून त्याचा ब्रह्मविचार प्रस्फुरत असलेला दिसतो. इहलोकसंबंधी विषय क्षणभंगुर व तुच्छ, सर्व विश्व ईश्वरमय व ईश्वर विश्वमय आहे, आपला आत्माच ईश्वर आहे; ईश्वरास जलाची उपमा योजिल्यास विश्व हें तरंगाप्रमाणें समजावें. असे विचार वामनाच्या मनांत नेहमी घोळत होते, असें त्याच्या ग्रंथांवरून दिसतें.

वामनानें प्रियसुधानामक लहानसा उपदेशग्रंथ आपल्या पत्नीसाठीं रचिला असें त्यांतील शेवटच्या पद्यावरून दिसतें.

प्रियसुधा उपदेश गिराप्रती ।
करुनि वामन तीस ह्मणे मनी ॥
परम आवडि आपुलि आपणा ।
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ॥ १८ ॥

प्रियसुधा.

जगदुत्पत्तिस्थितिलयहेतु असा एक निर्गुण निराकार ज्ञानानंदमय ईश्वर आहे असें पंडितानें सर्वत्र मानिलें आहे; तरी सगुण अवतारांस ईश्वर मानून त्याच्या भक्तिरसांत आनंदानें मग्न झालेलाही तो सर्वत्र आढळतो.

याविषयींच्या प्रमाणास पंडितांचे ग्रंथचे ग्रंथ भरले अ-
सून मोरोपंतानेंही ह्मटलें आहे कीं:—

" सगुण श्रीहरिभक्त ख्यात ज्ञात्याजनांत हा शुकसा"

" श्रीपतिभक्तोत्तम जो गावा तद्रूप वामनस्वामी "

वामनपंडितस्तुति.

" नमिला साष्टांग श्रीपतिभक्तिरसज्ञ वामन स्वामी "

सन्मणिमाला.

पंडितानें केलेल्या ग्रंथांत जागोजागीं ते ग्रंथ ईश्वरानें रचिले आहेत असा उल्लेख आढळतो; व भागवतधर्म आचरण करणाऱ्या मनुष्यास जी गति होते ती आपणास प्राप्त झाली आहे असेंही तो मानित होता असें दिसतें. " ऐसा नामसुधा ह्मणोनि रचिला श्रीवल्लभें ग्रंथ
" हा ॥ सर्वात्मा हरि वामनाननमिसें जें बोलिला तें
" पहा ॥ जे हा वर्णिति आयकोनि धरिती भावार्थ त्या
" सज्जना ॥ होती भागवती गती कलियुगीं नामें ज-
" शी वामना ॥ "

नामसुधा.

आतां "वामना" हें गतीचें विशेषण होऊन ग्रंथकाराच्या नांवाचें चतुर्थीचें रूपही होतें; यावरून भागवतीगति आपणास झाली असें वामन मानित होता, हा अर्थ वैकल्पिक वाटतो; तथापि आपलें नांव ग्रंथाच्या शेवटीं प्रदर्शित करण्याची वामनाची चाल आहे तिला अनुसरून "वामना" हें पद ग्रंथकर्त्यानें आपलें नांव दाखविण्याकरितांच घातलें आहे असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. आणि आपण मुक्त झालों अशी अन्यत्रही वामनाची उक्ति आढळते. यावरून आपणास भागवती-

गति झाली असें दाखवून, आपण अवलंबिलेल्या मार्गानें लोकांनीं चालावें असा मृदुबोध त्यानें केला आहे असें दिसतें.

निगमसारग्रंथांत वामनानें असें लिहिलें आहे कीं, मी ब्रह्म आणि आत्मा यांच्या ऐक्याविषयीं विचार केला; तेव्हां सत् आणि चित् पदांच्या संबंधानें आत्म्यास ब्रह्मता प्राप्त होते हें मला समजलें; परंतु आनंदपदाचा संबंध समजला नाहीं. यास्तव मी विचारांत पडलों. इतक्यांत संन्याशाच्या रूपानें ईश्वर प्रकट झाला आणि त्यानें माझ्या मनांतील सर्व शंका दूर केल्या व सर्व उपनिषदांचें सार समजावून दिलें.

"सांख्य योग वेदांत ॥ तिन्ही शास्त्रांचा सिद्धांत ॥
" श्रुतिमुखें दोहीं मुहूर्तांत ॥ उपदेशिला ॥ " सांख्यें
"आत्मत्व निर्धार ॥ योगें वृत्तिशून्यसाक्षात्कार ॥ सा-
" कार तितुकें निराकार ॥ वेदांत गुह्य ॥ " सांख्य-
" योगावांचुनी । शुष्क वेदांतें करूनी । तत्त्वसिद्धि नव्हे
" ह्मणूनी ॥ सांगितलें रहस्य."

निगमसारग्रंथ समाप्त झाल्यावर वामनपंडित फार दिवस जगला नाहीं. तो, कृष्णातीरीं वांई क्षेत्राजवळ पांडववाडी ह्मणून गांव आहे, तेथें शके १५९५ वैशाख शुद्ध ६ या दिवशीं वारला. त्याच्या शिष्यांनीं त्याच्या पादुका अद्यापि संभाळून ठेविल्या आहेत व त्यांची ते पूजा करीत असतात असें ऐकण्यांत आहे.

काव्येतिहाससंग्रह नांवाच्या मासिक पुस्तकांत वाम-

---

१ जुन्या नवनीतांतील निबंध.

नपंडिताचें वृत्त दिलें आहे तें:—" काशींत बारा वर्षे
" शास्त्राध्ययन केल्यावर वामनपंडित इतका विद्वान्
" झाला कीं, खुद्द आपल्या गुरूचाही वादांत पराजय
" करण्याची त्यास शक्ति आली. नंतर तेथून निघून
" घरीं परत येत असतां वाटेंत इंद्रायणीनदीचे कांठीं
" एके दिवशीं उतरला. तेव्हां एथें आजपर्यंत लो-
" कांस वादांत हटवून त्यांचा उपमर्द केल्याबद्दल आप-
" णास ब्रह्मराक्षसयोनी प्राप्त होणार असें एका राक्ष-
" साचे द्वारें त्यास समजलें. तेणेंकरून फार खिन्नता
" प्राप्त झाल्यामुळें पश्चात्ताप पावून लागलाच निघाला,
" तो त्या वेळीं तुकाराम अळंदीस गेला होता त्याजकडे
" जाऊन अनुग्रह करण्याविषयीं त्याची विनंती केली.
" तेव्हां तुकारामानें त्यास रामदास स्वामींकडे जावयास
" सांगितल्यावरून त्यांजकडे गेला. त्यांनीं बदरि-
" काश्रमीं जाऊन तपश्चर्या करण्याची आज्ञा केली.
" तदनुरूप तेथें बारा वर्षें तपश्चर्या करून ईश्वरप्रसाद
" पावल्यावर पुनः स्वामींकडे आला. तेव्हां त्यांनीं
" श्रीशैल्यपर्वतावर अवधूत ह्मणून एक साधु होता त्या-
" जकडे जावयास सांगितलें. त्याप्रमाणें त्या साधू-
" जवळ कांहीं काळ राहून तो समाधिस्थ झाल्यावर परत
" स्त्रीसहवर्तमान येत असतां एके ठिकाणीं दोनप्रहरीं
" मुक्कामास उतरून स्नानसंध्यादि नित्यकर्मे आटोप-
" ल्यावर सत् चित् व आनंद या तीन पदांचे अर्थावि-
" षयीं विचार करीत समाधि लावून बसला. इकडे
" स्त्री गिरीबाई इनें भाताचें भांडें चुलीवर चढविलें होतें,
" त्यावरील झांकण सरकलें. परंतु वैष्णवांचे विलक्षण

" चालीप्रमाणें वामन आपल्या बायकोच्या हातचें जे-
" वीत नसल्यामुळें तिला तें नीट करितां येईना. त्या-
" मुळें ती किंचित् हंसली तेवढ्यावरूनच अनुताप हो-
" ऊन तेव्हांपासून तो आपल्या बायकोचे हातचें जेवूं
" लागला. पुढें रामदासस्वामींकडे येऊन त्यांच्या
" दासबोधग्रंथाचें पारायण करीत असतां वामनास एक
" शंका आली. तिचें समाधान स्वामींनीं केलें. तथापि
" वामनाचा संशय जाईना. तेव्हां आपलें रुद्रस्वरूप
" प्रकट करून शेंपूट आपटून स्वामींनीं विचारिलें,
" वामना " समस्या पूर्ण झाली कीं नाहीं" तेव्हां तो
" त्या उग्रस्वरूपास भिऊन होय ह्मणाला. पुढें पूर्ववत्
" सौम्यस्वरूप धारण केल्यावर तोच प्रश्न विचारितां
" वामन " शंका गेली नाहीं " असें ह्मणाला. तेव्हां
" त्यास तोच विषय बृहदारण्यकांत आहे तो वाचावयास
" सांगितला. त्याचे योगानें त्याच्या संशयाचें निरा-
" करण झालें. पुढें स्वामींच्या आज्ञेवरून तो प्राकृत-
" काव्य रचना करूं लागला."

या काव्येतिहाससंग्रहांतील चरित्रांत कांहीं विरोध दिसतो. कारण वामनानें निगमसारग्रंथांत सच्चिदानंद-पदार्थाविषयीं शंका आल्याचें, व ईश्वरानें परमहंसरूपानें येऊन समाधान केल्याचें स्वतां लिहून ठेविलें आहे; तो ग्रंथ प्राकृत (महाराष्ट्र) भाषेंत असून त्यांतील समाप्तिशकावरून तो वामनाचा शेवटचाच ग्रंथ आहे, त्यानंतर तो फार दिवस वांचलाच नाहीं असें दिसतें. आणि वरील चरित्रांत, एकदा सच्चिदानंदपदाविषयीं वामन विचार करीत होता व दुसऱ्या वेळीं त्यास एक

शंका आली तिचें समाधान झालें; इतकें झाल्यावर पुढें रामदासस्वामींच्या आज्ञेवरून तो प्राकृत काव्यरचना करूं लागला असें ह्मटलें आहे. तेव्हां काव्येतिहास-संग्रहांतील चरित्रावरून, सच्चिदानंदपदार्थाविषयींची शंका निवृत्त झाल्यावर वामनानें प्राकृतकाव्यास आरंभ केला असें दिसतें. व वामनाच्या स्वतांच्या लेखावरून तो शेवटचा प्राकृतग्रंथ रचित असतांना त्याचें सच्चिदानंदपदार्थाविषयीं शंकासमाधान झालें असें होत आहे. यांतून वामनाचा लेख बलवत्तर आहे हें कोणीही कबुल करील.

दुसरें, रामदासस्वामींच्या संबंधानें वरील चरित्रांत जें अद्भुत लिहिलें आहे, त्याचाही उल्लेख वामनाच्या ग्रंथांत आढळत नाहीं. सच्चिदानंदपदार्थाविषयींच कोणाही महापंडितास शंका येणें संभवनीय असून, वामनास दुसऱ्या पदर्थाविषयीं शंका आल्याचें त्याच्या ग्रंथांवरून दिसत नाहीं. तेव्हां वरील चरित्रांत जी एक शंका ह्मणून मोघम लिहिलें आहे, ती सच्चिदानंदाविषयींच असावी असेंच मानिलें पाहिजे. जर वर लिहिलेली शंका समाधानाची गोष्ट रामदासस्वामींच्या संबंधानें घडली हें खरेंच असतें तर, जेथें वामनानें त्या गोष्टीचा विशेष विचार केला आहे, तेथें रामदासस्वामींचें नांव दाखविण्यास त्याजवळ गुरुभक्ति कमी होती काय ? असो.

याशिवाय "समस्या पूर्ण झाली कीं नाहीं ?" ह्मणून वरील चरित्रांत जो प्रश्न घातला आहे, त्यांतील पूर्वापरसंबंधावरून समस्या हा शब्द शंकेच्या अर्थी

घातल्याचें दिसतें. समस्या शब्दाचा पर्याय शंका न-सून, शंकेच्या अर्थी समस्या शब्दाचा प्रयोगही अभियुक्त ग्रंथांत आढळत नाहीं. "समस्यापूरण" हें काव्यकलें-तील एका प्रकाराचें नांव आहे. यावरून "समस्या पूर्ण झाली कीं नाहीं" हें काव्येतिहाससंग्रहांतील वाक्य अशुद्ध आहे असें सिद्ध होतें.

वामनपंडिताच्या काव्यादि ग्रंथांचे गुणदोष व का-व्यरचनेची शैली यांविषयीं विचार.—

वामनपंडिताच्या उपलब्धग्रंथांची याद या निबं-धाच्या शेवटीं जोडली आहे. तिजवरून ग्रंथसंख्या पु-ष्कळ आहे असें दिसतें; परंतु त्या मानानें त्यांत पद्य-संख्या पुष्कळ नाहीं. त्यांतूनही काव्यांत मोडण्या-सारख्या पद्यांची संख्या तर फारच कमी आढळून येते.

आंता काव्यग्रंथ कोणते व ज्यांस काव्यत्व नाहीं असे ग्रंथ कोणते, याविषयीं विचार केला तर, वामनाच्या अमुक ग्रंथास काव्यत्व नाहीं असें ह्मणतां येणार नाहीं; कारण कोणताही विषय मग तो तत्त्वविचाराचा कां अ-सेना, त्याचें प्रतिपादन करितांना वामनानें नानाप्र-कारच्या अलंकारांनीं शब्दार्थचमत्कृति केलेली बहुधा सर्व ग्रंथांत आढळते; व चमत्कृतिजनकत्व हेंच कवि-तेचें कार्य आहे; तेव्हां अशी चमत्कृति ज्या ग्रंथांत मधून मधून दृष्टीस पडते त्यांस काव्यग्रंथांतून वगळतां येणार नाहीं. बरें, पंडिताच्या सर्वच ग्रंथांस काव्यत्व आहे असें मानिलें तर केवळ तत्त्वविवेचनास काव्यांत गणिल्यानें काव्यलक्षणास बाध येईल. वास्तव पंडितानें रचिलेल्या ग्रंथांत, निर्दोष शब्दार्थ व गुणालंकार यांनीं

कल्पनाचमत्कृति जेथें जेथें उत्पन्न झाली आहे तें काव्य-स्थान आणि बाकी सर्व काव्येतर ग्रंथ होय असें मानावें.

दुसरें, पंडिताच्या ग्रंथांत आणखी एक्या प्रकारें तीन विभाग करितां येतात. (१) स्वतंत्र कल्पनेनें रचिलेले. (२) दुसऱ्या ग्रंथांच्या आधारावर रचिलेले.(३) दुसऱ्या ग्रंथावर टीकारूप. यांतून दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रकारच्या ग्रंथांची संख्या फार असून. पहिल्या प्रकारचे ग्रंथ फार थोडे आढळतात.

स्वतांच्या कल्पनेनें स्वतंत्र ग्रंथरचना करणें हें उत्तम बुद्धिवैभवाचें फल होय. व अशा स्वतंत्र ग्रंथांची संख्या, भाषेंत ज्या प्रमाणानें न्यूनाधिक असते त्या प्रमाणानें त्या भाषेची प्रगल्भता व विस्तीर्णता न्यूनाधिक असते. वामनाच्या पूर्वीं महाराष्ट्रभाषेंत ग्रंथसंख्या बरीच वाढली आहे असें दिसतें तरी त्यायोगें तिचें प्रागल्भ्य वाढलें नाहीं व विस्तारही ह्मणण्यासारखा झाला नाहीं.

स्वतांच्या कल्पनेनें स्वतंत्र ग्रंथ रचण्याचें अतिमहत्त्व वामनाच्या पूर्वींही लोक मानित होते. भगवद्गीतेवर केलेली ज्ञानेश्वरी टीका ज्ञानदेवानें, आपला ज्येष्ठबंधु निवृत्तिनाथ यास दाखविली, तेव्हां त्यानें मुकुंदराजाच्या स्वतंत्र ग्रंथांची स्तुति करून, टीकाग्रंथ करण्यांत काय पुरुषार्थ आहे ! असें ह्मटलें. त्यावरून ज्ञानदेवानें अमृतानुभव नांवाचा दुसरा स्वतंत्र ग्रंथ केला अशी आख्यायिका आहे.

वामनापूर्वींच्या कविवृंदांनीं ग्रंथद्वारा महाराष्ट्रभाषेचें दारिद्र्य यथाशक्त्या दूर केलें होतें. पण तिची

स्थिति चांगली सांवरली नव्हती. ती उणीव वामनाच्या वाणीनें बरीच दूर केली. वामनानें लहान लहान तत्त्वज्ञानाचींच परंतु स्वतंत्र अशीं बरींच प्रकरणें रचिलीं. संस्कृतभाषेंतील छंदाप्रमाणें महाराष्ट्रभाषेंत छंद उतरण्याचा मनोहर उद्योग केला. तत्त्वजिज्ञासु व भक्तिमान् या दोन्ही वर्गांतील लोकांस आनंद व विश्रांति होण्यासारखे वामनानें आपले सर्व ग्रंथ रचिले आहेत. आमच्या देशांतील वक्ते ह्मणजे हरिकीर्तन करणारे गोसांवी ह्यांच्या कीर्तनांतील रंगदेवतेस दिव्यतेज, तारुण्य, सौंदर्य, आणि सुकुमारता देण्याकरितांच वामनानें आपला काव्यसुधाब्धि निर्माण केला असें ह्मटलें तरी चालेल. यावरून महाराष्ट्रभाषेवर व अर्थात् लोकांवरही वामनाचे फार उपकार झाले आहेत हें उघड दिसतें.

वामनाच्या प्रत्येक ग्रंथाच्या आरंभीं बहुतकरून परमात्म्याम वंदनरूप मंगलाचरण केलेलें आढळतें. ही गोष्ट पंडितानें वृद्धपरंपरेनें ग्रहण केली असावी अथवा पंडित मोठा भगवन्निष्ठ होता यास्तव कोणत्याही कामास प्रवृत्त होतांना भगवच्चरणीं लीन व्हावें हें त्यास स्वाभाविकच झालें होतें असेंही मानितां येईल. कसेंही असलें तथापि ग्रंथारंभीं मंगलाचरण करण्याचा संप्रदाय तत्त्वतः फार चांगला आहे असें आह्मास वाटतें. ग्रंथारंभीं मंगलाचरण केल्यानें ग्रंथास मंगलमुखता प्राप्त होते. तिजपासून ग्रंथ रचण्यास अथवा वाचण्यास आरंभ केल्याबरोबर कर्त्याच्या अथवा वाचकाच्या हृदयांत प्रेम आविर्भूत होऊन तो भक्तिमान् होतो.

दुसरें, भक्तिमान् झाल्यानें मनाच्या तामसादि वृत्ति

भावळून, सात्विकभाव उत्पन्न होऊं लागतात; यामुळें मन निर्मळ होऊन अंगांत मार्दव, माधुर्य, प्रसाद हे गुण सहज येतात.

तिसरें, अनंतकालानंतर अशा ग्रंथांच्या अवलोकनानें, प्राचीनकालीं ईश्वरभक्ति कितपत जागृत होती हें समजण्यास साधन होतें. याशिवाय ईश्वराविषयीं कृतज्ञता व पूज्यत्वबुद्धि प्रकट केल्यानें अंशतः कृतार्थ झाल्याचा निर्मलानंदही होतो.

याप्रमाणें मंगलाचरणापासून पुष्कळ हित आहे यांत कांहीं संशय नाहीं. आतां कित्येक नास्तिकमताचे अथवा अभक्तिमान्लोक, मंगलाचरण करणें हें कालाचा व्यर्थ व्यय करणें आहे असें कदाचित् मानितील; परंतु मनुष्य कितीही ज्ञानी असो तो भक्तिमान् नसेल तर त्याला कधीं समाधान होणार नाहीं. ह्या सिद्धांताप्रमाणें भक्तीचें लक्षण मनांत आणिलें म्हणजे मंगलाचरणांत जो ग्रंथकाराचा काल गेला तो कालाचा अत्यंत उपयोगी व्यय झाला असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं.

वामनाच्या कितीएक ग्रंथातील मंगलाचरणें एथें मासल्याकरितां दिलीं आहेत.

"वंदूनियां जलधिजापतिच्या पदातें ।
"वर्णीन त्या हरिचिया तनुसंपदातें ॥"

ध्यानमाळा.

वंदोनियां स्थिर-चरात्मक-वासुदेवा ।
ध्यानीं फणींद्र-शयनीं जगदात्मदेवा ॥

श्रीकर्मतत्त्व जनसत्व-विशुद्धकारी ।
दिव्यप्रबंध रचितों भव-बंध-हारी ॥

कर्मतत्त्व.

प्रथम वंदुनियां भगवत्तमा ।
मग तदात्मक भागवतोत्तमा ॥

गीतार्णव.

इंद्राचें पद दैत्यराज बळि तो विप्रप्रसादें हरी ।
तेव्हां कश्यपमंदिरीं अदितिच्या दिव्यव्रतें श्रीहरी ॥
झाला वामन मुंजि तेचि समयीं होतांचि भिक्षाछळें ।
सर्वस्व त्रिपदें हरी स्मर मना त्याचीं पदें कोमळें ॥

वामनचरित्र.

प्रियसुधा, शुकाष्टक, इत्यादि कितीएक प्रकरणें मंगलाचरण न करिताहि रचिलेलीं आढळतात.

वामनानें ग्रंथारंभीच वर्णन करावयाच्या कथाभागाचा सारांश थोडक्यांत सांगण्याचा पाठ ठेविला आहे.

ठेवूनि नंदसदनांत हरी स्वहातें ।
माया व्रजेशतनया निस ने गृहातें ॥
आणी अजा त्यजुनि अन्यगृहीं अजाला ।
तो बद्ध मागुति पहा वसुदेव झाला ॥

कृष्णजन्म.

स्वउदरांत चराचर मृत्तिका ।
पसरुनी मुख दाविल कौतुका ॥
प्रकट जो करि बाल्यकथारसा ।
नमिन त्या हरिच्या पदसारसा ।

मृत्तिकाभक्षण.

घरि नसोनिहि रज्जु भुजंगमा ।
धरि अशारिति जो स्थिरजंगमा ॥
उखळ-रज्जु तया प्रभुच्या कटीं ।
भ्रम हरी हरितो भवसंकटीं ॥

उखळबंधन.

स्वगति दे अनिदुष्ट अघासुरा ।
स्मर मना दृढ त्या अनघा सुरा ॥
प्रभु ऋणी जरि दे परमागती ।
स्वपद-दास्यचि ते नर मागती ॥

वनसुधा.

फणिफणावरि नृत्य करी हरी ।
प्रकृति जो भवबंध करी हरी ॥
त्रिभुवनीं जनि काननि दीसतो ।
स्मर मना प्रभु यामिनिदीस तो ॥
त्रिभुवनीं जगजीवन दीसतो ।
करि कृपा यमुनाख्यनदीस तो ॥
मथुनियां भुजगा अति काळया ।
दवडि तेथुनि दुर्मतिकाळया ॥

हरिविलास (कालियमर्दन).

वामनाच्या ग्रंथांचा विषय सगुणअवतारांच्या लीला, साधुचरितें, आणि अध्यात्मविद्या यांतून त्याचा अत्यंत प्रियविषय अध्यात्मविचार होय. त्यानें अध्यात्मविद्येवर पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. आत्मज्ञान विषय स्वभावतः दुर्बोध असतां त्यानें तो अनेक दृष्टांतांनीं सुबोध करून दाखविला आहे.

पंडिताच्या अध्यात्मविचाराच्या ग्रंथांत अग्रगण्य ह्मटला ह्मणजे यथार्थदीपिका हा टीकाग्रंथ होय. यांत भगवद्गीतेचा यथार्थभाव चांगल्या रीतीनें स्पष्ट करून दाखविला आहे.

यथार्थदीपिका ही टीका फार सुबोध आहे. हिची भाषा प्रौढ, सरल व सोपी असून, स्थलविशेषीं ती मनोरंजक झाली आहे, यामुळें तिला काव्यत्व ही आलें आहे. तत्त्वविचाराची एकादी गोष्ट श्रोत्याच्या मनांत ठसविण्याकरिता वामनानें केलेले उपमादृष्टांतादि अलंकार, यांत पुष्कळ ठिकाणीं चांगले साधले आहेत. त्याचा कांहीं मासला वाचकाकरिता एथें देतों. "जैसी राजपत्नी न
"वोढा मनोरमा ॥ मातृमुखें जाणोनि भर्तृमहिमा ॥ बै-
"सोनि अंकाहीं परमा ॥ जाउच पाहे उठोनी ॥ २१ ॥
"जों जो वाटे सलगी ॥ तों तों अधिक धरी पलंगीं ॥
"गोडी घेतां अंगसंगी ॥ ढकलिली तरी ढकलेना ॥२२॥
"तैसें चित्त घडीघडी ॥ अभ्यासीं घे स्वरूपाची गोडी॥
"स्थिरत्व बाणतां न सोडी॥ अनुभव तो आनंदाचा॥२३"॥

अध्या० ६ श्लोक १९.

"सूर्य न दिसे दिवांधासी ॥ तैसा ईश्वराचा सत्व-
"प्रकाश जीवासी ॥ न दिसे ते प्रकाशवंता चराचरासी ॥
"प्रकाशहीन अवलोकिती ॥ १ ॥ रोग नयनीं ज्याला ॥
"शुभ्र तिनुकें पिवळें दिसे त्याला ॥ तैसा प्रकाशरूप
"ईश्वर जीवाला ॥ दिसे प्रकाशरहित विश्वरूपें ॥"

अध्या० ११ श्लोक ११.

"आकाशीं उठे एकसरें ॥ सहस्र सूर्यांचें तेज बरें ॥

" तरी त्या विश्वमूर्त्तितेजासारखें होय खरें ॥ ह्मणोनि
" राया ह्मणोंये ॥"

अध्या० ११ श्लोक १२.

" बागुलाचें रूप कसें ॥ मातेस पुसे बाळ ऐसें ॥
" परी देखतां तें भयानक जसें ॥ रडों लागे ॥ ७२ ॥
" तैसें माझें रूप विकराळ ॥ कीं ज्यास ह्मणावें महा-
" काळ ॥ भयानक अति विशाळ ॥ भिशी ह्मणी हें
" सौम्यरूप विसरोनी ॥"

अध्या० ११ श्लोक ७.

" अजी हे वीर सकळ ॥ गिळिसि जाणों मुखीं अ-
" न्नाचे कवळ ॥ आणि लोकां समग्रातें जाणों तूं प्रबळ ॥
" चाटितोसि शाखा लोणचीं जन जैसे ॥ १२ ॥ भक्षी
" क्षुधित वाढिला भात ॥ आणि शाखावरि चहूंकडे चा-
" ळून हात ॥ सांबारीं रायतीं एकएक मुखांत ॥ घाली
" चाटी जन जे रितीं ॥ १३ ॥"

अध्या० ११ श्लोक ३०.

" अग्नी पेटला धडधडी ॥ त्यांत पतंग टाकिती
" उडी ॥ आपल्या नाशाकारणें आणि आवडी ॥ तैसे
" हे वीरलोक ही ॥ ६ ॥"

अध्या० ११ श्लोक २९.

" वासना नदीची धारा ॥ जन्ममरणप्रवाहीं नरा ॥
" सहज वाहवी विशेष वारा ॥ सुटला वेदोक्त काम्य-
" कर्माचा ॥ ९०० ॥"

अध्याय २.

" भूमीचवरी चाले जळ ॥ वाफे तेही भूमीच के-
" वळ ॥ श्रोते वक्ते तूंचि सकळ ॥ पूर्वानुसंधान त्याप्रति
" निरूपितों ॥ ११ ॥ तरी आत्मज्ञानाविण ॥ उगेचि

" भजती सगुण ॥ थोर त्यांहुनी निपुण ॥ अनुभवी नि-
र्गुणाचे ॥ ३७ ॥"

अध्याय ९.

" पिता पुत्राचे अपराध जैसा ॥ क्षमा करी सोसुनि
" तैसा ॥ अन्याय माझे जगन्निवासा ॥ सोसावया तूं
" योग्य ॥ ८४ ॥ कीं आह्मी अमतां बाळ ॥ पांडूस गि-
" ळितां झाला काळ ॥ तदारभ्य आमचा संभाळ ॥
" कोणे केला तुजविणें ॥ ८५ ॥ कंस मारिल्यावरी ॥
" आह्मी कैसे आहो हस्तिनापुरीं ॥ ह्मणूनि विचारा-
" यास ते अवसरीं ॥ अक्रूर मथुरेहुनी धाडिला
" ॥ ८६ ॥ तो सांप्रत पांडु मेला वनीं ॥ आह्मांस धृ-
" तराष्ट्रें आणवुनी ॥ गाईचीं वासरें व्याघ्रसदनीं ॥ ऐसें
" शासनीं स्वपुत्राच्या ठेविलें ॥ ८७ ॥ तदारभ्य आज-
" पर्यंत ॥ बापमाय तूंचि झालासि भगवंत ॥ सोसूनि
" अन्याय अत्यंत ॥ कृपा केली ॥ ८८ ॥"

अध्या० ११ श्लोक ४४.

ही टीका वामनासारख्या तत्त्वज्ञ महापंडितानें केली आहे, यामुळें हींत सर्वत्र तत्त्वविचारच प्रस्फुरत असेल असें वाटतें. परंतु ही टीका पाहिली ह्मणजे साधारण अ-नुमानाहून निराळेंच तिचें रूप दृष्टीस पडतें. तत्त्वविचा-रांच्या मीमांसेचा आणि भोळ्याभाविकांनीं ग्रहण करा-यास योग्य अशा भक्तीचा स्वभावतः विरोध असतां, आमच्या महापंडितांनीं आपल्या ग्रंथांत, भक्ति आणि मीमांसा ह्यांचीं आसनें एकमेकींच्या शेजारीं मांडून सिं-हासनाची योजना भक्तीकडेसच केली आहे. मोरोपंतानें या ग्रंथाविषयीं असें ह्मटलें आहे कीं,—

"केली श्रीगीतेची व्याख्या बहु भक्ति जींत गाजवि-
"ली ॥ साजविली साधुसभा भाषाकविकवनशक्ति ला-
"जविली" ॥ ९ ॥

वामनपंडितस्तुति.

सगुणभक्तीचें माहात्म्य नकळतां लोक भगवद्गीतेचा अर्थ करितात यामुळें त्यांजकडून चुका होण्याचा संभव आहे. तो अनर्थ टाळण्याकरितां भगवद्गीतेवर टीका करावी, असें माझ्या मनात पुष्कळ दिवस होतें; व शिष्यमंडळी, साधुसंत, योगी इत्यादि लोकांनींही सांगितलें कीं, जगास उपयोगी होईल अशी भगवद्गीतेवर टीका करावी. परंतु भगवान् श्रीकृष्ण अनुमोदन देईल तेव्हांच टीका करूं असा भाव धरून राहिलों. श्रीकृष्णाचें प्रत्यक्ष अनुमोदन दिसलें नाहीं. तथापि तोच बुद्धीचा प्रेरक आहे. तेव्हां टीका करण्याविषयीं जी आपल्या बुद्धीला प्रेरणा झाली हीच त्याची आज्ञा समजून टीकेला आरंभ केला; इत्यादि उद्देश ग्रंथारंभींच वामनानें दाखविला आहे:— "ब्रह्मविद्येचें वैभव ॥ ऐसा
"सगुणभक्तीचा अनुभव ॥ गीतेंत थोर हा अनुभव ॥
"सर्वत्र असे वर्णिला ॥ २५ ॥ ऐसें ब्रह्म तेंचि सगुण ॥
"ऐसा ज्ञाननिष्ठ भक्त निपुण ॥ भगवंत भागवत ऐसी
"खूण ॥ जेथें वेगळी न सापडे ॥ २६ ॥ सगुण ब्रह्म चराचर ॥
"गीतेंत या ज्ञानाचा आदर ॥ ह्मणूनि धर्म्यपद वारंवार ॥
"या ब्रह्मज्ञानीं योजिलें ॥ २७ ॥

"प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम्"

अध्याय ९.

"ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते"

अध्याय १२.

" अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः "

अध्याय १८.

"एवं ऐसें धर्म्यपद ॥ भगवान् बोले प्रतिपद ॥ याचा
" अर्थ विशद ॥ न बोलती कोणी ॥ २८ ॥ निर्धर्म ह्म-
" णजे निर्गुण ॥ सधर्म ह्मणजे सगुण ॥ धर्म्यपदें दावी
" खूण ॥ विश्वात्मज्ञानाची ॥२९॥ पुढें होईल विशद ॥
" जे ठायीं धर्म्यपद ॥ हें मंगलाचरणीं कृष्णपद ॥ स्म-
" रतां आठवे समग्र गीता ॥३०॥ याकारणें जी भगवंता॥
" यथास्थित हे तुझी गीता ॥ वाखाणावी ह्मणोनि होता ॥
" बहुतकाळ संकल्प ॥३१॥ आणि तुझ्या कृपेचे विभागी॥
" शिष्य संत भक्त योगी ॥ ते ह्मणती कीं जगदुपयोगी ॥
" ऐसी टीका करावी ॥३२॥ परंतु देवकीनंदन ॥ जेव्हां
" देईल अनुमोदन ॥ तेव्हांच करून त्यातें वंदन ॥ करी-
" न पोटीं हा भाव ॥३३॥ ते अनुमोदन दिसेना ॥ हृदयीं
" दाटली गीतार्थरचना ॥ बुद्धिप्रेरकाची मना ॥ तेचि आ-
" ज्ञा वाटली ॥ ३४ ॥ आत्माचि तूं निखळ ॥ जो बुद्धि
" प्रकाशी निर्मळ ॥ टीका आरंभीं केवळ ॥ तेचि आज्ञा वा-
" टली ॥३५॥ करूनि तुझें स्मरण ॥ ध्यानीं चिंतूनि च-
" रण ॥ आरंभिलें मंगलाचरण॥प्रथम ओवी संस्कृत॥३६॥
" विश्वरूपें करूनि स्मरण ॥ भगवत्पदें मंगलाचरण ॥
" सात ओवियां होतां पूर्ण ॥ आरंभिली ओवी आठवी
" ॥ ३७ ॥ ओवी लिहितां आठवी ॥ तुज गुरुरूपें आ-
" ठवी ॥ यतिरूपीं स्मरतां आठवी ॥ अवतारमूर्ति दिससी
" ॥३८॥ करीं वागोरे सारथी ॥ बैसला अर्जुनाचे रथीं ॥
" तोचि वामनमनोरथीं ॥ टीका करितोसी गोविंदा ॥३९॥"

"लक्षास मुख्य पाणी ॥ तैसी भक्तीपर तुझी वाणी॥गी-

"तेच्या अंतीं चक्रपाणी ॥ ऐसेंचि बोलिलासी ॥११५॥
"कोण्या मिसें तरी कोणी ॥ गीतार्थ अन्यथा वाखाणी ॥
"मज नावडे ती थोराची ही वाणी ॥ काय करूंजी श्री-
"कृष्णा ॥ ११६ ॥"

यावरून वामनपंडितानें भक्तीला केवढें महत्त्व दिलें आहे हें वाचकांच्या ध्यानीं येईल.

वामनपंडित संस्कृतभाषेंत पंडित होता. व तो होता त्या काळच्या लोकांच्या समजुतीप्रमाणें प्राकृतभाषेंत ग्रंथरचना करणें हें हलकट काम आहे असें पंडितजन समजत होते. असें असतां वामनानें प्राकृतभाषेवर आपली इतकी प्रीति प्रदर्शित केली आहे कीं, श्रुतिसम मानिलेली जी भगवद्गीता तिजवरील भाष्यामृत सांठविण्यास त्यानें प्राकृतपात्राची योजना केली व त्यांतही अगदीं प्राकृतांचा प्रवेश होण्यासारखी सुगमता व्हावी अशी तजविज ठेविली आहे.

" जेथोनि टीकेचा आरंभ ॥ तेथुनि गीतार्थ जो स्व-
"यंभ ॥ तो होय अत्यंत सुलभ ॥ शब्द ऐसे योजिनों २०"

यथार्थदी० अ० ९.

यावरून वामन मोठा दूरदर्शी, निरभिमानी व सत्यप्रिय होता असें म्हटलें पाहिजे. कारण, कोणत्याही विचाराचें महत्त्व संस्कृतादि भाषांच्या संबंधानें न्यूनाधिक होत नाहीं; तर प्रतिपादन करणाऱ्या मनुष्याच्या बुद्धिवैभवाप्रमाणें ते विचार सरस, निरस, उदात्त किंवा ग्राम्य होतात. सोन्यासारखी संस्कृतभाषा आहे पण तींत जर पोरकट किंवा बीभत्स विचार भरून ठेविले, तर संस्कृतभाषेमुळें त्यांस प्रौढी किंवा शालीनता येईल

काय ? येणार नाहीं. मग अमुक भाषा चांगली व अमुक वाईट असें मानणें वृथाभिमानास दाखवितें.

दुसरें, एकादा अतिमहत्त्वाचा विषय सर्व जगास समजावा आणि त्यायोगें जगदुपयोग व्हावा अशा औपकारक बुद्धीनें एकादी ग्रंथरचना करावयाची आहे तर, ती ज्या लोकांकरितां करावयाची त्यांच्या अति साधारण भाषेंतच केली पाहिजे. तेथें आपली विद्वत्ता दाखविण्याकरितां लोकांशीं जिचा फारसा परिचय नाहीं अशा भाषेची योजना करणें अप्रयोजक आहे.

इत्यादि कारणें मनांत आणून वामनपंडितानें जगदुपयोगी टीका महाराष्ट्रभाषेंत केली आहे. वामनपंडित मूळचा उत्तम संस्कृतज्ञ, अध्यात्मविद्या हा त्याचा अत्यंत आवडता विषय, आणि सगुणभक्तीवर त्याचें मनस्वी प्रेम, या योगानें यथार्थदीपिकेंत गीतार्थाचें उत्तम व्यक्तीकरण झालें आहे. ही टीका प्राकृतभाषा जाणणारे लोकांस यथार्थत्वानें, श्रुतिप्रमाणांनीं आणि चमत्कारिक कल्पनांनीं आनंददायिनी होते इतकेंच नाहीं; तर प्राकृतभाषेकडे पाहून नाक मुरडणारे संस्कृतज्ञ महापंडितांच्याही ती तसीच आनंदवर्धिनी आहे असें अनुभवास येतें.

कविचूडामणि मोरोपंत यानें भगवद्गीतेवर आर्याछंदांत लहानशी टीका केली आहे. तींत या व्याख्येविषयीं:—

" श्रीमद्भगवद्गीताव्याख्यानीं हृदयहारि-वचनांहीं ॥
"श्रीज्ञानदेव वामन पटु ऐसा अन्य मानवच नाहीं॥२॥"

असें म्हटलें आहे. याशिवाय चांगल्या आधारावरून

आह्मास समजलें आहे कीं, श्रीकाशीक्षेत्रीं सांप्रत जागेश्वर नामें मोठा पंडित आहे. त्यास संस्कृत उत्तम येत असून, अध्यात्मविचारांतही तो निष्णात आहे. त्याला अवलोकन करण्यास संस्कृतभांडारांत असंख्य ग्रंथरत्नें पडलीं असतां ती सर्व एकीकडे ठेवून, तो वारंवार ह्याच प्राकृतदीपिकेचें अवलोकन करितो, आणि ह्मणतो कीं गूढ गीतार्थाचें, यथार्थदीपिकेनें जसें प्रकाशन होतें तसें दुसऱ्या टीकांनीं होत नाहीं. अहाहा! या टीकेस यथार्थदीपिका हें नाम अन्वर्थक खरें !!!

सर्वच संस्कृतज्ञ न्यायदृष्टीनें यथार्थदीपिकेचें अवलोकन करितील, तर त्यांजलाही जागेश्वरपंडिताप्रमाणेंच तिची महती वाटेल यांत कांहीं संशय नाहीं.

भगवद्गीतेचा वास्तविक अर्थ दाखविणें व त्यांत निर्गुण सगुणाचें ऐक्य राखून भक्तिमाहात्म्य वाढविणें हे हेतु आपली शक्ति चालेल तेथपर्यंत वामनानें तडीस नेले आहेत. आतां त्याची टीका सर्वत्र मूळग्रंथाभिप्रायास धरून उत्तम साधली आहे, हें खरें आहे; तथापि चराचरमय विश्व आणि ईश्वर यांत अभेद आहे ही गोष्ट निरंतर त्याच्या मनात घोळत असल्यामुळें, टीका करितेवेळीं हेतूच्या उद्गाररूपानेंच जी व्याख्या बाहेर पडली, तिच्या योगानें ग्रंथाच्या सरल अर्थाहून भिन्न प्रकारें लांबलचक व्याख्यानही कोठें कोठें झालेलें आढळतें.

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ। माधवः पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ॥ १४ ॥

त्यानंतर ह्मणे संजय ॥ ज्यास यशवर्ण श्वेतहय ॥

त्या रथीं माधवमूर्ति द्वय ॥ पांडवही दिसे जनदृष्टी॥१९८॥ माधवाकडे एवकार ॥ पांडवाकडे चकार ॥ लाऊनि ऐसा अर्थविचार ॥सूचवी शिष्य व्यासाचा॥१९९॥माधव एव ह्मणजे त्या रथीं ॥ माधवच सारथी आणि रथी ॥ अर्जुन वाटे जनमनोरथीं ॥ तरी पांडवश्च ह्मणजे तोही ॥२००॥ कीं हराया भूभार ॥ कृष्णजयशक्ति अर्जुनाकार ॥ सर्वात्मभावें निर्विकार ॥ माधव एव पांडव ॥ २०१ ॥ एवं श्वेताश्वयुक्त रथीं ॥ श्रीमाधव भक्तांचा सारथी ॥ आणि पांडुसुत अर्जुनरथी ॥ वाजविते जाले दिव्य शंख ॥ २०२ ॥

वरील व्याख्येंत मूळ श्लोकाचा सरळ अर्थ शेवटल्या ओवींत मात्र आहे. बाकीच्या सर्व ओव्या अर्थसंदर्भानें पहातां उगीच लिहिल्या आहेत, हें मर्मज्ञाच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

उत्तम टीका साधली आहे अशीं स्थळें पुष्कळच आहेत, व तो एकंदर ग्रंथच उत्तम व्याख्येचा आहे. यास्तव त्यांतील कोणतेंही स्थळ पाहिलें असतां मूळाचा यथार्थ होण्याकरितां जितक्या चांगल्या व्याख्येची आवश्यकता आहे तितकी चांगली ती वामनानें केली आहे, असें दिसल्यावांचून राहणार नाहीं. अशा अतिगहन व विस्तृत विषयावरील अतिमोठ्या तत्ववेत्त्या पंडितानें केलेल्या अतिविस्तृत व गुणाकरव्याख्येंतील गुण निवडून वर्णू लागल्यास, त्यांचा यथार्थदीपिकेसारखा दुसरा ग्रंथच बनेल. विषय प्रतिपादन करण्याची व टीका करण्याची सरणी, मनोरम व सुंदर स्थलें, पूर्वापरसंबद्ध अर्थसंगति इत्यादि ग्रंथसंदर्भानें जे गुण दाखवावयाचे ते

विस्तारेंकरून दाखविण्यास ह्या लहानशा निबंधांत स्थलावकाश नाहीं. तथापि ग्रंथसंबंधी, कवितेसंबंधी व भाषेसंबंधी पुष्कळ चांगल्या गुणांनी ही टीका इतकी उत्तम झाली आहे कीं, वामनाचे दुसरे कोणते ही ग्रंथ न पहातां फक्त ह्या टीकाग्रंथावरूनच जरी पाहिलें तरी, वामनाची विशाल व कुशाग्रबुद्धि, त्याचें सरल, सोपें, मधुर व भेदक व्याख्यान, त्याची तत्त्वजिज्ञासा व अनन्यभक्तीची अप्रतिम प्रीति, त्याचे व्यापकविचार आणि अतिमोठी विद्वत्ता, हे गुण स्पष्ट झाल्यावांचून राहत नाहीत. आता मासल्याकरितां चांगल्या व्याख्येचीं एक दोन उदाहरणें दाखवितों त्यांवरूनही गुणांचें कांहीं दिग्दर्शन होईल.

श्लोक.

प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनःपुनः ।
भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥ ८ ॥

टीका ॥ अगा आपली प्रकृती ॥ अधिष्ठूनि तीतें मी जगत्पती ॥ पुनःपुनः हा भूतांचा ग्राम येरितीं ॥ मी निर्मितों ॥ ९१ ॥ प्रकृती अधिष्ठूनि निर्मितों ह्मणे ॥ तों अर्जुनास खूण बाणे ॥ विवर्तातें अधिष्ठी अधिष्ठान हें जाणें ॥ पात्र भगवत्कृपेचें ॥ ९२ ॥ रज्जु अधिष्ठी सर्पातें ॥ शुक्ती अधिष्ठी रुप्यातें ॥ तंतु अधिष्ठी पटातें ॥ घटातें मृत्तिका ॥ ९३ ॥ हे कार्यरूपिणी प्रकृती ॥ सूचवी मायाधिपती ॥ प्रळयानंतर जगत्पती ॥ योगनिद्रा करी तेव्हां हे नसे ॥९४ ॥ रज्जूवरी सर्प दिसे ॥ तेव्हां कीं द्रष्टा असे ॥ कर्तयाविण न भासे ॥ पट तंतूंत घट मृत्तिकेंत ॥ ९५ ॥ जे प्रळयकाळीं नव्हती ॥ ते सृष्टि-

काळीं कोठोनि आली प्रकृती ॥ या गोष्टीच्या समाधानार्थ मायापती ॥ प्रकृतिंस्वां ह्मणतसे ॥ ५६ ॥ कीं ते कारणरूपिणी ॥ अगम्यत्वें तेव्हां होती निर्गुणी ॥ मध्यान्ह टळतां किरणी ॥ जैसा असे जळभास ॥ ५७ ॥ वृक्षाचें पत्र पुष्प फळ पडे ॥ तें अन्यत्र कोठें तरी सांपडे ॥ मध्यान्ह टळतां कोणीकडे ॥ जळभास गेला ह्मणावा ॥ ५८ ॥ जरी ह्मणावा कीं नाश जाला ॥ तरीं दुसरे दिनीं कैंचा आला ॥ ह्मणावा आणीक उपजला ॥ तरीं नाश पूर्विल्याचा देखिला कोठें ॥ ५९॥ एवं जळभास कालचा ॥ ह्मणावा पक्ष हानि साचा ॥ परी प्रातःकाळीं भास त्याचा ॥ लेशही मध्यान्हापूर्वीं दिसेना ॥६०॥ तेव्हां किरणरूपें किरणीं ॥ होतें ह्मणावें तें मृषा पाणी ॥ तैसी प्रकृति निर्गुणरूपें निर्गुणी ॥ सृष्टिकाळापूर्वीं होती ह्मणावी ॥ ६१ ॥ तेव्हां ते ह्मणोंये स्वप्रकृती ॥ प्रकृतिं स्वामधिष्ठाय ह्मणोनि मायाधिपती ॥ ह्मणे आणि तीतें अधिष्ठूनि मागती ॥ सृष्टिकाळीं निर्मितों भूतांतें ह्मणतसे ॥ ६२ ॥ एवं प्रकृतिपुरुष एक ॥ हें सूचवी उत्तमश्लोक ॥ प्रकृति पुरुष व्यतिरेक ॥ तो एकत्व कळाया अन्वयें गुरु बोले ॥ ६३ ॥ एवं वाईट ते अविद्या ॥ वरी सर्वथा ते ब्रह्मात्मविद्या ॥ ऐक्यही न सोसे गुरुवराद्या ॥ प्रळयादि कीं ज्या ऐक्यांत अविद्या वसतसे ॥६४॥ इत्यादि.

श्लोक.

श्रीभगवानुवाच ॥ ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम्॥
छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥ १ ॥

टीका ॥ ऊर्ध्वकाळें करूनि ॥ जैसा पिता ऊर्ध्व पुत्राहुनि ॥ तैसें प्रपंचापूर्वी ब्रह्म म्हणोनि ॥ ऊर्ध्व शब्दें परब्रह्म ॥ ३० ॥ त्या ऊर्ध्वीं ब्रह्मीं ॥ मूळमाया अश्वत्थाचें ह्मणे जगत्स्वामी ॥ तें मूळ तों माया ह्मणूनि निगमागमीं ॥ प्रसिद्ध असे ॥ ३१ ॥ माया ब्रह्मीं प्रगटते ॥ ते माया ब्रह्मीच असते ॥ त्याच्या प्रकाशें प्रकाशते ॥ अनंत ब्रह्मांडरूपिणी ॥ ३२॥ किरणीं उठे जळाभास ॥ ठाव त्यावांचूनि कैचा तयास ॥ किरणावांचूनि कवणास ॥ दिसेल उदकभास तो ॥ ३३ ॥ मध्यान्हीं कार्यरूपें दिसे ॥ सायान्हीं कारणत्वें किरणीं वसे ॥ पुन्हा दुसरे दिवशीं गवसे ॥ मध्यान्ह होतां ॥ ३४ ॥ प्रातःकाळीं सायान्हीं ॥ न ह्मणवे किरणीं नाहीं ह्मणोनि ॥ जरी नाहींच तरी कोठुनि ॥ मध्यान्ह होतां प्रगटे ॥ ३५ ॥ तरी कां मध्यान्हावांचूनि न दिसे ॥ ह्मणूनि पुसतील जे ऐसें ॥ त्यास सांगावें की वसे ॥ किरणींच कारणरूपें इतरकाळीं ॥ ३६ ॥ परतु कारणरूपें करुनि ॥ किरणींच आहे अरूप होऊनि ॥ कार्यरूप त्याचपासूनि ॥ प्रगटे असे त्याच मध्यें ॥ ३७ ॥ दुर्वा दिसेना वृत ॥ तथापि आहे निश्चित ॥ की निघे होतां मथित ॥ न दिसे तरी आहे ह्मणावें ॥ ३८ ॥ तैसी माया प्रळयकाळीं ॥ असे निर्धर्मी केवळीं ॥ सृष्टिकाळीं त्याची निष्कळीं ॥ ते प्रगटते असते लय पावते ॥ ३९ ॥ ब्रह्मींच ते वसे ॥ प्रपंच तीपासूनि होतसे ॥ यालागि तेचि माया येथें गवसे ॥ प्रपंचाश्वत्थ मूळही ॥ ४० ॥ ऐसी माया अश्वत्थ मूळ ॥ ते ऊर्ध्वीं असे ह्मणे मेघनीळ ॥ ऊर्ध्वशब्दें ती परतें पलीकडे केवळ ॥ अधिष्ठान तें मायेचें ॥ ४१ ॥

तें ऊर्ध्व ह्मणावें ब्रह्म ॥ काळें पहातां तें अनादि परम ॥ होतां मायानदीचा उगम ॥ जीव नाना प्रगटती आलीकडे ॥४२॥ अधःशब्दें खालतें ॥नीचकाळें करूनि तें॥ सर्वही जीव या अर्थीं बोलते ॥ अधःशब्दें वाणी देवाची ॥४३॥ प्रपंच केला पिप्पल ॥ ब्रह्मों माया त्याचें मूळ ॥ अधः-शब्दें जीव सकळ॥ देहशाखा बोलतो तयातें ॥४४॥ एवं अध ऊर्ध्व दों शब्दीं करूनी ॥ एका चैतन्याचे भेद दोन्ही ॥ ऊर्ध्व बिंब अधः प्रतिबिंब म्हणोनि ॥ त्यांत ऊर्ध्वीं मूळ शाखा या जीवाकडे ॥४५॥ मायाच अश्वत्थ मायाच मूळ ॥ मायाच शाखा देह सकळ ॥ त्यांत माया नें ब्रह्म केवळ ॥ दृश्यमान जीवांतें ॥ ४६ ॥ हा प्रपंच अवघा येथिंचा ॥ त्यास अश्वत्थ ह्मणतो ॥ ह्मणोनि ह्मणे जगत्पति ॥ की वेदांती अश्वत्थ बोलती प्रपंचातें ॥४७॥ अश्वत्थ शब्दाचा अर्थ ॥ जेणें करूनी बोलतो समर्थ ॥ की अशाश्वतरूप यथार्थ ॥ अश्वत्थ ह्मणती प्रपंचातें॥४८॥ आजि देखिला जसा ॥ उद्या दिसता हा तसा ॥ ह्मणजे नश्वर क्षणभंगुर जसा ॥ अर्थ अश्वत्थ शब्दें करूनि ॥ ४९ ॥ इत्यादि.

त्यांत चमत्कारिक पुष्कळ अर्थ आहे. अशा कोणत्याही श्रीगीतेच्या श्लोकांवरील वामनाची संपूर्ण व्याख्या उतरून घेतली असतां या निबंधाचा अतिविस्तार होईल; यास्तव वर लिहिलेल्या दोन श्लोकांवरील व्याख्यांपैकी थोडथोडा भाग एथें दिला आहे. त्याजवरून वामनाचे प्रौढ व व्यापक विचार आणि टीकेची सरणी हीं मर्मज्ञास सहज समजतील.

भगवद्गीता हें योगशास्त्र असून, त्यांत नानाप्रकारचे

योग सांगितले आहेत, त्यांजवरील टीका करितेवेळींही वामनानें सगुणभक्तिपरच त्यांचा अर्थ लाविला आहे. हें भगवद्गीता अध्याय ६ श्लोकः—

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥ ११ ॥
तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेंद्रियक्रियः
उपविश्यासने युंज्याद्योगमात्मविशुद्धये ॥ १२ ॥
समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः
संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥ १३ ॥
प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः
मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ १४ ॥

यांवरील वामनपंडिताची व्याख्या पाहिली ह्मणजे दिसतें. वरील श्लोकांत सगुणमूर्तीचा कांहीं उल्लेख नसून, भगवद्गीतेवरील ज्ञानेश्वरीनामक टीकेंत ही वरच्या श्लोकांचा अर्थ योगपरच केला आहे.

वरच्या श्लोकांवरील ज्ञानेश्वरीटीकेंत मूळबंधनामक योगाच्या, देश, आसनविधि इत्यादि क्रिया बारीक बारीक तपशीलवार सांगून, अखेरीस योगाभ्यासानें जें देहाचें चमत्कारिक अवस्थांतर होतें तें अतिमनोवेधक व अद्भुत वर्णिलें आहे. योगाभ्यासानें ब्रह्मांडांतील मुंगीपासून मनुष्यांपर्यंत सर्वांचें अंतःकरण जाणतां येतें; पाण्यावर जमिनीप्रमाणें पायांनीं चालतां येतें; आकाशांत केवळ शरीरानें पाहिजे तसें गमन करितां येतें. इत्यादि अनेक अलौकिक सामर्थ्यें येतात असें सांगितलें आहे.

परंतु वामनानें व्याख्या करितेवेळीं अशा योगाचा

एकदेश ही दाखविला नाहीं. केवळ सगुणध्यान करण्याकरितां वरील श्लोकांत सांगितलेला देश आसनादि प्रकार आहे, असा अभिप्राय व्याख्येंत दाखविला आहे.

तेव्हां यासंबंधें ज्ञानेश्वरी यथार्थ किंवा यथार्थदीपिका यथार्थ हें पाहिलें पाहिजे. भगवद्गीतेस योगशास्त्र ह्मटलें आहे; योगक्रियेनें शरीरावर कांहीं व्यापार घडला असतां अंतःकरणास विलक्षण शक्ति येऊन जगद्व्यापकत्वही प्राप्त होतें. हें सांप्रतच्या मिसमेरीझमच्या प्रयोगावरून आपणास प्रत्यक्ष दिसतें. व अध्यात्मविद्येचें मुख्य फल विश्वव्यापकता हें आहे असें पुष्कळ ठिकाणीं आढळतें. तेव्हां ज्ञानेश्वरानें मूळबंधादि योगमार्ग आणि त्यायोगें शरीरासह मनाचें होणारें विलक्षण स्थित्यंतर जें सांगितलें आहे, तें भगवद्गीतेंतील मूळाभिप्रायास अनुसरून यथार्थ आहे असें वाटतें.

परंतु वामनानें त्या श्लोकांचा सगुणध्यानपर जो अर्थ केला आहे तो यथार्थ आहे असें वाटत नाहीं. कारण सगुण ध्यान करण्यास, देश, आसन मुद्रा इत्यादि खटाटोपाची गरज नाहीं. व इतका खटाटोप असणें हें सगुणध्यानाभ्यासास यद्यपि प्रतिकूलही नाहीं; तथापि भगवच्चिंतन करण्यास देश, काल, आसनादि विधि जसा

१ मोरोपंतानें ज्ञानेश्वरीची महती मोठीच वर्णिली आहे. "श्री ज्ञानदेव साक्षात् भगवान वैकुंठनाथ अवतरला ॥ एतत्-कृत-गीतार्थ-व्याख्यानें फार लोक भव तरला ॥ ३ ॥ भाषाग्रंथीं याची तुळा नये आणिकांसि या लोकीं ॥ प्रतिभा धरुं करातें कविधर्महि सर्व किंकरचि हो कीं ॥ ४ ॥

भग० आर्या.

प्रधानभूत नाहीं, पाहिजे त्या ठिकाणीं केव्हांही भगवच्चिंतन करण्यास हरकत नाहीं; त्याप्रमाणेंच सगुणध्यान करण्यास देशकालाची आवश्यकता नाहीं. तशांत ज्या गीतारूप लहानशा पात्रांत योगाचें विशदस्वरूप सांठविण्यास जागा नव्हती; तेथें सगुणध्यानाचा, देशासनादि अप्रधानविधि विस्तारानें सांगण्यास जागा झाली, ही कल्पना युक्तीस बरोबर दिसत नाहीं.

दुसरें, योगशब्दाचा अर्थ ध्यान असा आहे; परंतु तो "सगुणध्यान" असा योगशास्त्रांत मानित नाहीत. योग शब्दाचा सगुणध्यान असाच अर्थ जर भगवान् श्रीकृष्ण यास इष्ट असता, तर तशी गीतेंत स्पष्टता करण्यास त्याला शब्दाची उणीव होती असेंही नाहीं.

तिसरें. योगशास्त्रांत योग शब्दाचा मुख्यार्थः—"योगश्चित्तवृत्तिनिरोधः"

भ० पतंजलि.

"संयोगो योग इत्युक्तो जीवात्मपरमात्मनोः"

भ० याज्ञवल्क्य.

"योगः समाधिरिति। समाधिः समतावस्था जीवात्मपर-
"मात्मनोः। ब्रह्मण्येव स्थितिर्या सा समाधिः प्रत्यगात्मनः॥

भगवान् व्यास.

याप्रमाणें केवळ चित्तवृत्तीचा यमनियमादि उपायांनीं निग्रह करणें तो योग; किंवा जीवात्मा आणि परमात्मा यांचा जो संयोग तो योग; असा योगशास्त्रांत अर्थ आहे. तेव्हां वामनानें जी सगुणध्यानार्थीं योग शब्दाची योजना केली आहे ती अयथार्थ असावी असें वाटतें.

वामनानें या विषयावर टीका करतेवेळीं असें शंका-

समाधान केलें आहे कीं, योग शब्देंकरून हठयोग घ्यावा तर, शरीरास अजरामरत्व आणून त्यायोगें देहाचा लोभ वाढवावा, असा गीतेचा हेतु नाहीं. यास्तव सगुणध्यानपरच अर्थ लाविला पाहिजे. या वामनाच्या ह्मणण्याचें खंडणही सहज होतें. युक्ताहारविहारादि गोष्टी शरीरसुखार्थ सागून, त्यापासून योगसुख गीतेंत पुढेंच सांगितलें आहे. व त्याची टीका करितेवेळी वामनानें ह्मटलें आहे की, आहारविहारांत न्यूनाधिक झालें असतां शरीरास विकृति व असुख होऊन योग साधणार नाही. यास्तव शरीराची सुयंत्रता राखिली पाहिजे. यावरूनच जर योगानें शरीरास अजरामरत्व येतें असें वामनानें मानिलें आहे, तर तशा योगाचा अभ्यास करून शरीराची निरंतर सुयंत्रता सिद्ध करण्यांत जड देहाचा लोभ केला असें होत नाही. एकदा योगाभ्यासानें शरीर अजरामर झालें, ह्मणजे पाहिजे तसें सगुणध्यानादि ईश्वरोपासनेकडे त्याची योजना करण्यास कोणतीही हरकत राहणार नाहीं. मग ईश्वराशी योग होण्याकरितां निर्बंध व निरुपाधि शरीर बनविण्याचा जो वज्रासनगौणनांवाचा योग ज्ञानेश्वरानें सांगून, योग शब्दाची व्याख्या केली आहे, ती वामनाच्याही एकंदर अभिप्रायानें यथार्थ नाही असें सिद्ध होत नाही. असो.

आतां या संबधानें वामनपंडित आणि ज्ञानेश्वर या-ग्रंथकारांची व्याख्या मासल्याकरितां एथें देणें अवश्य आहे. तथापि वर दिलेल्या सर्व श्लोकांवरील संपूर्ण व्याख्या देण्यास अवकाश नसून तशा सर्व व्याख्येची

एथें गरजही नाहीं. यास्तव योगपदार्थाविषयीं थो- डीशी व्याख्या मात्र देतों.

तत्रैकाग्रं मनः कृत्वा० इ० ॥ १२ ॥ टीका ॥ योग एथें कवण ॥ वाखाणावा तरी ते ग्वूण ॥ बुद्धीच्या शु- द्धीचें बोलतां कारण ॥ सगुणध्यान सूचवी ॥ २१ ॥ जरी ह्मणावा कर्मयोग ॥ तरी यज्ञादिक कर्में तेथें अं- तरंग ॥ तेव्हां स्त्री आणि ऋत्विगादिसंग ॥ तो ये- काकी अपरिग्रह ह्मणवेना ॥ २२ ॥ योगशब्दें हट- योग ॥ बोलतो ह्मणावा श्रीरंग ॥ तरी न तुटे वासना सग ॥ हटयोगें करूनी ॥ २३ ॥ देहामुळें भोग नाना ॥ त्याच्या जीवित्वाची वासना ॥ धरूनि करिती काळ वंचना ॥ हटयोगी ॥ २४ ॥ देह व्हावा अजर ॥ देह व्हावा अमर ॥ हटयोगें उपजे आदर ॥ या जडा श- वाचा ॥ २५ ॥ बुद्धी शुद्धी कारणें ॥ योग योजावा ह्मणे श्रीकृष्ण ॥ तेव्हां योगशब्दें सगुण ॥ मूर्ती ध्यावी हरीची ॥ ३० ॥ इत्यादि.

वामनपंडित यथा० टी०

तत्रैकाग्रं० ॥१२॥ आणि समं कायशिरोग्री० ॥१३॥ टी० ॥ मग तेथें आपण ॥ एकाग्र करूनि मन ॥ क- रूनि सद्गुरुस्मरण ॥ अनुभविजे ॥ ८६ ॥ तैसें स्मरतेन आदरें ॥ सबाह्य सात्विकें भरे ॥ जव कठिणपण विरे ॥ अहंभावाचें ॥८७ ॥ विषयाचा विसरू पडे ॥ इंद्रि- यांची कसमस मोडे ॥ मनाची घडी घडे ॥ हृदयामाजी ॥ ८८ ॥ आतां आंगातें आंगकरी ॥ पवनातें पवनूचि धरी ॥ ऐसी अनुभवाची उजरी ॥ होचि लागे ॥ ९० ॥ प्रवृत्ती मावोती मोहरे ॥ समाधी ऐलाडी ऊतरे ॥ आ-

घवा अभ्यास सरे ॥ बैसत खेवो ॥ ९१ ॥ मुद्रेची मौढी ऐसी ॥ तेचि सांगिजेल परियेसी ॥ तरी ऊरू या जघनाशी ॥ जडूनि घाली ॥ ९२ ॥ चरणतळें देव्हडी आधार दमाचा बुढी ॥ सुघटि ते गाढी ॥ संचरीपा ॥९३॥ सव्य ते तळीं ठविजे ॥ तेणें सिवनि मध्यु पीडिजे ॥ वरी बैसे तो सहजे ॥ वामचरणू ॥ ९४ ॥ इ० अर्जुना हें जाण ॥ मूळबंधाचें लक्षण ॥ वज्रासन गौण ॥ नाम यासी ॥ ९९ ॥ प्रशांता० ॥ १४ ॥ टी० ॥ जै अभाळाची बुंथी ॥ करूनि राहे गभस्ती ॥ मग फीटलीया दीप्ती ॥ धरुनि ये ॥ ५१ ॥ तैसा आहाच वरी कोरडा ॥ त्वचेचा असे पातवडा ॥ तो झडोनि जाय कोंडा॥ तैसा होय ॥ ५२ ॥ मग कास्मिराचे स्वयंभ ॥ कां रत्नबीजा निघाले कोंभ ॥ अवयव कांतीची भांब ॥ तैसी दिसे ॥ ५३ ॥ नातरी संध्यारागीचे रंग ॥ काढूनि वळिलें आंग ॥ कीं अंतरज्योतीचे रंग ॥ निर्वाळले ५४ कुंकुमाचें भरीव ॥ सिद्धरसाचें ओतीव ॥ मज पाहतां सावेव ॥ शांतीचि ते ॥ ५५ ॥ ते आनंदचित्रीचे लेप ॥ नातरी महासुखाचें रूप ॥ कीं संतोषतरूचें रोप ॥ थांबलें जैसें ॥ ५६ ॥ तैसें शरीर होय ॥ जे वेळीं कुंडलिनी चंद्र पीये ॥ मग देहाकृति बिहे ॥ कृतांतु गा ॥ ५९ ॥ देह होय सोनयाचें ॥ परी लाघव वायूचें ॥ जे अपा आणि पृथ्वीचे ॥ अंश नाहीं ॥ ६८ ॥ मग समुद्रा पैलीकडे देखे ॥ स्वर्गीचा आळोचू आईके ॥ मनोगत ओळखे ॥ मुंगियेचें ॥ ६९ ॥ इत्यादि.

ज्ञानेश्वरी.

भगवद्गीतेवर महाराष्ट्रभाषेंत यथार्थदीपिकेच्या पूर्वी

एक ज्ञानेश्वरीनांवाची मात्र विस्तृत टीका झालेली आहे- ती ज्ञानेश्वर नांवाच्या साधुपुरुषानें केली आहे. याखेरीज दुसरी टीका आमच्या पाहण्यांत व ऐकण्यांत नाहीं. वामनानें यथार्थदीपिका लिहितांना नवव्या अध्यायांत असें ह्मटलें आहे कीं,—

सर्व ज्ञानाचा कळस ॥ मुक्ति देऊनिही ज्याच्या दानीं आळस ॥ त्याचा द्यावयाचा ओरस ॥ भक्ताच्या ठायीं येथें दाखविसी ॥ २३ ॥ रहस्य ऐसें उत्कट ॥ या अध्यायीं करिसी जरी प्रकट ॥ तरी अनन्य भक्ती- वांचूनि संकट ॥ पडिलें टीकाकारासही ॥ २४ ॥ वंदिती पूजिती तुझे चरण ॥ तरी अंतरीं इतर देवता शरण ॥ करिती क्षुद्रदेवता मंगलाचरण ॥ इच्छोनि निर्विघ्न कवितास्फूर्तीही ॥ २५ ॥ राजविद्या राज गुह्याचा ॥ उकल नव्हे त्यास साचा ॥ जसीं तसी युक्तवाचा ॥ योजोनि गेले ॥ २६ ॥ जगीं मिरवोनिया सिद्धी ॥ आपल्या टीकांची केली प्रसिद्धी ॥ तथापि नाहीं झाली अर्थसिद्धि ॥ यथार्थगीता रहस्याची ॥ २७ ॥

आणखी:—

पुण्य आणि पाप ॥ दोनीही अविद्यारूप ॥ कर्मधर्मदाहक स्वरूप ॥ ज्ञानाग्नि हा ॥ १४९ ॥ धर्म ह्मणतां पुण्य कर्म ॥ ज्ञानीं नलगे तो धर्म ॥ या धर्म्यपदाचें न कळोनि वर्म ॥ प्राकृत टीकाकार धर्म्य इतकेंचि बोलती ॥ १५० ॥

वरील लेखांत प्राकृत टीकाकारांच्या नांवाचा उल्लेख स्पष्ट नाहीं व बहुवचनीं प्रयोग योजिलेला आहे यामुळें

अनेक टीकाकारांस लक्षून बोलल्यासारखाही भास होतो; तथापि ज्ञानेश्वरावांचून अन्य टीकाकारांची मुळींच प्रसिद्धि नाहीं व सिद्धीच्या साधनानें टीकांची जगांत प्रसिद्धि केली हा आरोप[१] ज्ञानेश्वरावर फार चांगल्या

---

१ ज्ञानेश्वरानें कित्येक प्रसंगीं अनेक अलौकिक अद्भुत चमत्कार करून दाखविले अशा दंतकथा हजारों लोकांच्या मुखानें ऐकण्यांत येतात; इतकेंच नाहीं तर, भक्तविजयादि ग्रंथांतही ते चमत्कार इतिहासरूपानें लिहून ठेविलेले आढळतात. ज्ञानेश्वरीच्या संबंधानें अशी एक कथा ऐकिली आहे कीं, ज्ञानेश्वरानें पैठण येथें रेड्याचे मुखानें वेद बोलविल्यानंतर पैठणाहून निघून तो आपल्या भावंडांसह दुसरे एका गांवीं मुक्कामास गेला (हें गांव नेवासें असावें) आणि एका देवालयांत उतरला. तेथें त्यानें देवळांतील भिंतीवर एका रात्रींत कोळशानें भगवद्गीतेचा अर्थ लिहून ठेविला तीच ज्ञानेश्वरी. उजाडल्यावर एक मळवट भरलेली स्त्री निवृत्तिनाथाच्या दर्शनार्थ आली व तिनें त्याच्या पायांवर डोकें ठेविलें; तेव्हां निवृत्तीनें 'अष्टपुत्रा सौभाग्यवति भव' असा आशीर्वाद दिला. ती स्त्री आपल्या पतीचे शवाबरोबर सहगमनास चालली होती, यास्तव निवृत्तीचा असा आशीर्वाद ऐकून तिला सखेदाश्चर्य झालें. आणि तसें उद्गार तिनें प्रकट करून आपली हकीकत सांगितली. निवृत्तीनें तिच्या पतीचें नांव विचारतां सच्चिदानंद आहे असें तिनें सांगितलें. तेव्हां ज्ञानेश्वरास हाक मारून निवृत्तीनें विचारिलें कीं सच्चिदानंदास मरण आहे काय? ज्ञानेश्वर म्हणाले, नाहीं. निवृत्ति म्हणाले, मग ही बाई म्हणते सच्चिदानंद मेला हें कसें? ज्ञानेश्वरानें सांगितलें कीं, बाई अगदीं खोटें बोलत आहे; प्रत्यय पहावयाचा असल्यास सच्चिदानंदास हांक मारतों. असें म्हणून ज्ञानेश्वरानें हांक मारल्याबरोबर सच्चिदानंद जिवंत होऊन पायीं चालत आला. व त्यानें ज्ञानेश्वरादिकांस वंदन केलें. तेव्हां ज्ञानेश्वरानें त्यास कामगिरी सांगितली कीं, ह्या देवळाच्या भिंतीवर मी ज्ञानेश्वरी लिहून ठेविली आहे; तिची प्रत करून तो आळं-

प्रकारें लागू होतो. यामुळें वामनानें भगवद्गीतेवरील प्राकृत टीकाकारांविषयीं जें जें लिहिलें आहे तें तें मुख्यत्वेंकरून ज्ञानेश्वरासच लक्षून लिहिलें असावें असें आह्मांस वाटतें.

या आमच्या ह्मणण्याचें दृढीकरण ज्ञानेश्वरीवरूनही होतें. तींत "प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम्"२ ह्या श्लोकाची टीका लिहितांना धर्म्यपदाची कांहींच व्याख्या केली नाहीं. एके ठिकाणीं "तरी पवित्र आणि रम्य ॥ तेंविचि सुखोपायें गम्य ॥ आणि स्वसुख परिधर्म्य ॥ वरी आपणपा जोडे" ॥ ५५ ॥ इतकें मात्र ह्मटलें आहे. तें वर दाखविलेल्या यथार्थदीपिकेंतील १५० व्या ओंवीस बरोबर मिळतें. तेव्हां यथार्थदीपिकाकारानें प्राकृत टीकाकाराविषयीं केलेला उपहास ज्ञानेश्वराकडेच लागतो असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. तथापि धर्म्यपदाची यथार्थ व्याख्या केली याविषयीं वामनपंडिताची स्तुतिच केली पाहिजे.

समश्लोकी, ही भगवद्गीतेवरील सुंदर चिमकुली टीका फारच चांगली साधली आहे. ह्या टीकेंत मुळांतल्याप्रमाणें छंद, वृत्त, अर्थ, पद्यसंख्या हीं तशींच कायम ठेवून फक्त मराठी भाषांतर मात्र केलें आहे. व पूर्वापराध्यायांतील मजकुराचा संदर्भ जोडण्याकरितां

दीस घेऊन यावें. त्याप्रमाणें सच्चिदानंद बाबा यानें ज्ञानेश्वरीची प्रत तयार करून नेली.

शके १२ शें बारोत्तरें ॥ तैं टीका केली ज्ञानेश्वरें ॥ सच्चिदानंद बाबा आदरें ॥ लेखकु झाला ॥

ज्ञानदेव.

अध्यायाच्या आरंभीं कांहीं कांहीं अनुष्टुपछंदाचीं पद्यें पंडितांनीं घातलीं आहेत. ही एक लहानशीच टीका पाहिली तरी गीतेचें सार समजण्यास कांहीं हरकत पडणार नाहीं इतकी चांगली ही टीका साधली आहे असें आह्मास वाटतें. ह्या टीकेंत सोपे शब्द, सरल अर्थ, सुसंगति आणि व्याकरणशुद्धिही आहे. हिजविषयीं मोरोपंतानें ह्मटलें आहे:—

आर्या (गीति)

रीति समश्लोकीची अतुला साधेल काय भव्यास ।
या सुयशें होइल कां रोमांचव्याप्तकाय न व्यास ॥६॥

मोरोपंत.

ब्रह्मस्तुति, ही भागवतांतील ब्रह्मदेवकृत स्तुतीची टीका आहे.

ज्याणें दाउनियां अतर्क्यमहिमा ब्रह्मा मनीं मोहिला ।
तो आच्छादुनि नंद नंदनवनीं जो एकला राहिला ॥
तेव्हां सावध होउनी नमुनियां ब्रह्मा करी जे स्तुती ।
त्या ब्रह्मस्तुतिची करी हरिच तो टीका स्वयें श्रीपती२

वामन.

श्रीमद्भागवतांतील दशमस्कंधांत ब्रह्मदेवानें जी स्तुति केली आहे, तिची श्रीपति वामनानें त्रिविक्रमपणें ही त्रिचरणी व्याख्या केली. पहिल्या चरणांत भक्तियोग, दुसऱ्यांत ज्ञानकांड आणि तिसऱ्यांत पुनः भक्ति, याप्रमाणें वर्णन केलें; ह्मणून वामनानें सांगितलें आहे.

श्रीमद्भागवतीं विचित्र दशमस्कंधीं विरंचिस्तुती
तीची वामन हे त्रिविक्रमपणें व्याख्या करी श्रीपती ॥

टीका याकरितांचि हे त्रिचरणी लोकत्रयीं संचरे ।
येथें या चरणीं मुकुंदचरणीं सप्रेम जो तो तरे ॥१९१॥

चरण १.

प्रथमचरण एथें वर्णिला भक्तियोगें ॥
तदुपरि दुसरा जो ज्ञानकांडप्रसंगें ॥
पुनरपि चरणीं या भक्ति गोविंदजीची ॥
कथिन सरि न पावे मुक्ति कैवल्य जीची ॥ १ ॥

चरण ३.

या ग्रंथांतील कविता मधुर आणि भक्तिरसपूरित आहे.

ब्रह्मांड सावरण सर्व शरीर माझें ।
होतें असें चहुं शिरांवरि गर्व-ओझें ॥
ब्रह्मांड आणि चतुरानन कोटि-कोटी ।
दावोनि बुद्धि हरिली हरिनेंचि खोटी ॥ ३० ॥
अंडें किती विधि किती मज लेखवेना ।
तेव्हां अतर्क्य-महिमा मज देखवेना ॥
आच्छादिलें विभव हें हरिनेंचि जेव्हां ।
आली मला स्मृति हळू हळु आजि तेव्हां॥३२॥
ह्मणुनि अंडशरीरहि मी जरी ।
तरिहि मेरुपुढें जशि मोहरी ॥
मनिं विचारुनियां विधि येरिती ।
वदतसे स्वलघुत्व हरिप्रती ॥ ३३ ॥
गर्भांत अर्भक जरी जननीस लाता ।
हाणी तयास हरि काय करील माता ॥

हें विश्व आणि कमळासन अंडकोटी ।
यांतील काय मज सांग तुझ्या न पोटीं ॥ ४० ॥

चरण २

वरच्या शेवटल्या श्लोकांतील उद्गार किती उदात्त व हृदयभेदक आहे !!!

ब्रह्मस्तुति हा ग्रंथ माधुर्य आणि प्रसाद यांचें माहेरघर आहे. यांत वामनानें भक्तिरसपूरित वर्णन पुष्कळ ठिकाणीं केलें आहे. मासल्याकरितां उतरून घेण्याजोगीं अनेक स्थळें आहेत तरी तसें करण्यास एथें स्थलावकाश नाहीं. या प्रकरणांतील किती एक उद्गार आणि वर्णनें इतकीं चांगलीं उतरलीं आहेत कीं, मराठीभाषेंतील उत्तमकाव्यांत तीं पहिल्यास्थानीं बसविण्यास योग्य आहेत. या ग्रंथांत आत्मविचाराचा कठिण विषय जरी वर्णिला आहे तरी सर्वत्र सोपी, गोड आणि बाळबोध भाषा घातली आहे.

वामनानें भागवतरामायणादि ग्रंथांतून कांहीं कथाभाग अशा चातुर्यानें व खुबीनें निवडून घेतले आहेत कीं, त्यांत बहुतकरून परमेश्वराचे अगाध, अद्भुत आणि निर्मलयश वर्णन करण्याचाच प्रसंग येईल.

या गोष्टीचें "दंपत्यचरित्र" हें एक उदाहरण आहे. यांत वामनाची उपास्यदेवता भगवान् श्रीकृष्ण ह्याच्याच भक्तवात्सल्यादिनिर्मलगुणांचें वर्णन करण्याचा त्याचा हेतु फार स्पष्ट होतो. कारण धर्मराजाच्या अश्वमेधांतील अश्वास स्नान घालण्याकरितां, धर्मराजाच्या आप्तसोयऱ्यांचीं शेंकडों दंपत्यें येऊन जो समारंभ झाला, तो मो-

च्या थाटानें वर्णन करून, काव्याचें सुंदर लावण्य लोकांपुढें ठेवण्याचा हा प्रसंग वामनास फारच चांगला होता; तथापि भगवद्गुणवर्णनावांचून काव्य करणें हें नीच काम आहे अशी जी वामनाची समजूत होती, तिला अनुसरून वरील प्रसंगाचा लहानसाच परंतु भक्ति आणि वात्सल्य यांनीं भरलेला असा श्रीकृष्णरूपी पुर्ता भाग वामनानें निवडून वर्णन केला आहे हें तें प्रकरण पाहतां उघड दिसतें.

भगवद्भक्तांचें वर्णनही वामनानें केलें आहे; तथापि त्यांत ही ईश्वराची भक्तवत्सलता दाखविण्याचाच प्रधान हेतु दिसतो. या गोष्टीचें "भीष्मयुद्ध" हें एक उदाहरण आहे.

पुष्कळ अद्वैतवादी पंडित, मूर्तिपूजा अथवा सगुणोपासना मुळींच मानित नाहींत; परंतु वामनपंडित हा अद्वैतवादी असतांही मोक्ष सुलभ होण्याकरितां सगुणभक्ति करणें फार अवश्य आहे असा त्यानें दृढनिश्चय केला होता. त्यानें आपल्या प्रत्येक ग्रंथांत आत्मज्ञान आणि भक्ति ह्यांची सांगड घालून त्याच पायावर आपल्या सर्व ग्रंथांची इमारत उभारिली आहे. भागवतांत ज्या सगुणभगवल्लीला वर्णन केल्या आहेत, त्यांतील प्रेमातिशयास प्रसवणारे प्रसंग पाहून त्यांवर अत्यंत भक्तिपुरःसर काव्यरचना वामनानें केली आहे. ह्याचा मासला कृष्णजन्म, बालक्रीडा, उखळबंधन, हरिविलास इत्यादि प्रकरणें आहेत.

लौकिक विषयाचें वर्णन करितांना वामनानें कोठें विस्तार केला नाहीं. परंतु जेथें जेथें अद्वैत विवेचन कर-

ण्याचा संधि आला तेथें तेथें त्यानें फारच विस्तार केला आहे. तो भक्ति व अद्वैत याविषयीं विवेचन करीत असतां अगदीं तद्रूप होऊन जातो. त्यानें एकच गोष्ट अनेकदा सिद्ध करून दाखविली आहे, असेंही आढळून आलें आहे.

" नकळतहि पडे हा विष्णुनामाग्नि जेथें
" दुरिततृणग्रहाचें भस्म होणार तेथें "
" याकारणें जीं हरिनामधेयें
" वेदीं पुराणीं मुनिवर्य गेयें
" ज्या त्या मिसें उद्धरिती जनाला
" जाळूनियां पापमहावनाला २३ "
" न कळतां पद अग्निवरी पडे
" न करि दाह असें न कधीं घडे
" अजितनाम वदो भलत्या मिसें
" सकळपातक भस्म करीतसे ३४ "
" तो आठवीतां हरि पाप नाशी
" नेणोनिही अग्नि तृणादि राशी ३५ "

नाममाहात्म्य वर्णन करित असतां वर लिहिल्याप्रमाणें अग्नीचाच दृष्टांत घेऊन असेंच पुढें ४१ । ४२ । ४३ । ४५ । ४७ । ४८ । ४९ । इत्यादि पद्यांत वामनानें वर्णिलें आहे. विषयविवेचन करितांना एकच दृष्टांत वारंवार घेऊन एकच गोष्ट एकाच तत्त्वावर अनेकदा सिद्ध करणें कदाचित् कंटाळवाणें व निरर्थक होतें. परंतु त्यापासून ग्रंथकर्त्याची अभिरुचि व्यक्त होते;

नाममुधेंत वामनानें अग्नीचा दृष्टांत घेऊन नामप्रभाव अनेकदा उत्कृष्ट करून दाखविला आहे. यावरून नामसंकीर्तनावर वामनाची फार भक्ति होती असें दिसतें. एकादा अभक्तिमान् दांभिक ग्रंथकार असता तर मुळीं नाममाहात्म्य वर्णनाचा विषयच तो हातीं धरिताना; बरें कदाचित् हातीं धरिताच तर विषयप्रतिपादन करितेवेळीं एकच दृष्टांत पांच पंचवीस वेळां घेतल्यानें श्रोत्यांस आपला ग्रंथ कंटाळवाणा होईल काय? असा पदोपदीं विचार करून त्यानें ग्रंथ लिहिला असता. आमचे पंडित महान् भक्तिमान्, निस्पृह, सरल आणि आनंदी होते. यामुळें भक्ति, अद्वैत किंवा भक्ति आणि अद्वैत मिळून, वर्णन करण्याचा प्रसंग आला असतां, एकच गोष्ट अनेक वेळां दृष्टांत घेऊन, सिद्ध करून ठेविल्याशिवाय त्यांचें पाऊलच पुढें पडत नव्हतें, असें वाटतें.

वेदश्रुतीचा मार्मिक अर्थ प्राकृतजनांस समजावून द्यावा असा कितीएक प्रकरणावरून पंडितांचा मुख्य हेतु दिसतो. काम्यफलास प्रसवणारीं यज्ञादिकर्मे आहेत यास्तव स्वर्गप्राप्त्यर्थ, पुत्रप्राप्त्यर्थ इत्यादि कामना धरून तीं करणें हें अल्पदृष्टीचें काम आहे. कारण, स्वर्गादिफलें आद्यंतवंत नश्वर अशीं असून, यज्ञादिकर्मे केवळ चित्तशुद्धीकरितांच वेदानें सांगितलीं आहेत. तशी चित्तशुद्धि झाल्यानंतर ज्ञानेकरूनच मोक्षसिद्धि होते, इत्यादि तात्त्विकविचार, भक्ति, वैष्णवधर्म व आत्मज्ञान ह्यांचें अतिशय महत्त्व आहे, या गोष्टीशीं वेदार्थाचें सर्वत्र ऐक्य ठेवावें असा पंडिताच्या ग्रंथाचा कटाक्ष आहे.

यज्ञादिकीं करुनि होइल चित्तशुद्धी ।
ज्ञानें करूनि तदनंतर मोक्षसिद्धी ॥
याकारणें निगम बोलति यज्ञदीक्षा ।
हे स्वर्गमात्रगमनीं धरिती अपेक्षा ॥ ८ ॥
स्वर्गादि काम करिती विविधा मखांसी ।
ते तों न पावति निजात्ममहासुखासी ॥
कोंशिबिरी करुनि भक्षिति पुष्पमात्रें ।
त्याला फळें मग न त्या तरुचीं विचित्रें ॥ ९ ॥
यज्ञादि-वृक्ष फळ-मोक्ष तयांसि येती ।
स्वर्गादिरूप-सुमनें जन तींच घेती ॥
सर्वज्ञ जे करिति त्या सुमनीं उपेक्षा ।
होऊनी तींच सुमनें फळ देति मोक्षा ॥ १० ॥

नानाकर्म करूनियां क्षितितळीं राज्यादि संपादिती ॥
तैसा स्वर्गहि यज्ञ-पुण्य-विविधाकर्मींच कीं पावती ॥
जैशा या इहलोक राज्यपदव्या कर्मार्जिता नासती ॥
तैसीं तीं परलोकदैविकपदें बोले असें हें श्रुती ॥२२॥

आतां चातुर्मास्य-यज्ञादि-पुण्यें ॥
अक्षय्यें तीं केविं बोला अगण्यें ॥
तेव्हां ऐसा अर्थ अक्षय्यशब्दें ॥
कीं तीं पुण्यें राहती फार अब्दें ॥ २३ ॥
ह्मणूनि देवा अमरत्व जैसें ॥
नित्यत्व या कर्मफलासि तैसें ॥
कोण्ही श्रुतिज्ञान फळासि तैसा ॥
न बोलती नाश तयांत ऐसा ॥ २४ ॥

याकारणें मुक्तिसि नाश नाहीं ॥
न नित्यता कर्मफळासि कांहीं ॥
सांडूनियां मोक्ष अशा फळाला ॥
बोलेल कां वेद जनास बोला ॥ २५ ॥
स्वर्गकाम-सुतकामजनाला ॥
यज्ञ कां वदतसे श्रुति-बाला ॥
पूर्वपक्ष करिताति असाही ॥
वेदतत्त्व तरि ठाउक नाहीं ॥ २६ ॥
नयनिं दाउनि लड्डुक शर्करा ।
जननि दे कडुऔषध लेंकरा ॥
न फळ साखर औषधिचें जसें ।
श्रुति वदे फळकाम्य जगीं असें ॥ २७ ॥
स्वर्गाचीही कामना ज्या नराला ।
ज्योतिष्टोमा तो यजूकां सुराला ॥
ऐसा अर्थ स्पष्ट पाहा श्रुतींत ।
ज्योतिष्टोमस्वर्गकामोयजेत ॥ २८ ॥
श्रवण-कीर्तनही वदती श्रुती ।
परि न तुच्छ फल श्रुति बोलती ॥
ह्मणति वैष्णवधर्म धरा अरे ।
त्रिभुवनेश्वरकर्म पहा बरें ॥ ३० ॥
ऋग्वेदिंची त्रीणि पदा ह्मणूनी ।
हे गर्जताहे श्रुति विश्वकानीं ॥
कीं विष्णुचे धर्म धरूनि राहा ।
ऐकूनि तत्कर्म मनांत पाहा ॥ ३१ ॥

गोशब्दें जडबुद्धि इंद्रिय तयां जे पाळिती गोप ते ।
हे गोपाळ ह्मणूनि हे श्रुति तयां संबोधुनी बोलते ॥
कीं हें आक्रमिलें पदें करुनियां त्रैलोक्य या कारणें ।
त्याचे धर्म धरूनि कर्महि पहा कर्मासि जें पारणें ॥३२॥

कर्माणि पश्यत ह्मणे श्रुति विष्णुकर्मे ।
पाहा मनीं श्रवण-कीर्तन-रूप धर्मे ॥
संध्या जशी श्रुति वदे विधि एथही हा ।
कर्माणि पश्यत ह्मणे हरिकर्म पाहा ॥ ३३ ॥

इत्यादि-नामसुधा. अध्या० ३ च० ३

याशिवाय कर्मतत्त्व, यथार्थदीपिका, समश्लोकी, ब्रह्मस्तुति इत्यादि अनेक ग्रंथांत अनेक स्थलीं वामनानें श्रुतिप्रमाणानें फार चांगला तत्त्वविचार केला आहे. त्यांतील कांहीं मासला उतरून घेण्यास स्थलावकाश नाहीं.

वामनाची अद्वैतशास्त्रावर इतकी अभिरुचि होती कीं, शृंगारादि रसास उद्दीपन करण्याजोगी उत्तम सामग्री असतांही ती एकीकडे ठेवून तेथेंही यथेच्छ आत्मज्ञान कथन करण्यास त्यानें मागें पुढें पाहिलें नाहीं. रुक्मिणीविलास, या प्रकरणांत शृंगाररस प्रधानत्वेंकरून असावयाचा, परंतु त्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें अनेक पद्यें आहेत.

स्त्रियांचे ते देवा नृपति खर कीं बैल कुतरे ।
अहा कोणी बोले वधिति धनराज्यार्थ सुत रे ॥
नवोढांच्या लाता खर-पुरुष सोसूनि रमती ।
वृष स्कंधीं घेती श्वनर अवमानाई कुमती ॥ ११४ ॥

श्मश्रु रोम नख केश कातडी ।
आंत मांस कफ पित्त आंतडीं ॥
मूत्र शेंबुड मळादि वाहती ।
त्यासि सुंदरपणेंचि पाहती ॥ ११७ ॥
मृगजळ पुरुषाचा देह नाना-विकारी ।
रविकर-सम त्यांत श्रीपती निर्विकारी ॥
कुलवधु जरि पातिव्रत्यमार्गेंचि पाहे ।
भवजलधि तरे ते सर्व तूझी कृपा हे ॥ ११८ ॥

आणखी पहाः—

ह्मणउनी ह्मणते अजि केशवा ।
गणिति आत्मपणें जितके शवा ॥
अबुध इच्छुनि भाग्य नृपासना ।
करिति माझिच काम्य उपासना ॥ ९० ॥
तनुस मी ह्मणुनी अभिमानिती ।
विषय-दुःखहि जे सुख मानिती ॥
धरुनि ते दृढ दुर्भर-वासना ।
करिति यज्ञ असे मदुपासना ॥ ९३ ॥
न अभिमानिति या तितके शवा ।
भजति केवळ ते तुज केशवा ॥
मृगजळासम भाग्य नृपासना ।
गणिति ज्यांस चिदर्क-उपासना ॥ ९४ ॥

याप्रमाणें रुक्मिणीविलासांत रुक्मिणीच्या भाषणांत सर्वत्र वामनानें आत्मज्ञान ओतलें आहे. यामुळें अर्थात्

विषय विडंबन होऊन श्रृंगाररसाचें सरोवर कोरडें ठणठणीत दिसूं लागतें !!

काव्यदृष्टीनें पाहिलें तर रुक्मिणीविलासांतील कविता पंडिताच्या नेहमीच्या कवितेप्रमाणें चांगली साधली आहे यांत कांहीं संशय नाहीं; परंतु ग्रंथसंबंधानें पहातां विलासांत विषयविडंबन व आत्मज्ञानकथन किती विरुद्ध आहे हें सांगावयासच नको.

आतां विलासांत कोणत्या गोष्टी असाव्या हें पंडितास समजत नव्हतें असें ह्मणावयास जागा नाहीं कारण त्यानेंच " भामाविलास " ह्मणून एक लहानसें प्रकरण गाइलें आहे. त्यांत शृंगार फार खुबीदार व मार्मिक रीतीनें वर्णिला आहे. त्याचा कांहीं मासला पहा:–

कृष्णासि कृष्ण-पद-भक्ति विशारदानें ।
जें स्वर्गपुष्प दिधलें मुनिनारदानें ॥
तें रुक्मिणीप्रति दिलें त्रिजगन्निवासें ।
जें द्वारका करि भरोनि सुगंधवासें ॥ ६ ॥
असी गोष्टी दासी-जनीं बायकांनीं ।
विचारूनियां सांगतां जाय कानीं ॥
तंई सत्यभामा महाक्रोध दावी ।
बुझावी हरी तेचि लीला वदावी ॥ ७ ॥
गडबडा धरणीवरि लोळ ते ।
वदवती न कवीसहि लोळते ॥
रडत मूर्च्छित होय घडीघडी ।
पवन निश्चळ नेत्र न उघडी ॥ ८ ॥

अलक हार गळांतिल तोडिते ।
कुरळ केश मुखावरि सोडिते ॥
करयुगें उरमस्तक ताडिते ।
वसन आणिक कंचुकि फाडिते ॥ ९ ॥

महाउष्णश्वासें करुनि वदते शुष्क अधरा ।
धरापृष्ठीं जोडा न शठ दुसरा या गिरिधरा ॥
धराया माझा हा कर कपटि कैंचा जनमला ।
मला जो निंदूनी कुसुम तिस देऊनि रमला ॥ १ ॥

सख्याहो मेल्याही शवहि न शिवो हें यदुपती ।
पती नानास्त्रींचा पतितजनही ज्यास जपती ॥
नका येऊं देऊं सदनिं सवतीच्या प्रियकरा ।
करातें लावीना मज कपटि ऐसें तुह्मि करा ॥ ॥११॥

सर्वज्ञ तीची समजोनि टेवी ।
मौनेंचि नाकावरि बोट ठेवी ॥
काढी उशी घालुनियां स्वमांडी ।
त्यानंतरें सांत्वन यत्न मांडी ॥ १६ ॥

ह्मणे शोक कां प्राप्त झाला महा हा ।
असी कष्टली कां शुभांगी अहाहा ॥
न बोलेचि कां आजि आह्मांशि राणी ।
जिच्या बोलण्याचीच आह्मा शिराणी ॥ १७ ॥

वदे भामा कोपें अति-विकळ चाऊनि अधरा ।
धरापृष्ठीं नाहीं ठक तुज असा अंबुजधरा ॥

धरावें या अंकीं शिर अजि तिचें पक्षिगमना ।
मना आलें देणें कुसुम जिस ते कंसदमना ॥ २४ ॥
तों नेत्र मोडुनि वदे ढकलूनि मांडी ।
भ्रूमंडळीं भ्रमण अंगुलि भंग मांडी ॥
तो कृष्णजी करुनि हास्य ह्मणे अहाहा ।
वेडे अनर्थ इतुक्यास्तव कां महा हा ॥ २९ ॥
हरी जाणें हें कीं न वदत असे क्रोधनिकरें ।
करें आलिंगावी प्रिय वदत हे ग्यां प्रियकरें ॥
करें श्रीचंद्राच्या कठिन शशिकांत द्रवतसे ।
तसे हेही भाव प्रकट करणारी अमृतसे ॥ ३२ ॥
करूनी अशा सत्य नेमास तीतें ।
बळें ओढुनी सत्यभामा सतीतें ।
दिलें क्षेम त्या दुर्लभा-माधवानें ।
चहूंही भुजीं सत्यभामा-धवानें ॥ ३३ ॥
असी ते बुझावूनि रंभोरु हातें ।
तिच्या धूतसे हो मुखांभोरुहातें ॥
उटी लावुनी वाटल्या केशरा जी ।
स्वहस्तांबुजीं विंचरी केशराजी ॥ ३४ ॥
करि हरि यमुनाहो मूदगंगावनाची ।
मिरवि धवलपुष्पीं दीप्ति गंगावनाची ॥
सित असित नद्यांच्या संगमीं श्रीत्रिवेणी ।
तसिच यदुपतीनें घातली चित्रवेणी ॥ ३७ ॥
वर दिलेल्या उताऱ्यांत, स्त्रीजातीचा, सवतीच्या सं-

बंधानें मत्सर व क्रोध किती व कसा असतो, हें ढळढळीत रेखल्याप्रमाणें दाखविलें आहे. व त्यांतही सत्यभामेच्या संबंधानें ही गोष्ट फारच चांगली खुलत आहे. भगवान् श्रीकृष्णाच्या सहस्त्रावधि स्त्रियांमध्यें सत्यभामेसारखी मानिनी दुसरी कोणीही नव्हती. ह्या गोष्टीची प्रसिद्धि लोकांत एथपर्यंत आहे कीं, एकाद्या मानी दाष्ट मुलीनें हट्ट केला तर त्या वेळीं तिला काय भामा आहे !! असें ह्मणण्याची चाल पडली आहे. सत्यभामेच्या स्वभावांत मत्सर आणि क्रोध वर्णिल्यानें वामनाच्या ह्या काव्यास अतिशय शोभा आली आहे. आपला प्रिय हृदयंगमपति सवतीवर आपणापेक्षां अधिक प्रीति करितो व तिची मनधरणी करितो, हें भामेच्या क्रोधाचें कारण असून, भामाविलासांतील कथेस एथूनच आरंभ झाला आहे, यामुळें आरंभापासून यांत शृंगार भरलेला आहे. काव्यदृष्टीनें व ग्रंथसंबंधानेंही पहातां भामाविलास फारच चांगला साधला आहे. हा सर्वच एथें उतरून घेण्याजोगा मनोरम आहे; परंतु स्थलसंकोचामुळें त्याचा बराच भाग सोडून द्यावा लागला. भामाविलासांत श्रीकृष्णाचें खुबीदार व मनोहर भाषण आणि कोपातिशयामुळें त्यावर भामेचें थोडें लाडाचें, रुसाव्याचें, क्रोधमिश्रित भाषण आणि हावभाव हीं इतकीं उत्तम साधलीं आहेत कीं, भामाविलासभुवनांत प्रत्यक्ष ही गोष्ट आपण पहात आहों कीं काय? असा भास होतो. भामाविलासांत माधुर्य, प्रसाद, स्वभावोक्ति, अनुप्रास, यमकें इत्यादि गुणालंकार ही इतके चांगले साधले आहेत कीं, त्यायोगें महाराष्ट्रभाषे-

च्या एकंदर काव्यासच शोभा आली आहे असें आ-भास वाटतें.

स्वभावोक्तीवर पंडिताची फार प्रीति होती, व तिची मट्टी उतरण्याची हतोटीही त्यास चांगली साधली होती.

भामाविलासांत उत्तम शृंगार आणि रुक्मिणीविलासांत, तिच्या भाषणांत विषयविडंबन आणि ब्रह्मज्ञान कथन असें कां? तर याचें कारण असें वाटतें कीं, सत्यभामा ही भगवान् श्रीकृष्णास पुरुषविशेष मानून सेवन करीत होती, यामुळें विषयविलास व तत्संबंधी चेष्टा मात्र पंडितांनीं तिच्या स्वभावांत दाखविल्या आहेत. रुक्मिणीचें तसें नाहीं. ती आदिमाया, भगवान् श्रीकृष्ण ह्यास पूर्णब्रह्म सनातन मानून भजत होती, यामुळें विलासांतही तिच्या भाषणांत विषयादि तुच्छ मानिलेले दाखविले आहेत.

रुक्मिणीविलासांत रुक्मिणीच्या भाषणांत विषयविडंबनादि विस्तारानें वर्णन केलें आहे, तरी आरंभास शृंगाराचा व स्वभावोक्तीचा मासला उत्तमच आहे.

करमुद्या वलयांसह चाळितां ।
चवर माधवजीवरि ढाळितां ॥
ध्वनि उठे चरणीं मृदु भूषणीं ।
हृदय लग्न जिचें यदुभूषणीं ॥ ९ ॥
हरिवरि चवरेसी जेधवां हस्त नाचे ।
दिसति सखर वस्त्रीं कंप कांहीं स्तनांचे ॥
चळति कुचयुगाच्या कुंकुमें रत्नहार ।
स्फुरतिच पदराही आड त्यांचे विहार ॥ १० ॥

चहुकडूनि हि आनन शोभलें ।
पदक खालुनि शोभतसे भलें ॥
श्रवणिंचे नग शोभति दोंकडे ।
वरुनि चांचर-केश-हि वांकुडे ॥ १२ ॥

रुक्मिणीस खिजविण्याकरितां श्रीकृष्ण तिला ह्मणतो–

वरावे ते राजे निजसम तुवां राजतनये ।
नये आह्मा ऐसा क्वचिदपि वरूं वो सुविनये ॥
दिल्हें बापें भावें त्यजुनि वरवे ते क्षितिपति ।
पती केला ज्याचे कुळपति समुद्रांत लपती॥१९॥
ऐश्वर्यवंत वय आकृति ही समान ।
स्वार्थार्थ होतिल परस्पर त्यास मान ॥
मैत्री विवाह न घडे अधमोत्तमातें ।
तूं भाळलीस नृपनंदिनी काय मातें ॥ २० ॥
आतां तऱ्हीं क्षत्रिय तूं भलागे ।
वरीं जयाचा तुज लोभ लागे ॥
जेणें तुला साधिति लोक दोनीं ।
आह्मी वृथा काय बहू वदोनी ॥ २३ ॥

इत्यादि श्रीकृष्णाचें भाषण श्रवण केल्याबरोबर रुक्मिणीची जी अवस्था झाली तिचें वर्णनः–

" झाली असें परिसतांच अनाथ वाणी ।
" ठावी नसे जिस कधीं असि नाथवाणी ॥ "
शुक ह्मणे स्रवली नयनांबुजीं ।
धुकधुकी मनिं कंप हृदंबुजीं ॥

स्वपवनें निज-बिंब-फळाधरा ।
करुनि शुष्क पदें उकरी धरा ॥ २८ ॥
कुच सुकुंकुम चर्चित चांगले ।
नयनबिंदु पडों वरि लागले ॥
गिरियुगीं अतसी कळिका जळें ।
स्तनतटीं तसि वाहति काजळें ॥ २९ ॥
दाटूनि कंठ पडली वदनास मुद्रा ।
शोकें भरे जग जसें भरितें समुद्रा ॥
घेऊनि चामर चुडासह मुद्रिकांहीं ।
भूई पडे उरि नुरे तनुमाजि कांहीं ॥ ३१ ॥
पडे केळ जैसी महा-चंड-वातें ।
असें देखतां ये कृपा माधवातें ॥
उडी शीघ्र टाकी पलंगावरूनी ।
धरी उत्तरीयांबरा सांवरूनी ॥ ३३ ॥
उचलिलि चहुंहस्तीं श्रीस्वयें श्रीधरानें ।
पुसि नयनजळातें त्यांत एक्या करानें ॥
कुचयुगुलिं हरीचे गुंतले दोन्हि पाणी ।
सदृढ धरि चतुर्थें पोटसीं चक्रपाणी ॥ ३४ ॥
नयनशर धनुष्यें भोंवयांच्या प्रतापें ।
श्रवणवरिहि येती तांबडे कोप तापें ॥
अधर थरथरीती रक्तवर्ण-स्वभावें ।
असिस तुज पहावें बोलिलों याच भावें ॥ ४१ ॥
रुक्मिणीविलासांतही पुष्कळ कविता उतरून घे-

ण्याजोग्या आहेत; परंतु विस्तारभयास्तव एथें थोडाच उतारा घेतला आहे. तथापि त्यावरूनही गुणालंकार-चारुत्वानें सोज्वळ झालेलें त्यांचें सौंदर्य स्पष्ट व्हावयाचें राहत नाहीं.

वामनाच्या शृंगाराप्रमाणेंच वीर, करुणादिरसांतही कोठें तिलतंदुलन्यायानें, व कोठें कोठें नीरक्षीरन्यायानें, शांत आणि भक्ति ह्या रसांचें मिश्रण झालेलें आढळतें. वामनानें प्रत्येक वर्णनप्रसंगीं भक्तीच्या योगानें शुद्धभूमिका करून नंतर तिजवर शृंगारवीरादिरसांनीं मनोविकार चित्रित केले आहेत असें दिसतें. रासक्रीडा, भीष्मयुद्ध, भरतभाव, सीतास्वयंवर, द्वारकाविजय, बालक्रीडा इत्यादि प्रकरणें अवलोकन केलीं असतां वरील गोष्टींची प्रतीति येईल.

पंडितांनीं तत्त्वविचाराचीं, भगवन्निष्ठेचीं व भगवद्भक्तांचींही अनेक प्रकरणें काव्यात्मक लिहिलीं आहेत. त्या सर्वांत काव्यदृष्टीनें, प्रेमदृष्टीनें व व्यवहारदृष्टीनेंही सुदामचरित्राइतकें दोषपूरित, भक्तोपहासपर व ग्राम्य असें दुसरें कोणतेंही पंडितांनीं रचिलेलें प्रकरण नाहीं असें दिसतें. पंडितांचें हें सुदामचरित्र वाचिलें असतां असें वाटूं लागतें कीं, ज्या समयीं पंडितांस कांहीं उपरति झाली आणि त्यांनीं मराठीभाषेंत कविता लिहिण्यास आरंभ केला, त्या वेळीं प्रथमतःच जें प्रकरण हातीं धरिलें तेंच हें असेल. साधुचरित कोणत्या बुद्धीनें व रीतीनें वर्णन करावें; आपल्या वर्णनापासून लोकांचा काय

२ पुढें सुदामचरित्राचा उतारा देऊन ह्या गोष्टी दाखविण्यांत आल्या आहेत.

ग्रह होईल इत्यादि विचार स्वाभाविकपणें व्यवहारा-च्या कमसमजुतीमुळें वामनाच्या मनांत आले नसतील. त्यांतही पहिलाच प्रसंग; तेव्हां साधुचरितांत कांहीं तरी गमतीसारखें वर्णन केलें ह्मणजे पुण्य लागेलच असें वामनांनीं मानिलें असावें, असें वाटतें. आतां मनाच्या वृत्ति लीन होऊन त्यांस अंतर्मुखता प्राप्त झाल्यानंतर, उपहासादि मनोविकार उत्पन्न होण्यास जागाच राहिली नाहीं, असा तर्क केला तर, वामनास उपरति झाल्यानं-तरच त्यानें सर्व मराठी काव्य लिहिलें आहे. तेव्हां त्यांतीलच सुदामचरित्र असतां त्यांत उपहास कसा आला अशी शंका येते. तिचें समाधान इतकेंच करून घेतलें पाहिजे कीं, उपरति झाल्याबरोबर लागलीच म-नाची उन्मनीअवस्था होते असा अर्थ नाहीं. प्रथम अ-नुताप झाल्यानंतर अभ्यासानें होतां होतां मन स्वाधीन होऊं लागतें. त्याप्रमाणें वामनास उपरति झाल्याबरोबर प्रथमच सुदामचरित्र रचावयाचें त्याच्या मनांत येऊन त्या वेळीं ही रचना केली, यामुळें त्या प्रकरणांत वर लिहिल्याप्रमाणें अनेक दोष राहिले आहेत असें अनुमान होतें. सुदामा ब्राह्मण अतिशय दरिद्री होता तरी तो प-राकाष्ठेचा भगवन्निष्ठ होता. " शमोदमस्तपःशौचं क्षांति-रार्जवमेव च । ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावज-म् " हे ब्राह्मणाचे स्वाभाविक गुण सुदाम्यांत जागृत होते. त्याची स्त्री ही महा साध्वी, सुशीला होती. अशा दंप-त्याचें चरित्र वर्णन केलें असतां मुख्यत्वेंकरून सद्गुण व भगवन्निष्ठा ह्या दोनच गोष्टी उज्वळ करून दाखविल्या पाहिजेत; याशिवाय शरीर, स्थान, दारिद्र्य इत्यादि व-

र्णन केवळ अंगत्वेंकरून ह्मणजे सद्गुण व भगवन्निष्ठा हे गुण चांगले प्रकाशित होण्यास पुष्टिकारक तितकेंच वर्णावयाचें होतें. असें असतां पंडितांनीं वरील चरित्रास आरंभ केल्यापासून त्यांतील बहुतेक भाग, सुदाम्याचें झोंपडें, वस्त्रें, पात्रें, धान्य, शरीर, दारिद्र्य इत्यादि वर्णनांत घालविला असून बाकीचा कांहीं भाग वरील साधु सद्गुणी दंपत्याच्या स्वभावाविरुद्ध व अप्रयोजक भाषणांत आणि वर्णनांत खर्च केला आहे. ह्या गोष्टीचे वरच्या चरित्रांतील मासले पंतपंडितांच्या तुलनाप्रकरणांत पुढें दाखविण्यांत येतील.

आतां या चरित्रांत कांहीं गुण नाहीं असेंही नाहीं. स्वभावोक्ति व अलंकार आणि माधुर्यगुण या योगानें वामनाच्या इतर कवितांप्रमाणें यांतील कविताही कोठें कोठें मनोहर झाली आहे. श्रीकृष्ण आणि सुदामा यांची भेट झाल्यावर, बाळपणीं गुरुगृहवास व गुरुसेवा कसकशा प्रकारें घडली, याविषयींचें श्रीकृष्णाचें भाषण चांगलें साधलें आहे. तें असें:—

एकेदिनीं श्रीगुरुचे सतीनें ।
सांगीतलें कार्य अह्मास तीनें ॥
माते करूं वो ह्मणवोनि वाचे ।
बोलोनि गेलों शिशु मानवाचे ॥७० ॥
त्यानंतरें जात असों वनाला ।
शंका नवाटे पहतां मनाला ॥
भारे बहू बांधुनि इंधनाचे ।
घेतां शिरीं मोर समोर नाचे ॥ ७१ ॥

तों श्रांत झालों मग क्षुत्पिपासीं ।
वनामधें त्या पडलों उपाशीं ॥
तुं भक्षिसी चोरुनियां शिदोरी ।
शिंकीं वृथा दाविसि दीर्घ दोरी ॥ ७३ ॥
जलद गर्जत ये जंव अंबरीं ।
झळकते अणि वीज न ते वरी ॥
सुभय ते स्थळिं वाटतसे मनीं ।
फिरुनि येत असों जंव नेमुनी ॥ ७४ ॥
कडकडुनि तयीं तो वर्षला मेघ भारी ।
तनुवरि मग जो कां रोमराजी उभारी ॥
अशनवसनहीनें आननें म्लान दीनें ।
करुनि जंव बसों तों वेष्टिलें त्या नदीनें ॥ ७५ ॥
पहा रवीचा मग अस्त जाला ।
घडे तयीं व्याकुळता द्विजाला ॥
कांहीं तरी ठाऊक कीं सुजाणा ।
पुसे सुदाम्याप्रति देव जाणा ॥ ७६ ॥
केला कोप सतीवरी तदुपरी धांऊनि ये लौकरी ।
पायीं नग्न मिरीं खडे क्षितिवरी प्रेमा अह्मां किंकरीं ॥
हाका मारुनि अंबरीं मुख भरी रेरे सुदाम्या हरी ।
तों आह्मां वदनावरी मिठि पडे शीतें अहाहा करी ७७
मौनें सन्मुख जातसों श्रमतसों कंपीत कीं होतसों ।
ओझें मस्तकिं घेतसों हळुहळू पाऊल टाकीतसों ॥
विप्राला न दिसों उठों अणि बसों हुंकारही देतसों ।
पश्चात् भेटतसों पुसे तंव हंसों संतोष मानीतसों ॥७८॥

वामनाच्या काव्यांत बहुतकरून सर्वत्र माधुर्य आणि प्रसाद हे गुण दृष्टीस पडतात. ओजोगुणाचें व्यंजकपद्य बहुधा त्याच्या काव्यांत आढळत नाहीं. स्वभावोक्ति ह्या बहारदार व मनोरम अलंकाराचा वामनानें पुष्कळ ठिकाणीं उपयोग केला आहे. त्याचीं उदाहरणें अन्यत्र कांहीं आलींच आहेत यास्तव एथें आणखी देत नाहीं. अलंकाराचें साम्य चित्राशीं करितां येईल. इच्छेस वाटेल त्याप्रमाणें मनोहरत्वाची कल्पना करून तदनुरूप काढिलेल्या चित्रापेक्षां ईश्वरनिर्मित मूर्तिविशेषाप्रमाणें हुबेहुब काढिलेलें चित्र किती मनोहर व बहारीचें दिसतें! ही गोष्ट जुन्या चितार्‍यांनीं काढिलेलीं चित्रें आणि फोटोग्राफांतील चित्रें ह्यांची तुलना करून पाहिलीं ह्मणजे ढळढळीत दिसूं लागते. स्वभावोक्ति हा अलंकार फोटोग्राफांतील तसबीरीप्रमाणें विवक्षितव्यापाराचें हुबेहुब चित्र होय. वामन संस्कृतज्ञ महान् पंडित होता यामुळें त्यास स्वाभाविक संस्कृताची फार संवय लागली असावी व त्याच्या व्यवहारांतील भाषणांत देखील संस्कृत शब्दाची अतिप्रवृत्ति असावी असें वाटतें; परंतु त्याच्या कवितेंत तसें दिसत नाहीं. अप्रसिद्ध संस्कृत शब्द किंवा चार चार पांच पांच पदांचे लांब लांब समास त्याच्या काव्यांत बहुतकरून आढळत नाहींत. त्याच्या काव्यरचनेची शैली साधी, सरळ व सुबोध आहे. त्यानें निवडून वर्णन केलेलीं लहान लहान प्रकरणें कितीएक स्वभावतःच मनोरंजक आहेत व त्यांतील वर्णनही कितीएक स्थळीं बहारदार झालें आहे. काव्याच्या रीतीनें एकादें वर्णन करावें असा पंडितानें मुख्य हेतु धरून वर्ण-

न केलेलें दिसत नाहीं. केवळ ईश्वरगुण, सगुणनिर्गुणाचें ऐक्य आणि भक्तीचें महत्त्व हीं जगास दाखवावीं हाच त्याचा प्रधान हेतु होता. यामुळें त्याच्या बहुतेक प्रकरणांत भक्ति आणि शांत हे रस उत्कर्षानें वर्तत आहेत.

वामनानें मराठीभाषेंत संस्कृतांतील अक्षरगणांच्या वृत्ताप्रमाणें वृत्तें उतरण्याचा प्रथमच आह्मावर अनुग्रह केला. ही गोष्ट वामनाचे यमकांकडे विशेष लक्ष्य लागण्यास कांहीं कारण झाली असावी असें वाटतें. संस्कृत रचना स्वभावतः माधुर्य ओजादिगुणांनीं अति मोहक आहे, यामुळें तींतील पद्यांशीं मराठीभाषेंतील पद्यांची तुलना जेव्हां वामनानें करून पाहिली असेल तेव्हां मराठीभाषेंतील पद्य फिकें आहे असें पंडितास वाटून, श्रुतिमाधुर्यादि चमत्कृतीकरितां त्यांनीं त्यांत प्रासयमकांची योजना केली असावी, व यमकास दुसरेंही एक कारण असें असावें कीं, मुकुंदराज, ज्ञानेश्वर-आदिकरून महाराष्ट्रकवींनीं ओव्या, अभंग वगैरे छंदांत सर्वत्र पद्यांच्या चरणांचीं सारखीं अक्षरें योजिलेलीं आढळतात. तें अवलोकन करून अक्षरगणाच्या कठिण वृत्तास ही वामनानें यमकें मोठ्या परिश्रमानें व व्यापकपणानें योजिलीं आहेत. अनुप्रास यमकादि शब्दालंकाराविषयीं मराठीभाषेंत मोरोपंतानें तर सीमाच करून टाकिली आहे; तरी त्याला देखील वामनाचीं यमकें पाहून मोठा आनंद व विस्मय झाला होता:

"अन्यत्र नसे कवनीं यावे रस सर्व हा नियम कांहीं।
"केली भाषाकवि जे त्यांची तो गर्व हा नियम कांहीं॥

मोरोपंत. वा. पं. स्तु.

वामनाची वाणी मधुर, सरस आणि प्रौढ आहे, तरी व्याकरणशुद्धि, अर्थव्यक्ति, संमितत्व इत्यादि गुण तींत असावे तसे नाहींत. याविषयीं उदाहरणें पुढें देण्यांत येतील.

व्याकरण शुद्ध व गुणालंकारांनीं पूर्ण अशी भाषा लिहिण्याचें वामनपंडितास ठाऊक नव्हतें ह्मणून हीं वैगुण्यें त्याच्या कवितेंत राहिलीं असें कदापि ह्मणतां येणार नाहीं; तथापि ईश्वरसेवनानंदांत निमग्न होऊन निस्पृहतेचा अंगीकार केल्यानंतरच वामनानें महाराष्ट्र-भाषाकाव्य रचिलें आहे. तेव्हां जनोपहासाची पर्वा न-करितां त्यानें निर्जनाटवींतील मोकळ्या मनानें गायन करणाऱ्या पक्ष्याप्रमाणें आपला गुंजारवरूप काव्यबंध गाइला आहे. यामुळें ईश्वरनिर्मित पर्वत, नद्या, वृक्ष, पाषाण इत्यादि पदार्थांच्या अकृत्रिम आकाराप्रमाणें त्याची कविताही अकृत्रिमस्थितींतच राहिली असावी. असें अनुमान केलें तरी त्यास बाधक कारणें आहेतच. वामनाच्या कवितेस, अनुप्रासयमकादि प्रचुरशब्दालंकार व स्वभावोक्त्यादि अर्थालंकार यांनीं पुष्कळ कृत्रिमत्व आलें आहे. जेव्हां ग्रंथकारास किंवा कवीस जनोपहासाचें भय असतें तेव्हां त्याचे ग्रंथ किंवा कविता कृत्रिमतेनें ठाकठिकीच्या व बेताबाताच्या होतात. तुकाराम, नामदेव, रामदास इत्यादि साधुकवींची वाणी, केवळ निस्पृहता व जनोपहासाविषयीं निर्भयता या योगानेंच अकृत्रिम झाली आहे. मोरोपंत, मुक्तेश्वर, रघुनाथ पंडित यांचें तसें नाहीं. यांच्या काव्यांत ठाकठिकी व बातबेत साधलेला आहे. यामुळें त्यांच्या कविते-

चें कृत्रिमरूप आपोआप व्यक्त होत आहे. आतां कवितेची कृत्रिमस्थिति चांगली किंवा अकृत्रिमस्थिति चांगली, हा प्रश्न एथें सहज उत्पन्न होतो. आणि त्याचा विचार करणेंही प्रसंगोचित आहे. यास्तव आपण तिकडे वळूं.

प्रथम, वामनाची कविता केवळ तुकारामाच्या कवितेप्रमाणें मनांतून निघालेल्या कल्पनाओघाचा लोटच अशी बनली आहे, किंवा मोरोपंताच्या कवितेप्रमाणें त्या लोटास वारंवार पाहून पुनःपुनः मोडून घडून आपल्या व्यापकदृष्टीच्या पसंतीप्रमाणें बनविलेली आहे, ह्याचा निर्णय ठरविला पाहिजे. तुकारामाच्या अकृत्रिमवाणीची सर, वामनाची कविता करणार नाहीं व मोरोपंताच्या उत्तम कारागिरीनें बनविलेल्या वाणीसही ती सर्वांशीं पोहोंचणार नाहीं; असें सूक्ष्मावलोकन केलें असतां दिसून येतें. यास्तव यासंबंधानें असे तीन वर्ग करितां येतील.

१ स्वयंभु पर्वतादि.

२ कांहीं ओबड धोबड व भव्य असें कोरलेलें लेणें.

३ उत्तम कारागिरीनें बनविलेली मूर्ति किंवा इमारत.

यांत साधारणपणें पहिल्या वर्गांत तुकारामासारख्याची वाणी. दुसऱ्यांत वामनाची, आणि तिसऱ्यांत मोरोपंताची कविता घालितां येईल.

वामनानें कठिण वृत्तें घेतलीं; यमकांवर फार प्रीति ठेविली; दोषांची पर्वा केली नाहीं अथवा गुणांचा आदर केला नाहीं; यामुळें त्याच्या कवितेस सर्वत्र एकसारखी विशुद्धाकृति प्राप्त झाली नाहीं. जर त्यानें कठिण-

वृत्तें घेतलीं नसतीं, व शब्दालंकारावर अभिरुचि ठेविली नसती, तर त्याच्या कवितेस अकृत्रिमत्वाची सुंदर शोभा आली असती. व जेथें दोषांचा अनादर व गुणांचा आदर ह्या गोष्टीची पर्वाच नाहीं, तेथें शब्दालंकाराच्या व कठिणवृत्तांच्या बंधनांत तरी रहावयाचें नव्हतें; तसें वामनानें केलें नाहीं. दुसरें दोषांचा त्याग व गुणांचें ग्रहणही केलें नाहीं; यामुळें तिला कृत्रिमत्वाचें सौंदर्यही आलें नाहीं.

आतां कधीं कधीं असें होतें कीं, कविता कशी असावी, तिचे गुण कोणते, दोष कोणते, हें सर्व उत्तम रीतीनें समजण्याची एकाद्यास शक्ति असते; परंतु त्याप्रमाणें स्वतां त्यास काव्य बनवितां येत नाहीं; अशीं उदाहरणें पुष्कळच सांपडतील. काव्य बनविण्यास कांहीं स्वाभाविक शक्तिच असली पाहिजे ही गोष्ट जगन्मान्य आहे. दुसरें, स्वतांच्या कवितेचे अथवा ग्रंथाचे दोष ह्मणून ज्याचे त्यास दिसत नाहींत. कदाचित् त्यांच्या स्थूलत्वामुळें ते डोळ्यांसमोरच उभे राहिले आहेत असें वाटूं लागलें तर, त्यांचा फारसा विचारच करावयाचा नाहीं; उलटें तो दोष नाहीं असा पक्षपात करावयाचा, असा मनोधर्म आहे.

तिसरें, आपण रचून तयार केलेलें काव्य किंवा लिहिलेला ग्रंथ, पुनः पुनः तपासून शुद्ध करण्याचा कितीएकांस कंटाळा असतो. तेव्हां वामनपंडितास जरी चांगलें काव्य करितां येत होतें, व कवितेचे गुणदोष समजत होते तरी, त्यानें आपणाकडून होईल तितकी

काव्यशुद्धि केली आहे असें त्याच्या कितीएक प्रकरणां-वरून दिसत नाहीं.

आतां वरील वर्गांपैकीं कोणत्या वर्गांतील कविता चांगली ह्या प्रश्नाचा निर्णय ठरविला पाहिजे. तो वर दिलेल्या तीन प्रकारच्या उपमानांवरूनच चांगला ठरवितां येईल. स्वयंभू पर्वतादि पदार्थ पाहिल्याबरोबर मनास कांहीं विलक्षण आनंद होतो. त्याची अतिविशालाकृति; अनियमित वळणांनीं पडलेल्या भव्यदऱ्या व झालेल्या वृक्षरचना; भव्य, शांत आणि उदात्त असा देखावा; गंभीरध्वनि, प्रतिध्वनि; पक्ष्यांचे मधुर मंजुल शब्द; स्वच्छ वायू व उदकांचे प्रवाह ह्या सर्वांचें एकीकरण मनावर झालें ह्मणजे विस्मयादि विकारांनीं अंतःकरण विस्तृत होऊन आनंद पावतें. त्याप्रमाणें अकृत्रिम कवितेंतील कल्पनाप्रवाहांचे लोटचे लोट स्वयंभू पाहिले ह्मणजे अकृत्रिम मानसाची मूर्तिच पुढें उभी राहिली आहे; ती गुणदोषांची पर्वा करित नाहीं; टीकाकाराकडे किंवा दोष काढणाऱ्या दुर्जनाकडे ती ढुंकून पहात नाहीं; निर्गुण परपुरुषाकडे तिनें फेकलेले प्रेमरसपूरित लीलाकटाक्ष अवलोकन करून, गर्वपर्वतदुर्जनही द्रवीभूत होऊन क्षणभर सुलीनतेनें जिचें सेवन करित आहेत; जी आनंदांत निर्भय गायन करित आहे; पूर्वापर संगतीची संगती धरित नाहीं; लीलाभरांत आडवेतिडवे पाहिजे तसे शब्दावयव चंचल करित आहे; असें पाहिलें ह्मणजे तोही आनंद विलक्षणच होतो.

उत्तम कारागिरानें बनविलेली मूर्ति किंवा इमारत घ्या. अतिशय द्रव्य, कुशलता आणि काल खर्च करून

बनविलेल्या ताजमहालासारख्या इमारतींत जाऊन उभें राहिलें असतां, इहलोकीं मी स्वर्गभुवनांतील मंदिराचाच सुखानुभव घेत आहें कीं काय असें कोणास वाटणार नाहीं !! त्या इमारतीचा भव्य देखावा, तिची अतिसूक्ष्म व मनोहर कारागिरी, दिव्य शोभायमान पाषाणादि द्रव्यांची प्रमाणयुक्त जोडणी पाहून कल्पनेनें यथेच्छ मनांत आणिलेलें मनोराज्यांतील ऐश्वर्य व सौंदर्य मूर्तिमंत झालें आहे काय ! असा तर्क कोणाच्या मनांत येणार नाहीं बरें !! अशी वैभवासह शोभा व कुशलता पाहिली ह्मणजे तद्दर्शनानें जो आनंद होतो, त्यापुढें पर्वतादि स्वयंभू आकारविशिष्ट पदार्थदर्शनानें होणारा आनंद कांहीं कमी असावा; असें आह्मास वाटतें. त्याप्रमाणेंच महाकवींनीं केलेल्या कृत्रिम काव्याच्या अवलोकनानें ही अतिशय आनंद होतो व तो रसिकांस अकृत्रिम कवितावलोकनापासून होणाऱ्या आनंदापेक्षां अधिक होत असतो यांत कांहीं संशय नाहीं. वाल्मीकीच्या अकृत्रिम कवितेपेक्षां, भवभूति, कालिदास, बाण, जगन्नाथराय, माघ इत्यादिकांचें कृत्रिमकाव्य आल्हादजनक अधिक आहे असें कोण ह्मणणार नाहीं ! रानटी मनुष्याच्या उत्तम कल्पनेपेक्षां श्रीहर्षाची कल्पना उदात्त व आल्हादजनक अधिक आहे असें झोंपेंत देखील कोण चावळणार नाहीं !! एक बिनघडलेला संगमरवरी पाषाण आहे तो वस्तुतः दुर्मिळ, दर्शनीय आणि गुळगुळीत आहे ह्मणून त्याच्या अवलोकनानें आनंदच होईल; तथापि त्या पाषाणावर एकाद्या कुशल कारागिराची टाकी लागून त्याची सुंदर मूर्ति बनल्यानंतर, तिच्या अवलोक-

नानें जो आनंद होईल त्याचें महत्त्व फारच अधिक आहे हें सांगावयास नको. तसें ईश्वरदत्त कविता प्रसवण्याची बुद्धि, उभय प्रकारच्या कवींस सारखीच असते; परंतु पहिल्यास शास्त्रकौशल्यादि शिक्षण नसतें आणि दुसऱ्यास तें असतें, इतका फरक असतो. तेव्हां शिक्षित लोकांनीं केलेल्या कार्यापासून होणारा आनंद, अशिक्षित लोकांनीं केलेल्या कार्यापासून होणाऱ्या आनंदापेक्षां खचित अधिकच होईल. अर्थात् तत्त्वदृष्टीनेंही अकृत्रिमकवितेपेक्षां कृत्रिमकाव्य चांगलें असें सिद्ध होतें.

वर दोन प्रकारांची परस्पर तुलना करून पाहिली; त्यावरून स्पष्टच झालें कीं, राहिलेली तिसऱ्या प्रकारची कविता मध्यमांत गणिली जाईल.

वामनपंडिताची संपूर्ण कविता, वर सांगितलेल्या कोणत्या एकाच वर्गांत घालतां येईल असें वाटत नाहीं. कारण भामाविलास, भीष्मयुद्ध, रुक्मिणीविलास, सीतास्वयंवर, भरतभाव, हरिविलास, नामसुधा, ब्रह्मस्तुति इत्यादि प्रकरणांतील पुष्कळ पद्यें फार चांगलीं साधलीं आहेत. यास्तव त्यांची उत्तम काव्यांत गणना करावयास कांहीं हरकत नाहीं. माधुर्य व प्रसाद या गुणांत तर वामनाची वरील कविता मोरोपंताच्या काव्यापेक्षां पुष्कळ चांगली आहे असें आह्मास वाटतें. याविषयीं विशेष विचार मोरोपंत आणि वामनपंडित ह्यांच्या तुलनाप्रकरणांत करितां येईल.

तुकारामाप्रमाणें वामनाच्या मनाचा मूर्तिमंत ओघच कविता बनला असें यथार्थदीपिकेशिवाय दुसरें कोण-

त्याही प्रकरणांत शोधल्यास आढळणार नाहीं. यथार्थदीपिकेंत मुळीं कवितात्मक भाग फारच थोडा आहे, यामुळें वामनाची कविता तुकारामाच्या कवितेच्या वर्गांत फार थोडी जाईल. व बाकी राहिलेल्या दोन वर्गांत तिचा मोठा भाग समाविष्ट होतो, तथापि वामनाचीं जीं पद्यें कवितेंत मोडलीं जातात त्यांत मध्यम प्रतीच्या कवितेचा भाग अधिक निघेल असें वाटत नाहीं; उत्तम कवितेचीच संख्या अधिक होईल असा अजमास आहे.

संस्कृत साहित्यांत उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे काव्याचे तीन विभाग करून, व्यंग्यार्थ प्रधानकाव्यास उत्तम मानितात. वामनाच्या ग्रंथांत व्यंग्यार्थ प्रधान कविता क्वचित् निघाली तर निघेल. वस्तुतः तसें काव्य करण्याच्या हेतूनें वामनानेंच काय परंतु महाराष्ट्रभाषेंतील एकंदर कवींतून कोणीच कविता केलेली आढळत नाहीं. तथापि मराठींत शब्दवैचित्र्य, अर्थवैचित्र्य, आणि उभयवैचित्र्य अशाच कवितेचा मासला सर्वत्र असल्यामुळें, त्या मानानें वामनाच्या कवितेविषयीं निर्णय करितांना तीस आह्मी उत्तमादि विशेषणें दिलीं आहेत. ध्वनिकाव्य उत्तम किंवा तादितर उत्तम ह्या गोष्टीचा विचार करण्याचें प्रस्तुत कारण नाहीं. यास्तव तो विचार तसाच ठेवितों.

वामनानें वर्णिलेला श्रृंगार फार साधा आणि भक्तिमिश्रित आहे. तो बहुधा भगवान् श्रीकृष्ण ह्याच्या लीलावर्णन प्रसंगींच त्यानें भक्तिपुरःसर वर्णिला आहे. यामुळें सहजच तो पवित्र, सुनिर्मल, प्रेमनिर्झरांनीं भरलेलें पुण्यसरोवरच बनला आहे. वामनाच्या श्रृंगारास पापवासनेचा वास नाहीं इतकेंच नाहीं तर, विश्वात्मा

श्रीकृष्ण याविषयीं जी त्याची निःसीम व पवित्र प्रीति तिच्या पुण्याचा त्यास घमघमाट सुटला आहे.

ग्रंथाचे गुणदोष दाखवितांना शृंगाराचीं कांहीं उदाहरणें देण्यांत आलीं आहेत; तथापि ज्यांत शृंगार उत्कर्षानें वर्तत आहे अशा रासक्रीडेंतील मासला अवश्य पाहिला पाहिजे. यास्तव त्यांतील थोडे वेंचे घेतों.

कालिंदी-तट-वाळुवंट गगनीं संपूर्ण तारापती ।
कल्हारीं कुमुदोत्पलीं अलि शरत्कालीं जलीं गुंजती ॥
वारा मंद सुगंध शीतल फुलें नानातरू शोभती ।
ऐशा यामिनि गोपिका हरिसवें रासोत्सवीं क्रीडती ॥२॥
रूपें तीं स्मर कल्पवृक्षहरिचीं गोपांगना त्या लता ।
कीं ते मेघसमूह त्या चमकती त्यांमाजि विद्युल्लता ॥
कीं तारायुवती अनंत गगनीं मूर्तीमधें नीलता ।
जेव्हां एकचि तेधवां उडुगणीं भू चंद्रमा खालता ॥७॥
गोऱ्या गौळिणि सांवळ्या हरितनू रासोत्सवीं नाचती ।
श्रीगंगे यमुनेमधें तरल ते कल्लोल आंदोलती ।
गोपीलोचन मीन लोलमकर श्रीकुंडलें डोलती ॥
गोपस्त्री कुचकुंभतारक करी पोंहे रतीचा पती ॥ ८ ॥
कोणी लाविति नाचतां मुखमुखा तांबूल त्यांचे मुखीं ।
कोणी मानवला हरी मजवरी ऐशाच भावें सुखी ॥
त्यांच्या देखुनियां कळा स्तुति करी त्या त्या गुणासारखी।
जे ते आवडती ह्मणे मज अशी नाहीं दुजी आणखी १०
कोणी श्रीभुजदंड हुंगिति गळां जे आपुल्या घातले ।
जे स्वाभाविकही सुगंध अगरु श्रीचंदनें चर्चिले ॥

कोणी श्रांत कुचावरी करतल श्रीमूर्तिचें ठेविलें ।
कोणी ओष्ठहि नाचतां मुख मुखीं घालूनि आस्वादिले ॥
गांठी कंचुकिच्या जगद्गुरुकरें गोपींचिया सूटल्या ।
ग्रंथी चिज्जड त्या अनादि रचिल्या त्याही अहो तूटल्या॥
कृष्णाच्या अधरामृतें अमरता तात्काळ त्या पावल्या ।
नीवीमोक्ष मुकुंदहस्तकमळें तो मोक्ष त्या लाधल्या॥ १५॥
नेले राजस राग ते अधरिंचे श्रीवल्लभें चुंबनें ।
दृष्टींतील निरंजनें हरपलीं जीं तामसें अंजनें ॥
जें कां चंदनसत्वही हरि हरी त्यांचें निजालिंगनें ।
केल्या निर्गुण त्या रतांतसमयीं गोपी जगज्जीवनें॥ १६॥

रासक्रीडा.

भागवतरामायणांतील रामचंद्राच्या अयोध्यानगरीचें वर्णन, द्वारकाविजयांतील श्रीकृष्णाच्या भुवनाचें व बागबगीच्याचें वर्णन, वेणुसुधेंतील वेणुरवाच्या माधुर्यातिशयाचें वर्णन, विश्वासबंधांतील अद्वैतबोध, भीष्मयुद्धांतील रौद्र, वीर, वात्सल्य, सीतास्वयंवरांतील शृंगार, वामनचरित्रांतील अद्भुत, ब्रह्मस्तुतींतील भक्ति, इत्यादि अनेक स्थळीं वामनानें काव्यरीतीनें फार चांगलीं वर्णनें केलीं आहेत. त्यांचा उतारा ऐथें देण्यास स्थलावकाश नाहीं. यास्तव मासला पहावयाची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं वर लिहिलेले ग्रंथ अवलोकन करावे ह्मणजे त्यांस आह्मी ह्मणतों याप्रमाणें प्रतीति येईल.

हीं माधुर्य व प्रसाद यांचीं उदाहरणें पहाः—

रघुपति अति शोभे पुष्पकीं व्योमवाटे ।

द्विज गुरु सहनेत्रा उत्पलीं सोम वाटे ॥
नटति युवति गाती कीर्ति बंदी विमानीं ।
प्रियतम जन आत्मा आपुला जेविं मानी ॥२१॥

त्रेतायुगीं कृतयुगापरि काळ जाला ।
देखूनि राज्य करितां रघुवंशजाला ॥
धर्मज्ञराम सुख दे सकळां प्रजांला ।
प्रेमें प्रजा भजति त्या भरताग्रजाला ॥ २८ ॥

पदयुग मृदु जें कां पल्लवा-तुल्य वाटे ।
तदपि तुडवि कांटे दंडकारण्यवाटे ॥
स्मरत चरित त्याला ठेवुनी तोचि ठेवा ।
गमन करि मनीं ते लोकहो पाय ठेवा ॥ १९ ॥

भागवतरामायण.

गर्भांत अर्भक जरी जननीस लाता ।
ह्मणी तयास हरि काय करील माता ॥
हें विश्व आणि कमळासन अंडकोटी ।
यांतील काय मज सांग तुझ्या न पोटीं ॥ ४० ॥

धन्या अहो व्रजवधू व्रजलोक गायी ।
ज्यांच्या स्तनें करुनि तृप्त सुधाब्धिशायी ॥
प्यालासि वत्स सुत होउनियां जयांचीं ।
दुग्धें न वर्णवति धन्यपणें तयांचीं ॥ ६३ ॥

अहो धन्य गौळी अहो धन्य नंद ।
व्रजीं सर्वही धन्य हो प्राणि-वृंद ॥

अहो भाग्य यांचें अहो भाग्य यांचें ।
सखे सोयरे ब्रह्म कृष्णाख्य ज्यांचें ॥ ६७ ॥

ब्रह्मस्तुति.

वेणुध्वनी तो सुरगायकांनीं ।
त्यांच्या विमानांतचि बायकांनीं ॥
आश्चर्य कानीं पडतांचि केले ।
न तृप्त ज्यांचें मन हें भुकेलें ॥ १ ॥
मोहती व्रज-पशू-मृग-गाई ।
आमुचें नवल काय अगाई ॥
स्तब्ध होति लिखितें जशिं चित्रें ।
वेणुच्या ध्वनिरसेंचि बिचित्रें ॥ २ ॥

वेणुसुधा.

हा प्रास यमकांचा मासला पहाः—

गजगती जगतीप्रति दाविते ।
वसुमती सुमती सुख भाविते ॥
स्वतनुजा तनु जाणतसे धरा ।
नवरि ते वरिते मणिकंधरा ॥ ५८ ॥
नवसुधा वसुधा-तनया स्मरा ।
जनमनीं नमनीं वश जे स्मरा ॥
स्वपति तो पतितोद्धर तो खरा ।
नवरि ते वरिते रघुशेखरा ॥ ५९ ॥

सीतास्वयंवर.

वामनपंडिताच्या कवितेंत च्युतसंस्कृति, विसंगति,

अप्रयोजकत्व, ग्राम्यत्व इत्यादि दोष बरेच आहेत, ह्मणून आह्मी वर दर्शविलें आहे. त्या दोषांच्या संबंधानें त्याच्या कवितेचीं कांहीं उदाहरणें येथें देऊन स्पष्टता करितों.

ही उपमा किती विसंगत आहे पहाः—

सुदाम्याच्या धामीं किमपिहि नसे अर्थ भलता।
पहातां वायूची सदनिं दिसते कीं प्रबलता॥
तृणें पर्णें जीर्णें करुनि शतछिद्रें मिरवलें।
जणों गंधर्वाचें नगर नभिं जैसें उगवलें॥

सुदामचरित्र.

संध्यासमयीं सूर्यरश्मीच्या योगानें चित्रविचित्र रंगांचे मोठमोठाले भव्य व सुशोभित मेघसमुदाय आकाशांत दिसतात त्यांस गंधर्वनगर असें ह्मणतात. वरील पद्यांत सुदाम्याच्या तुटक्या झोंपडीस गंधर्वनगराची उपमा दिली आहे. परंतु कोणत्याही प्रकारें झोंपड्याशीं त्या नगराचें सादृश्य होत नाहीं. पहा, गंधर्वनगर क्षणभंगुर, भव्य, विस्तृत, शोभायमान, तेजस्वी असें प्रसिद्ध आहे. यांतून झोंपड्यांत एक तरी गुण आहे काय ! क्षणभंगुरत्व मानिलें तर अनेक वेळां मोडत असलेलें झोंपडें पुनः पुनः बांधण्याचा खर्च करण्यास सुदाम्यास सामर्थ्य होतें, असें होऊन त्याचे दारिद्र्यातिशयास वैय्यर्थ्य येऊं पहातें. यास्तव असें मानणें बरोबर होणार नाहीं. भव्य, विस्तृत, शोभायमान, तेजस्वी असें झोंपडें होतें ह्मणून मानल्यानें वर्णनीय हेतूस उघड विरोध दिसतो. मग ही उपमा पंडितानें कां घेतली हें कळत

नाहीं. वारा इकडून तिकडे वाहणें व अर्थ नसणें ह्या गोष्टींचेंच गंधर्वनगराशीं सादृश्य केलें असल्यास, काव्याच्या रीतीप्रमाणें या साम्यांत यत्किंचित्‌ही चमत्कार नाहीं. हें सहज समजण्यासारखें आहे.

वरील पद्यांत व्याकरणसंबंधी व कवितालक्षणसंबंधी आणखी दोष आहेत. "सदनि" "नभि" हीं सप्तमीचीं रूपें दीर्घ इकारांत पाहिजे होतीं तीं र्‍हस्व केल्यामुळें अशुद्ध झालें. "कीं" हें निरर्थक जास्ती. "जणों" आणि "जैसें" हे दोन्ही शब्द अनुक्रमें उत्प्रेक्षा आणि उपमा दाखविणारे आहेत. तेव्हां उत्प्रेक्षा करणें झाल्यास "जैसें" हा शब्द जास्ती आहे, व उपमा करणें झाल्यास "जणों" हा शब्द जास्ती आहे. "नभि जैसें" हे शब्द काढून "अवकाशीं" असा शब्द घातला तर बराच दोष कमी होईल असें वाटतें.

द्वारकाविजय सर्ग दुसरा यांत भगवान् श्रीकृष्ण ह्याच्या भुवनाचें वर्णन ३३ साव्या श्लोकापर्यंत उत्तम रीतीनें करून ३४।३५। ३६ या श्लोकांत, ईश्वरगुण वर्णन करण्यास उत्तेजन दिलें आहे. येथपर्यंत वर्णनीयरसास कांहीं विपर्यास आला असें वाटत नाहीं. परंतु ३७। ३८ या श्लोकांस आरंभ झाला ह्मणजे लागलाच रसविपर्यास होतो. विश्वभूषण अशा श्रीकृष्ण भुवनाचें अत्यानंददायक वर्णन अवलोकन करून, त्या आनंदभरांत निमग्न असतां ३७। ३८ श्लोकांतील काकतीर्थाची व्याख्या पाहिल्याबरोबर, आनंद जाऊन किळस येऊं लागते; हा या ठिकाणीं मोठा दोष आहे. हें वरी-

ल ग्रंथ वाचल्यानें चांगलें लक्षांत येईल. उदाहरणें दाखविण्यास येथें स्थलावकाश नाहीं.

च्युतसंस्कृति अथवा संस्कारहीनत्वादि दोषः—

श्रवण कीर्तन माधववंदनें ।
जळति पूर्विल पापहि काननें ॥
विधिकरांप्रति यास्तव ये रिती ।
वदतसे यम संयमनीपती ॥ ४ ॥

नामसुधा.

यांत "पापकाननें" असा समास इष्ट असून त्यांतील पाप आणि काननें या दोन पदांमध्यें "हि" हें निरर्थक अक्षर घुसडून दिलें. या योगानें केवळ संस्कारहीनत्वाचाच दोष झाला इतकेंच नाहीं, तर संस्कारहीन अशा महाराष्ट्रभाषेंत जो शब्द वापरण्याची रीति नाहीं तशा शब्दाची कवितेंत योजना केली !!

"पापहिकाननें" या ठिकाणीं "पातककाननें" असा शब्द घातला असता तर च्युतसंस्कृतीचा दोष झाला नसता अथवा "पातककाननें" असाच मुळचा पाठ असून लेखकप्रमादानें त्या ठिकाणीं "पापहिकाननें" झालें असेल असेंही संभवतें.

दुसरें, श्रवण, कीर्तन, माधव-वंदन याकारणानें पातककाननें जळतात असें कार्य वर्णिलें आहे; कारणांत दाहक शक्तिप्रदर्शक पद मुळींच नाहीं, यामुळें न्यूनपदत्वादि दोष होतात.

ऐसें असोनिहि मुखीं हरिनाम आलें ।
नेणीं महासुकृत कोठुनि हें उदेलें ॥

मी तो स्वयें पतित निर्लज विप्रहंता ।
होणार काय मज हें न जयासि चिंता ॥ २४ ॥
करिन कीर्तन मी दिनयामिनी ।
स्फुरति कामगृहें सुत कामिनी ॥
जसजसें सुख होइल कीर्तनीं ।
तसतसा मग निर्लज नर्तनीं ॥ ३९ ॥
"अशांत हरिदास ते नयीन चौघही देखिले" ४४
" जसे चौघ ते पांचवा विप्र झाला." ॥ ४९ ॥
"तयाचेच ते चौघही दूत आतां " ॥ १ ॥
" तुझि मनोहर जे नर देखिले " ॥ ८ ॥
" जगिं अदृश्यपणें जन लक्षिती " ॥ १० ॥

नामसुधा.

वरील पद्यांत "निर्लज" "चौघ" "तुझि" आणि "जगिं" हे शब्द संस्कारहीन आहेत. यामुळें च्युतसंस्कृति हा दोष झाला. अशा प्रकारचे दोष पंडिताच्या काव्यांत पुष्कळ ठिकाणीं आढळतात.

स्वयें ईश सर्वज्ञही उद्धवातें ।
पुसे नीति वंदूनि त्या माधवातें ॥
तयाच्या वदों त्याच दिव्या कथार्था ।
शुक-व्यास-उक्ती वदोनी यथार्था ॥ १ ॥

मुकुंदविलास.

यांत "ईश" "सर्वज्ञ" हीं विशेषणें माधवाचीं असतां, माधवास व त्या विशेषणास जोडणारा शब्द एकं-

दर पद्यांत कोठेंही न आल्यामुळें अर्थसंदर्भात व्यामोह होतो. व न्यूनपदत्वादि दोष होतात.

या ठिकाणीं:-

"स्वयें ईश सर्वज्ञ जो उद्धवातें।
"पुसे नीति वंदूं तया माधवातें॥"

अशी दुरुस्ती केली तर कांहीं बरें होईल.

घे ज्या गृहींच उचलूनि अधोक्षजाला।
बेडी निघोनि अति सत्वर मोक्ष झाला॥
माया तयाच सदनीं भरि शृंखळाला।
जागे करी स्वरुदितेंचि तया खळाला॥ २४॥

कृष्णजन्म.

यांत पहिल्या व शेवटल्या चरणांतील चकार निरर्थक अधिक आहेत. पहिल्या चरणांत "गृहींच" या ठिकाणीं "गृहांत" असा शब्द आणि चौथ्या चरणांतील "चितया" एथें "सकळा" असा शब्द घातला असतां वरील पद्याची बरीच शुद्धि होईल.

अप्रयोजकत्व, अश्लीलत्व, ग्राम्यत्व हे दोष वामनाच्या सुदामचरित्रांत बरेच सांपडतात. ते एथें आणखी विस्तारभयास्तव देत नाहीं. वर दाखविलेच आहेत.

छंदोभंगही अनेक स्थळीं आढळतो.

विराटपर्व अध्याय १

"प्रमाण संवत्सरं द्वादशाचें" १०
"आज्ञा निमित्तं श्रम होति समग्र ज्यातें" १८
"संगीत नृत्य शिकवी निजक्षि प्रसंगी" २२

" सारोनि स्नानादिक पांडवांही " ७८

" तो युधिष्ठिर स्तवी समवर्ती " ८०

अध्याय २

" ऐकोनि प्रश्ना द्विज सत्तमानें " १०

" महा थोर प्राकार दुर्गास चित्रें " ११

विश्वासबंध

" तैशाच ब्रह्मउदधींतिल विश्वगारा " ९

" मनातीत पाहे जगीं एक द्रष्टा ॥

" नमस्कार माझा तया योगभ्रष्टा " ॥ १८ ॥

वरील चरणांत अशा खुणा केल्या आहेत तितक्या ठिकाणीं छंदोभंग झाला आहे हें सुज्ञांस तेव्हांच कळेल.

संस्कृतभाषेच्या नियमाप्रमाणें सामासिक शब्दांचे संधी करणें अवश्य असतां ते केले नाहींत असें वामनाच्या कवितेंत पुष्कळ ठिकाणीं आढळतें.

" आकाशा अंत नकळूनिहि अंतरिक्षीं "

नामसुधा.

" तैशाच ब्रह्मउदधींतील विश्वगारा "

विश्वासबंध.

" बारे मोहन अस्त्र मुक्त कुरुचे जाल्या दळाधीपते " ४

" विधी अंडीं ऐसा नरमाणि न जाणे रणविधी " ५३

विराटपर्व अ० ८

संस्कृत आणि प्राकृत शब्दांचा समास करणें, संस्कृत शब्दांचीं रूपें बदलणें इत्यादि अनेक प्रकारचे दोष वामनाच्या ग्रंथांत सांपडतात. ते विस्तारभयास्तव एथें देत नाहीं.

वामनपंडिताच्या ग्रंथांतील व काव्यांतील गुणदोषांचा विचार केला तर, पूर्णिमेच्या शरच्चंद्रांतील कलंकाप्रमाणें त्याचे दोष, गुणप्रकाशकिरणांनीं झांकून जातात; इतकेंच नाहीं तर ते त्याच्या ग्रंथास कोठें कोठें उलटे शोभा देणारेही होतात. बुद्धिपूर्वक ठाकठिकीनें रचना केली असतां ती दोषरहित होते खरी; परंतु वर्णनीय विषयांत निमग्न व तल्लीन होऊन उद्गाराबरोबर जे शब्द बाहेर पडतात त्यांच्या योगानें झालेल्या रचनेसारखी ती रसाळ होत नाहीं. वामनानें केलेलीं वर्णनें सर्व तन्मय होऊन केलीं आहेत; यामुळें तीं फार रसभरित झालीं व दोषांनीं त्यांस कोणत्याही प्रकारें न्यूनत्व आलें नाहीं असें मानण्यास हरकत नाहीं.

कवित्वशक्ति आणि ग्रंथरचना ह्यांच्या संबंधानें वामनपंडित आणि मोरोपंत ह्यांची तुलना करणें हें अपूर्व व अभिनंदनीय काम आहे. कुशाग्रबुद्धीच्या वर्गांपैकीं ब्राह्मणजातीच्या लोकांतलेच दोघेही असून, दोघेही पहिल्या प्रतीचे संस्कृतज्ञ, एक महापंडित, व दुसरे बाणेदार कारकून; दोघेही महाराष्ट्रभूमीचे पुत्र असून,

---

१ संन्याशाचें सोंग संपादिलें सांग ॥ वैराग्याचें आंग आणितां नये ॥ १ ॥ चातुर्याचे योगें कवित्व करिती सांग ॥ प्रसादिक रंग आणितां नये ॥ २ ॥

ज्ञानदेवकृत अभंग.

महाराष्ट्रजननीस प्रकाशांत आणणारे कुलदीपकच; दोघांच्या कालांत शतकाचें अंतर आहे तरी, सांप्रत जगन्नाटकांतील पात्रांमध्यें लोकांनीं त्यांस एकासनावर बसविलें आहे. जर जुनाकाळ व जुनी स्थितिच कायम असती, जुने कवी आणि ग्रंथकार ह्यांचीं चारित्रें शोधून काढून त्यांचा ग्रंथद्वारा समुद्धार करावा, असा राजाकडून विद्यादान, ग्रंथोत्तेजन या योगानें आश्रय मिळाला नसता, व आणखी एकादें दुसरें शतक निघून गेलें असतें तर, ज्याप्रमाणें आपले महाकवी कालिदास आणि भवभूति ह्यांची काव्यसंबंधानें लोकांनीं स्पर्धा कल्पिली, व ते समकालीन होते असें निःसंदेह ठरवून ठेविलें आहे, तोच प्रकार वामनपंडित आणि मोरोपंत यांजविषयींही झाला असता.

हे महाराष्ट्रकवी अल्पकालांतच लोकप्रिय झाले. त्यांच्या कवितांशीं जसजसा लोकांचा अधिकाधिक परिचय होत चालला, तसतसी त्यांची लोकप्रियता अधिक वाढत चालली आहे. पंडितांनीं आपल्या विद्याबलानें विद्यापीठ जें श्रीकाशीक्षेत्र तेथील पंडितांस जिंकिलें. व पंतांनीं आपल्या कवितासौंदर्यानें त्या क्षेत्रांतील विद्वानांस मोहित केलें. अशा प्रकारचे हे दोघेही सांप्रत कालांतील अप्रतिम प्रख्यात ग्रंथकार व कवी आहेत.

---

१ वामनाचा मरण शक १५९५. व मोरोपंताचा शके १७१६ आहे. २ मोरोपंत शके १७१० त काशीस गेला. तेव्हां त्यानें आपली कविता बरोबर नेली होती, ती काशींतल्या पंडितांनीं पसंत केली असें म्हणतात. जुनें नवनीत.

गीति. ज्या उपजतांचि गेल्या काशी रामेश्वरा नमायाला ॥ आर्या या प्रौढपणीं जगतीतल हें पुरें न मायाला ॥ १ ॥ बाबापाध्ये.

तेव्हां त्यांची एकमेकांशीं तुलना करणें हें मोठ्या महत्त्वाचें व अभिनंदनाचें कार्य आहे, असें कोण ह्मणणार नाहीं ?

कवित्वशक्ति ह्मणजे पद्यांत ग्रंथ लिहिण्याची शक्ति, अशी लोकांची साधारण समजूत पुष्कळ दिवसांपासून होती, व ती वामनपंडिताच्या आणि मोरोपंताच्या वेळीं ही चांगल्या रीतीनें प्रघातांत होती असें वाटतें. कारण, त्या वेळीं गद्यांत ग्रंथ लिहिण्याचा कोणत्याही विद्वानानें यत्न केलेला आढळत नाहीं, आपण कवि होऊन बुद्धीचा व भाषेचा जो अति उत्कृष्ट परिणाम त्यास पात्र व्हावें, अशी प्रत्येकास इच्छा असते. तिच्या तृप्त्यर्थ त्या काळीं सर्वत्र पद्यांत लिहिलेले ग्रंथ मात्र आढळतात. ज्यांत कांहीं अर्थ नाहीं, रस नाहीं, आनंदजनकता नाहीं, अशा गोष्टींनीं भरलेलीं हजारों पद्यें दृष्टीस पडतात; परंतु त्या सर्वांस सरसकट कविता असें नांव दिलेलें आढळतें. आलिकडे ह्या तत्त्वावर पुष्कळ ठिकाणीं पुष्कळ विद्वान् लोकांनीं वाटाघाट केल्यावरून, वरील संशय बहुतकरून सर्वत्र दूर झाला आहे असें वाटतें. तथापि कवित्वशक्ति ह्मणजे काय ह्याची व्याख्या एथें प्रदर्शित करणें अवश्य आहे. कारण, कोणत्या तत्त्वावर वरील पंतपंडित यांची आह्मी तुलना करितों हें त्यावरून चांगलें लक्ष्यांत येईल.

आतां प्रथम कविता कशास ह्मणतात तें पाहूं.—

“ तददोषौ शब्दार्थौ सगुणावनलंकृती पुनः क्वापि. ”

“ क्वापीत्यनेनैतदाह यत् सर्वत्रसालंकारौ क्वचित्तु स्फु-
“ टालंकारविरहेपि न काव्यत्वहानिः ”

काव्यप्रकाश.

" रसप्रधानाः शब्दार्था गुणालंकारवृत्तयः
" रीतयश्चेयती शास्त्रप्रमेयं काव्यपद्धतिः "

प्रतापरुद्र.

" निर्दोषा लक्षणवती सरीतिगुणभूषणा
" सालंकाररसानेकवृत्तिर्वाक्काव्यनामभाक् "

बृहत्चंद्रालोक.

याप्रमाणें साहित्यशास्त्रांत वेगवेगळ्या ग्रंथकारांनीं थोडाबहुत फरक करून काव्याचें एकसारखेंच लक्षण केलें आहे. त्या सर्वांचा सारांश काढून व्यापकपणानें काव्याचें सर्व साधारण लक्षण असें करितां येतें कीं, " इष्टरसांची पुष्टि करणाऱ्या निर्दोष शब्दार्थांची व चमत्कारिक कल्पनांची वाक्यपंक्ति " ती कविता होय. मग ती गद्यांत असो किंवा पद्यांत असो, त्यामुळें काव्यत्वांत कांहीं फरक होत नाहीं.

आतां काव्यप्रकाशादि ग्रंथांत गुणालंकारादिकांनीं युक्त असलेली वाणी कविता ह्मणून व्याख्या वाढविली आहे; परंतु इष्टरसाच्या पुष्टीला जें साहित्य लागावयाचें त्यांत गुणालंकारादिकांचा अंतर्भाव होतो, यामुळें ते लक्षणांत पृथक्‌पणें दाखवून व्याख्या वाढविण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. यास्तव आह्मी वर केलेल्या व्याख्येप्रमाणें काव्य रचण्याची जी बुद्धिशक्ति, तिला कवित्वशक्ति असें ह्मटलें पाहिजे.

आतां इष्टरसांची पुष्टि कशानें होते ह्याचा सूक्ष्म वि-

---

१ " इष्ट रसात्मक वाक्यपंक्ति. " इतकेंच कवितेचें लक्षण व्यापक होतें.

चार केला तर, प्रसादादि गुण, उपमा, स्वभावोक्ति, यमकानुप्रासादि अलंकार यांच्या योगानें रसांची पुष्टि होते. तथापि काव्यत्वास चमत्कृतिजनक कल्पनांचीच आवश्यकता आहे. यास्तव ज्याच्या ग्रंथांत मनास चमत्कृति देणाऱ्या कल्पना व गुणालंकार चांगले व पुष्कळ असतात तो उत्तम कवि होय.

काव्याचा आत्मरस असून, इष्टार्थ दाखविणारी जी पदरचना तें काव्याचें शरीर आहे असें मानितात. यास्तव ज्यांत इष्टरस भरला आहे अशी जी पदावलि तेंच काव्य. प्रकृत पंतपंडित ह्यांच्या ग्रंथांची काव्यसंबंधानें तुलना करितांना काव्यत्वाकडे विशेष सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें पाहिजे. काव्याच्या उपमेस आपण फल घेऊन पाहूं. फलाचें शरीर आणि त्यांतील रस यांत स्वभावतः पृथक्पणा नसून पृथक्भाव ज्याप्रमाणेंच प्रतीतीस मात्र येतो; त्याप्रमाणेंच काव्याचें शरीर आणि त्याचा आत्मा (रस) ह्यांचा एकमेकांशीं संबंध आहे.

बीजाप्रमाणें वृक्ष तयार होऊन त्यास त्या जातीचें फल ह्मणून येतेंच. व कोणत्याहि फळाला कांहीं तरी एका प्रकारचा रस असतोच. तेव्हां कोणत्याही रसाचें जसें फल तसें कोणत्याही रसाचा वाक्यसमुदाय काव्य होय, असें ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं.

ही गोष्ट पृथक् पृथक् वाक्यास किंवा पद्यास तीं निरनिराळीं पाहिलीं असतां मात्र लावितां येईल. जसें एकादें फल सहज रीतीनें पहाण्यांत आलें असतां त्याची फलत्वसंबंधानें गणना करितां येते. तसें सामान्यत्वेंकरून स्फुटपद्यही कवितेंत गणितां येईल. परंतु तीं पद्यें

जेव्हां एकाद्या ग्रंथांत गोंविलीं जातात तेव्हां त्यांचा विचार भोजनपात्रांतील पदार्थसमुदायाच्या उपमेनें केला पाहिजे.

लोकांस रुचणारे व लोकांपुढें मांडण्यास योग्य अशाच रसांचीं फळें भोजनपात्रांत मांडिलीं जातात. त्याप्रमाणें ग्रंथांतही लोकमान्य रसांचीं पद्येंच घातलीं पाहिजेत.

फळास किंवा हरएक रसाळ पदार्थास कुजकेपणा, कीड, अपरिपक्वता इत्यादि वैगुण्यें असलीं तर, मेजवानीच्या भोजनांत तीं जशीं स्वभावतः दूषित व उपहासार्ह होतात; त्याप्रमाणेंच ग्रंथांतील वाक्यें किंवा पद्यें, शब्ददोष, अर्थदोष, अलंकारदोष, व्याकरणदोष इत्यादि कारणांनीं दूषित व उपहासास पात्र होऊन, त्या योगानें सर्व ग्रंथच दूषित होऊन जातो.

याप्रमाणें कवितेचें रूप व तत्त्व आहे, तेव्हां कवित्वशक्तीच्या संबंधानें पंतांची आणि पंडितांची तुलना करितांना हें कवितेचें रूप आणि तत्त्व मनांत ठेविलें पाहिजे.

आतां ही तुलना करण्यापूर्वीं पंडित आणि पंत ह्यांची स्थिति, कवित्वशक्तिप्रदर्शनार्थ त्यांस कसकसी अनुकूळ अथवा प्रतिकूळ होती तें पाहूं.

वामनपंडित हे खरोखरच महान् पंडित होते. त्यांजला संस्कृतविद्याध्ययनाखेरीज बाकी सर्व व्यवहार साधारणच माहित असतील. ही गोष्ट शुद्ध शास्त्री, पंडित ह्यांच्या व्यवहारज्ञानावरून आपणास खचित मानितां येईल. व्यवहार ज्यास चांगला समजत नाहीं, त्यास मानसशास्त्राचीं मर्में समजत नाहींत. आणि याच

कारणामुळें लोकांच्या मनास चमत्कृति वाटण्याजोग्या कल्पना त्यांजकडून तितक्या चांगल्या होत नाहींत. पंडितपणा ह्याच गुणामुळें वामनपंडिताविषयीं आह्मी वरील कल्पना केल्या आहेत असें नाहीं; तर याबद्दल त्याच्या ग्रंथांतही कांहीं मासले दृष्टीस पडतात. त्यापैकीं सुदामचरित्राचा मासला पुढें दाखविला आहे. त्यावरून जगापुढें आणावयाच्या साधुचरितांत अमंगल व बीभत्स कसें लिहावें, ह्याचा विचार व्यवहारज्ञानाच्या अभावामुळेंच वामनपंडितास झाला नाहीं हें उघड आहे.

दुसरें.—वामनानें आपलें सर्व आयुष्य संस्कृतांतील शास्त्राभ्यासांत घालविलें आणि शेवटीं विरक्तपथ स्वीकारिला. यामुळें काव्य चमत्कृति रसांचें आस्वादन करण्यास त्याजला संधीच मिळाला नसावा. असें वाटतें.

तिसरें.—पंडितास उपरति झाल्यानंतर त्यांनीं मराठी भाषेत कविता करावयास आरंभ केला. तेव्हां त्यांची बहुतेक सर्व कविता ईश्वरगुणवर्णन आणि अध्यात्मविद्या यांखेरीज दुसऱ्या विषयावर नाहींच. अर्थात् भक्ति आणि शांत या रसांनीं मात्र त्याचा मनःसमुद्र भरला होता असें दिसतें.

चवथें.—मनुष्यगुण किंवा इतिहास वर्णन करण्याचा वामनाचा हेतु मुळींच नव्हता. उलटें असें वर्णन करण्यांत वाणीचा खर्च करणें निष्फल होय असा त्याचा दृढग्रह होता. हें त्याच्या चरित्रांत आह्मी व्यक्त केलेंच आहे.

पांचवें.—शृंगारविरादि रसांचा विषय हाच कवितेचा खरा विषय आहे; परंतु वामनानें अशा विषयास तुच्छ मानिलें होतें.

सहावें.–मासला पहाण्यासारखी मराठी कवींची कविता वामनास पहावयास मिळाली नव्हती.

सातवें.–रचना करावयास फार कठिण; अशीं अक्षरगणांचीं वृत्तेंच वामनानें घेतलीं आहेत.

हीं व आणखी कांहीं कारणें वामनाची कवित्वशक्ति प्रकट होण्यास प्रतिकूल होतीं असें वाटतें.

आतां मनाची अप्रतिहत गति चालवून पाहिजे त्या रीतीनें उड्डाण करण्याजोगें, व नानाविध अलंकारपूरित वर्णन केलें तरी शोभण्याजोगें, ज्याचें महत्त्व आणि रूप आहे; अशा परमेश्वराच्या वर्णनाकडे मात्र वामनानें आपली वाणी बहुधा लाविली आहे. तेव्हां त्या वर्णनांत पाहिजे तो रस आणि पाहिजे तशी प्रौढी आणण्यास त्याला पुष्कळच सवड मिळाली. कवीला कल्पना करण्याची जी शक्ति आहे तीपेक्षांही या विषयाचा विस्तार किती मोठा व गहन आहे हें सांगावयासच नको. ह्मणून अशा प्रगल्भ, रम्य आणि उदात्त विषयाची जी वामनानें निवड करून घेतली ही त्याच्या कवितेस अत्यंत अनुकूल गोष्ट आहे.

ही वामनपंडिताच्या संबंधानें गोष्ट झाली. आतां मोरोपंताकडे पहा. तो कारकून होता यामुळें त्यास लाखों रुपयांच्या हिशेबांत आणापैची सुद्धां चूक राहूं देणें स्वभावतःच आवडत नव्हतें. त्या मानानें त्यानें आपलीं पद्यें ही तशींच तपासिलीं आहेत असें दिसतें. कारकून हिशेबी कामांत जसा, तसाच व्यवहारांतही दक्ष असतो. जनमनोरंजन आणि मानसरहस्य जाणणें ह्या गुणांचा त्यास साहजिक व्यासंग होतो. मनोरंजक आणि निर्दोष

कविता रचण्यास वरील गुणांची फार आवश्यकता असून, ते कारकून या संबंधानें मोरोपंतांत होते असें आह्मास वाटतें.

दुसरें.—देशभाषेंतील चांगल्या चांगल्या कवींच्या[१] कविता पंतांस वाचावयास सांपडल्या होत्या.

तिसरें.—भारत, भागवत, रामायण इत्यादि ग्रंथांवर व स्फुटविषयावरही पंतानें कविता केल्या आहेत. त्यांत इतिहाससंबंधानें अनेक राज्यांच्या विस्तृत कथा आल्या असल्यामुळें, शृंगारादि रसचमत्कृतीस पुष्कळ स्थान मिळालें आहे.

चौथें.—ईश्वरगुण वर्णन करण्याचा प्रधानहेतु तर पंतांचाही आहे; परंतु इतिहास वर्णावयाचाच नाहीं असा आग्रह नाहीं.

पांचवें.—बहुतकरून सोपें मात्र गणवृत्तच पंतानें घेतलें आहे.

हीं सर्व कारणें पंतांची कवित्वशक्ति उत्कर्षानें दाखविण्यास अनुकूल आहेत.

येणेंप्रमाणें उभय कवींला कवित्वशक्ति प्रकट करण्यास जीं स्वाभाविक अनुकूल प्रतिकूल कारणें दाखविलीं आहेत; तीं ग्रहण करून त्यांच्या कवित्वशक्तीच्या संबंधानें परस्परांची तुलना करून पाहूं.

दोन कवींची एकमेकांशीं तुलना करून पहाणें झाल्यास, दोघांनीं एकाच कथेवर किंवा विषयावर जीं जीं

---

१ वामनपंडित, एकनाथ, मुक्तेश्वर, श्रीधर, अमृतराय, रामदास ज्ञानदेव, मुकुंदराय इत्यादि पंताच्या सन्मणिमालेंतील सर्व कवी.

वर्णनें केलीं असतील, त्यांचीं परस्परांशीं तुलना करून पाहिली पाहिजे. आणि रसपरिपाकादि गुणांत त्या त्या रसविशेषाविषयींचीं उभयतांचीं वर्णनें एकमेकांशीं लावून पाहिलीं पाहिजेत.

सुदामचरित्र हें मोरोपंतानें आणि वामनपंडितानें ही वर्णिलें आहे. तें मोरोपंतानें दोनदा वर्णिलेलें पहाण्यांत आलें. त्यांतील कोणत्याही प्रकरणाशीं वामनानें रचिलेलें सुदामचरित्र ताडून पाहिलें तर, मोरोपंताची कवित्वशक्ति वामनापेक्षां फार अधिक होती हें स्पष्ट दिसून येतें.

वामनानें केलेल्या सुदामचरित्राविषयीं त्याच्या काव्यादि ग्रंथांचे गुणदोष दाखवितांना कांहीं विवेचन केलें आहे. त्यावरून तें चरित्र काव्यदृष्टीनें व ग्रंथदृष्टीनें ही फार दोषयुक्त आहे हें सिद्ध झालेंच आहे. तथापि पंतांच्या कवितेशीं तुलना करण्याकरितां त्यांचे कांहीं वेंचे येथें दाखल करितों.

सुदाम्याच्या शरीराचें किती बीभत्स वर्णन केलें आहे पहा:—

" शिश्नीं बालतृणांकुरें पसरिलीं जाती न आच्छादिलीं ।
" कौपीनांबर छिद्रतोन्मुख सदा निर्लज्ज संपादिलीं ॥
" कांखे पुष्कळ दोंभुजीं अणिकही संपूर्ण विस्तारलीं ।
"नाहीं नापिक नापिका ह्मणुनियां स्वस्वस्थळीं थारलीं॥९॥
" दाढी-मिशा-बाबरभूत ज्याच्या ।
" अश्लाघ्य तेणें मुखपंक ज्याचा ॥
" दिसो न येती समजा मनीं रे ।
" सळे पळे देखुनि कामिनी रे ॥ १० ॥

" नासा-पुटीं तों भरणी जयांची ।
" अन्यत्र नाहीं गणना तयांची ॥
" ज्या मस्तकींच्या कबरीभरानें ।
" सभोंवतीं दंग भुजंग-रानें ॥ ११ ॥

सुदाम्याची स्त्री सुशीला पतिव्रता असतां तिच्या भाषणांत दुर्वृत्तता व कठोरता पंडितानें दाखविली आहे.

" कांता सती होउनियां जयाची ।
" संतोषवार्ता न करी जयाची ॥ १२ ॥"
" दुर्गंधि ती कधिंचही न चुके मुखाची ।
" शय्यासनीं किमपि गोष्टि नसे सुखाची ॥
" तांबूलहीन-वदना-धर-पान-काळीं ।
" स्वप्नीं परंतु हि कधीं न पडे सुकाळीं ॥ १७॥ "
" परम शुष्क तुझ्या अधरासि या ।
" रसविहीन अपेक्षित कासया ॥
" जालिया वमन ही न मिळे कीं ।
" तूज तें क्रमुक फोडि फळें कीं ॥ १८ ॥"
" कोण सौख्य ह्मणवूनि क्रमावें ।
" जें परस्पर मिळोनि रमावें ॥
" स्नेहशून्य वरि भार जटांचे ।
" व्यर्थ हे वरुनि पाय भटांचे ॥ १९ ॥ "

इत्यादि.

हें सुदाम्याचें भाषण पहाः—

" सुदामा बोले कीं जरि वदसि जा तूं मज सती ।
" अहो. तेथें गेल्या सकळजन देखोनि हंसती ॥

" तयीं चित्तीं दुःखें परम उपजेती न धरवे ।
" क्षमा पाहों जातां तदुपरि हि आज्ञा न करवे॥२४॥"
" परधन परदारा सर्व-दोषापहारी ।
" अनुदिन प्रिय-कांता-काम-संगीं विहारी ॥
" किमपि हि न करी जो सज्जनासी प्रवृत्ती ।
" अति कठिण घडेना साधु-निंदा निवृत्ती ॥२७॥"
" देखतां ऋषि तयासि न पूजी ।
" वाटतो द्विज तयास रिपू जी ॥
" भोंवयी करुनि वक्र पहातो ।
" मित्र भिक्षुक अमान्य अहा तो ॥ २८ ॥"
" न तो हालवी मस्तकातें कदापी ।
" दुरूनीच तो शुष्क-शब्देंचि दापी ॥
" तयीं बोबडी ते वळे भिक्षुकाची ।
" न ते गोष्टिही गोड बोले फुकाची ॥ २९ ॥
" अलक्ष्मीसलक्ष्मीस तो वैरभाव ।
" स्त्रियांचाच नैसर्गिकी तो स्वभाव ॥
" म्हणूनीच शत्रुत्व या संततीतें ।
" विचारूनि पाहें सती तूं मतीतें ॥ ३० ॥

याप्रमाणें सुदाम्याचें भाषण स्वभावतःच अप्रयोजक दिसत असून, तें भगवान् श्रीकृष्णाच्या भेटीविषयीं विचार चालला असतां, ज्याची भेट घ्यावयाची त्याच्या ऐश्वर्यास व आपल्या दारिद्र्यास स्मरून सुदाम्यानें केलें आहे. हें मनांत आलें ह्मणजे सुदाम्याचा केवढा हा प्रमाद असें वाटल्यावांचून राहत नाहीं.

सुदामा यद्यपि दरिद्री होता, तथापि तो सत्वगुण विशिष्ट मोठा भगवन्निष्ठ साधु होता. तो आत्मज्ञानी असून भगवान् श्रीकृष्ण ह्याचा परमभक्त होता. परदोषोच्चार किंवा परनिंदा हीं स्वप्नांत देखील ज्याला ठाऊक नव्हतीं; त्यानें यथेच्छ दोषोद्घाटन करणें ही अप्रयोजकता व श्रीकृष्णदर्शनाची गोष्ट त्याच्या पुढें आल्याबरोबर त्यानें प्रेमानें तन्मय होऊन जावयाचें तें एकीकडे राहून, धनाढ्य लोकांचे दुर्गुण वर्णन करण्यास आरंभ करणें, अर्थात् श्रीकृष्ण धनाढ्य त्यासही ती गोष्ट लागू झाली. त्या योगें झालेला मोठा प्रमाद फार स्पष्ट होतो.

आतां तत्त्वतः हा अप्रयोजकपणा व प्रमाद सुदाम्याचा नसून तो आमच्या पंडितांचा आहे, हें थोडासा विचार केला ह्मणजे लक्ष्यांत येतें. साधुचरितांत साधुकवींनीं अशा प्रकारें दोष केले तर, त्यापासून एकंदर भाषाग्रंथांस दूषण लागण्याचा संभव आहे. यास्तव पद्यरचना अथवा काव्यरचना या संबंधानें जरी निर्दोषता कमी असली तरी चिंता नाहीं; परंतु ग्रंथरचनेंतील शुद्धतेकडेस ग्रंथकारानें विशेष लक्ष्य पुरविलें पाहिजे.

एकादें नाटक रचितांना पूर्वापर संबंध, संविधानकपात्रांच्या योग्यतेप्रमाणें त्यांचें भाषण इत्यादि गोष्टींकडे जसें अवश्य लक्ष्य दिलेंच पाहिजे, तसें हरएक ग्रंथ रचितांना त्याच्या महत्त्वाप्रमाणें उचितार्थता अवश्य राखिलीच पाहिजे.

संपत्तिमान् गृहस्थभिक्षुकांचा त्रास व हेलना करितात हें पंडितानें सुदाम्याच्या भाषणांत जाणविलें; याव-

रून एक तर पंडितास असा कोठें प्रसंग घडला असावा, अथवा एकाद्या भिक्षुकानें गमतीनें असा मजकूर पंडितास सांगितलेला, किंवा कविता करिते समयीं त्यास स्मरला असावा असें वाटतें. सुदाम्याच्या तोंडांत हें भाषण घातल्यानें जे दोष होतात ते आह्मी वर दाखविले आहेत; परंतु स्वभावोक्तीवर पंडितांची प्रीति होती त्याप्रमाणें ती एथें दिसते, हा गुण मानिला पाहिजे.

वामनाच्या साऱ्या सुदामचरित्रांत स्वभावोक्ति हा अलंकार सर्वत्र चांगला साधला आहे. याशिवाय आणखीही गुणदोष त्यांत सांपडतात; परंतु ते सर्व विस्तारभयास्तव एथें देत नाहीं.

मोरोपंताचीं दोन सुदामचरित्रें आढळलीं (१) बृहद्दशमांतील अध्याय ८० । ८१ गीति छंद. आणि (२) पृथुकोपाख्यान साकी छंद.

मोरोपंतानें प्रथम गीतिछंदोबद्ध सुदामचरित्र गाऊन नंतर तें साकीछंदोबद्ध गाइलें आहे. असें दिसतें.

" वाणी पवित्र करावयास्तव पृथुकोपाख्यान सुखें,
" लेशमात्र वर्णिलें पुनरपि मयुरेश्वरें स्वमुखें ८७"

पृथुकोपाख्यान.

मोरोपंताच्या पृथुकोपाख्यानांत पहा, किंवा बृहद्दशमांतील सुदामचरित्रांत पहा, काव्याचें लावण्य सारखीच झकाकी मारित आहे. ग्रंथसंबंधानें पाहिलें तर या चरित्रांत वर्णनीय सुदामा व त्याची स्त्री हें साधुदांपत्य मुख्य होय. ग्रंथारंभींच वर्णनीय दांपत्याचें यथातथ्य वर्णन असून, पतिव्रतेच्या भाषणांत मार्दव, माधुर्य शाली-

नता इत्यादि गुण आणि सुदाम्याच्या स्वभावांत निस्पृहता, उदासीनता, भगवन्निष्ठा हे गुण चांगले दाखविले आहेत. वर्णनीय वस्तूच्या स्वभावविरुद्ध, विसंगत किंवा अप्रयोजक अशा वर्णनानें झालेला दोष, पंतांच्या दोन्ही प्रकरणांत कोठेंही आढळत नाहीं. तेव्हां ग्रंथसंबंधानें हीं प्रकरणें निर्दोष व स्तुत्यर्ह आहेत, यांत कांहीं संशय नाहीं.

आतां कवितासंबंधानें पहातां, निर्दोष शब्दार्थीनीं, अभियुक्त विशेषणांनीं, सुंदर अलंकारांनीं आणि नियमित यमकांनीं पंतांचीही ही कविता रसानें ओतप्रोत भरलेलीच दिसते.

हें सुदाम्याच्या शरीराचें व दारिद्र्याचें कसें खुबीदार वर्णन केलें आहे पहा:—

शुष्करसा जसि सरिता तैसी गत-काम-कोप-विप्र-तनू ।
दुष्कर साध्वी करि तप तत्तनु न स्वार्थ लोपवी प्रतनू ॥६॥
दंड उदंडचि साहे जैसें तद्वपु तसेंचि तद्वसन ।
व्यसन श्रीशध्यानीं न स्फुरवी क्लेश तें सदभ्यसन ॥ ७ ॥
हतरुचि-वसनें मलिनें कलिनें अस्पष्ट साधु लोक मळें ।
कीं जेंवि मुकुरबिंबें कीं शैवालेंहि झांकिलीं कमळें ॥ ८ ॥

हें सुदामस्त्रीचें अतिनम्र भाषण पहाः—

अयि विद्वन्मुकुटमणे स्वामी तुमचा सखा रमावर कीं ।
नरकीं न पडे पापी यन्नामें सदय तो नतावरकीं ॥ ११ ॥
अजि त्या ब्रह्मण्यातें करुणावरुणालया शरण्यातें ।
त्यजिति न.सरा जसे बक सेवक मृग कल्पतर्वरण्यातें॥ १२॥

त्याच्या तुह्मीच गातां प्रेमें नेमें सदा चरित्रास ।
कीं त्रास हरि भवाचा भेटा जी एकदा स्वमित्रास ॥१३॥
डोळेभरि अवलोका लोकाधारा तया महाभागा ।
आगारा श्रीच्या मी स्वामी ह्मणत्यें पहावया भागा ॥१४॥
दीनकुटुंबप्राणत्राण द्रव्याविणें कर्में होय ।
तो यक्षपेश वित्तें वित्तें देईल घन जसें तोय ॥ १५ ॥
त्यासम तोचि उदार स्वात्मार्पण ही हरी करी राजे ।
या जे भूवरि दाते तेहि उणे अर्पिते शरीरा जे ॥ १६ ॥
भजकां कामित जो दे तो देव द्वारकापुरीं आहे ।
लोक सकाम अकाम हि महित गुणा त्याचिया पदा पाहे॥ १७
जो मेघ कूप पल्वल वापी कासार शत महासरिता ।
भरि तारका तयाचा कां राहे चातकाख्य दास रिता॥१८॥
दीनाचा बंधु प्रभु विश्वात्मा त्या मुखें असें बोधी ।
तो धीरमणि पहावा भावाची दर्शनोत्सुका हो धी ॥१९॥

त्यावर हें सुदाम्याचें भाषण पहाः—

विप्र ह्मणे बहु बरवें भेटेल सखा महेंद्रनीलाभ ।
स्त्रीला भव्यचि सुचलें याहुनि दुसरा नसे जनीं लाभ॥२०॥
काय उपायन आहे आणी द्याया सख्यास कल्याणी ।
पाणी रिक्त नसावा स्मृतिकारांची असी असे वाणी॥२१॥
आपुलिया यदुवीरा वीरा द्यायास काय देतीस ।
नेती सप्रेम सखे भेटि सख्याला असें वदे तीस ॥ २२ ॥

पृथुकोपाख्यानांतहीः—साकी छंद.

" ते एकदा पतीच्या पाशीं बहु भीत भीत गेली ।
" अवाङ्मुखी कंपिततनु साध्वी कर जोडुनियां ठेली ॥
" भयगद्गदकंठी ते साध्वी ह्मणे पतीतें स्वामी ।
" श्रीपति तो स्वसखा हें कथितां नित्य तुह्मी निजशर्मी॥
" भेटाया त्या दीनबंधुला द्वारावतिला जावें ।
" गानां ध्यानां परिमखयातें नेत्रें अवलोकावें ॥
" भजकाला आत्माही देतो ऐसा उदार तो कीं ।
" दीनजनाचा कल्पवृक्षही कीर्ति तयाची लोकीं ॥
" मोक्षहि देतो तेथें देणें अर्थकाम हे काय ।
" यास्तव जाउनि पहा कुटुंब-त्राणार्थे यदुराय ॥
" देइल कांहीं दयाळु तो प्रभु रक्षाया हीं बाळें ।
" तुह्माला स्वसख्याचें दर्शन घडेल बहुता काळें ॥

हें स्त्रीचें भाषण श्रवण करून सुदाम्यानें आपले हृदयोद्गार प्रकट केले आहेत ते त्याच्या स्वभावास किती शोभतात पहाः—

" स्त्रीस ह्मणे आनंदें तो द्विज जातों सखा पहाया ।
" तच्चरणावरि निजतनुमनही पुष्पांजळी वहाया ॥
" आहे कांहीं गृहीं उपायन दे हो सत्वर आणी ।
" रिक्तपाणिनें न विलोकावा गुरु ऐसी स्मृतिवाणी ॥

पृथुकोपाख्यान.

सुदामचरित्रांतील या पुढचा कथाभागही मोरोपंतानें फार मनोरम वर्णिला आहे. पंताच्या काव्यांत प्रसाद

फार कमी आहे, असा पुष्कळ लोकांचा अभिप्राय आहे. व

"प्रसादवत्प्रसिद्धार्थमिंदोरिंदीवरद्युति ।
"लक्ष्म लक्ष्मीं तनोतीति प्रतीतिसुभगं वचः ॥"

काव्यादर्श.

यां लक्षणाप्रमाणें प्राकृतभाषेंतील प्रसिद्धार्थवाचक पदें पंतांच्या काव्यांत कमी असून संस्कृताचा भरणा फार आहे ही गोष्टही खरीच आहे.

मोरोपंतानें स्वतांच्या काव्यरचनेच्या संबंधानें ह्मटलें आहे कीं,

गीर्वाणशब्द पुष्कळ जनपदभाषाचि देखतां थोडी ।
यास्तव गुणज्ञलोकीं घ्यावी याची हळू हळू गोडी ॥
प्राकृत-संस्कृत-मिश्रित यास्तव कोणी ह्मणेल ही कथा ।
भवशीतभीतिभीत-स्वांताला दाविला बरा पंथा ॥

स्फुट.

यावरून प्रसिद्धार्थवाचक प्राकृतपदें काव्यांत घालावयाचीं नाहींत, असा पंतांचा हेतु नव्हता. देशभाषेंत मूळचे शब्द थोडे व संस्कृत शब्द पुष्कळ आहेत. यास्तव पाहिजे तसें सरस वर्णन करण्याकरितां आह्मी मोकळ्या मनानें गीर्वाणशब्दांचें मिश्रण करित आहों. असा भावार्थ मोरोपंतानें दाखविला आहे.

अर्थात् प्राकृत प्रसिद्धार्थदर्शक पदें मिळतील तशीं धुंडून काढून कवितेंत घालावीं; मग त्यामुळें कवितेची

---

१ "प्रसिद्धार्थपदत्वं यद् स प्रसादो निगद्यते"

प्रतापरुद्र.

प्रौढी, गौरव, सौंदर्य इत्यादि गुण कमी झाले तरी हरकत नाहीं; एथपर्यंतच्या सुगमतेविषयीं पंतानें आपल्या काव्यांत औदार्य प्रकट केलें नाहीं. या कारणानें जे लोक पुळपुळीत वाक्यांस कवितेंत गणितात, त्यांजला मोरोपंताची कविता प्रसादहीन दिसत असावी असें वाटतें. वस्तुत: पंतानें आपल्या प्राकृत काव्यांत संस्कृतांतील अति मनोहर शब्दांचें मिश्रण करून, प्राकृतभाषेस व काव्यास मोठीच प्रौढी आणिली आहे. व कोठें कोठें उत्तम प्रसादही साधला आहे.

वामनाचें सुदामचरित्र अक्षरगणांच्या कठिणवृत्तांत रचिलें आहे, यामुळें त्यांत सहजच अधिक दोष आले असतील, आणि मोरोपंताचीं सुदामचरित्रें दोन्ही मात्रागणांच्या सोप्या छंदांत रचिलीं आहेत या कारणानें तीं सहज अधिक निर्दोष असतील, अशी शंका घेण्यास तर जागा नाहींच; परंतु कोणी ती मनांत आणिली तरी तिचेंही दूरीकरण व्हावें या हेतूनें असें सांगतों कीं, आह्मी काढिलेले गुणदोष केवळ पद्यरचनेंतील च्युतसंस्कृति इत्यादि कारणावर अवलंबून नाहींत. ते केवळ अर्थाच्या व ग्रंथरचनेच्या कारणांनीं दाखविले आहेत. कोणत्याही वृत्तांत काव्य लिहिलें तरी वृत्ताच्या काठिण्यामुळें वर दाखविलेले दोष कदापि घडावयाचे नाहींत. यास्तव मुळींच वरील शंका रहात नाहीं.

मोरोपंतानें अक्षरगणांच्या वृत्तांनीं ही बरीच कविता केली आहे. त्यांतील अंबरीषनामक राजाचें चरित्र पहाण्यांत आलें. त्यावरून श्लोकांत देखील कविता रचण्याची उत्तमच शक्ति मोरोपंतांत होती असें दिसतें.

"भक्तीनें वश सत्पतीस करिती साध्वी मला सज्जन
"प्रेमांभोनिधि संत त्यांत करितों मी मीनसा मज्जन ।
"त्याला मीच मलाहि तेच रुचले ते हंस मी मानस
"श्री त्यांहीच मला मदीय भजनें त्यांचें सुखी मानस ॥
"सर्वस्व मी सज्जनांचें माझें सर्वस्व सज्जन
"पावेन मी न पावेल कष्टीं मज्जन मज्जन ।
"सुदामीं न उदासीन प्राकृत प्रभुही मनी
"कसा दास प्रसादास माझा पात्र नव्हे जनीं" ॥

हें अंबरीषाचें दुर्वासाशीं शेवटीं झालेलें भाषण, अंबरीषाची साधुता किती स्पष्ट करित आहे !!

"राजा त्या मुनिला ह्मणे मज जडा देतां तुह्मी थोरवी
"पादें आपुलिया जसा विधुसि कीं रत्नासि देतो रवी ।
"केला हा निजदास वासवनुता सत्कीर्तिला भाजन
"स्वामी युष्मदुपासनेच्छु कवणा पावे न लाभा जन ॥
"तुह्मी प्रभु जगद्गुरु स्वपददासमंदार हा
"जन स्तविल काय या श्रुति ह्मणेल मंदा रहा ।
"ह्मणोनि तुमचा मला सुमहिमा न वाखाणवे
"प्रकूपखनका कसा जलनिधी नवा खाणवे" ॥

वरील कवितेंत पदलालित्य, प्रौढी, अर्थगौरव आणि उद्गार किती चांगले साधले आहेत !! चंद्रास सूर्यकिरणांनीं प्रकाश मिळतो ही गोष्ट वरील कवितेंत जाणविली आहे यावरून मोरोपंताची बहुश्रुतता स्पष्ट होत आहे.

वर सुदामचरित्राचा जो भाग उतरून घेतला आहे, त्यावरून रसपरिपाकादि गुणांत पंडितांपेक्षां पंतांची

निपुणता अधिक दिसून येते. सुदाम्याची व त्याच्या कुटुंबाची स्थिति, आणि त्या संबंधानें सुदामा आणि त्याची स्त्री ह्यांचें भाषण, हीं वर्णन करितांना मुख्यत्वें करुणरस प्रतीतीस आला पाहिजे. व त्यांत भक्तिरसाचें कांही मिश्रण झालें तरी वर्णनीय विषयास तें अधिक अनुकूलच होईल. परंतु अशा वर्णनप्रसंगीं हास्य किंवा बीभत्स रस व प्रमादादि मनोविकार असावे अशी कल्पना तरी होईल काय ? कधीं होणार नाहीं. असें असतां वामनाच्या सुदामचरित्राच्या वरील उताऱ्यांत हास्य आणि बीभत्स हे रस स्पष्ट भरले आहेत. याशिवाय प्रमादादि मनोविकार ही प्रतीतीस येतात. तसें मोरोपंताचें नाहीं. त्याच्या वर्णनांत आरंभापासून शुद्ध करुणरस असून मध्यें मध्यें भक्तिरसाची छाया दिसत आहे. तिच्या योगानें दुधांत साखर घातल्याप्रमाणें करुणरसास फारच गोडी आली आहे.

एकादा इतिहास किंवा कथानक ग्रंथांत जुळण्याची कुशलता वामनांत मोरोपंतासारखी नव्हती असें वाटतें. कवितात्मक पद्य रचावयास जी बुद्धिकुशलता लागते तीहून ग्रंथ रचना करावयास अधिक सूक्ष्म व्यापक व विस्तृत बुद्धिचातुर्य असावें लागतें. वामनास काव्यात्मक पद्यें रचण्याची चांगली शक्ति होती; परंतु कोठें कोठें तीही असावी तशी उज्ज्वळ, उदात्त व मनोहर दिसत नाहीं. वामनानें अद्वैतशास्त्रविचारावर जे जे ग्रंथ लिहिले आहेत ते ते सर्व पूर्णत्वानें व निःसंदेह व्याख्येनें समाधानास प्रसवतात. व त्यांत जरी ठरीव कल्पनांचीच वारंवार आवृत्ति झाली आहे, तरी तत्त्वमीमांसा व शांत-

रस यांच्या योगानें तशा ग्राहकास ते कंटाळवाणें होत नाहींत. वामनानें विराटपर्व, सुदामचरित्र, मुकुंदविलास आदिकरून इतिहासरूप जीं प्रकरणें रचिलीं आहेत, त्यांत ग्रंथदृष्टीनें व काव्यदृष्टीनें ही, श्रांत झालेल्या मानसास प्रफुल्ल करून उत्तेजन आणि आनंद देण्याची शक्ति नाहीं. सुदामचरित्राच्या संबंधानें आह्मी दुसरीकडे बरेंच विवेचन केलें आहे त्यावरून आमच्या ह्मणण्याची सत्यता दिसून येईलच. आतां विराटपर्वाच्या संबंधानें विचार करूं.

महाभारताच्या पर्वांपैकीं वामनानें रचिलेलें विराटपर्व मात्र आमच्या पहाण्यांत आलें व त्यांतील शेवटीं लिहिलेल्याः—

" जालें पर्व विराट राट मणिरे उद्योग आतां पुढें ।
" ऐकाया मन सावधान करिजे जे खोल अंगीं गुढें ॥"

या पद्याच्या अर्थावरून त्यानें आणखी कितीएक पर्वांवरही कविता केल्या असतील, किंवा कविता कराव्या अशी त्याची उमेद होती इतकें सिद्ध होतें. विराटपर्वांखेरीज बाकीचीं वामनाचीं पर्वें आह्मास मिळालीं नाहींत व तीं उपलब्ध आहेत असें ऐकण्यांतही आलें नाहीं.

विराटपर्व हें स्वभावतः मोठें मनोवेधक आहे. त्यांत श्रृंगारवीरादि सर्व रसांचा समावेश आहे. तेव्हां वामनपंडित आणि मोरोपंत ह्यांची तुलना करावयास ह्या पर्वासारखें पर्वच यावयाचें नाहीं; असें जाणून या पर्वाच्या संबंधानें पंतपंडितांची आह्मी तुलना करितों.

ह्या लहानशा निबंधांत, पंतपंडितांच्या अति वि-

स्तृत, अपरिमित व सघन काव्योद्यान तरुव्रजांच्या सकल पुष्पांची मालिका मासल्याकरितां लोकांपुढें ठेविण्यास, गुंफितां येणें परमाशक्य. यास्तव त्यांतले कांहीं मासले गुणदोषांसह आह्मी दाखविले आहेत. त्याप्रमाणेंच विराटपर्वांतील कांहीं कविता-कुसुमें आह्मी लोकांपुढें ठेवितों.

विराटपर्वांतील कथा बहुतकरून सर्वत्र प्रसिद्ध आहे. शाळांतील क्रमिक पुस्तकांत उत्तरगोग्रहणकथेच्या आर्या घातल्या असून, नवनीतातही त्यांचे वेंचे घेतले या योगानें, आणि गांवोगांव फिरणाऱ्या नाटकांची अतिप्रवृत्ति झाल्यानें, ह्या कथेची लहान लहान मुलांस देखील उत्तम माहिती झाली आहे. यास्तव या पर्वांतील कथाभाग एथें सांगून विस्तार करण्याचें कारण दिसत नाहीं. उत्तरगोग्रहण ह्मणून जो वरील पर्वांत चमत्कारिक कथेचा भाग आहे, तो उभयतां पंतपंडित यांनीं कसकशा प्रकारें वर्णिला आहे हें पाहिलें ह्मणजे, स्थालीपुलाकन्यायानें सर्व पर्वांचा, किंबहुना उभयतांच्या सर्वच काव्याच्या गुणदोषांचा निर्णय ठरवितां येईल.

लावण्यवती चतुर कामिनी आपल्या सहज लीलेच्या नेत्रकटाक्षांनीं रसिक पुरुषास प्रेमानंदांत निमग्न करिते; मग ती जर सहेतुक कटाक्षक्षेप करील तर कोणाच्या हृदयास जिंकणार नाहीं बरें? मोरोपंताची स्वाभाविक वाणीच झोंकदार, प्रौढ आणि ओजोगुणविशिष्ट आहे. तिच्या सहज अवलोकनानेंच तीन मन गर्क होऊन जातें. तशांत विराटपर्वामध्यें पंतास बहार करावयास पुष्कळच स्थल मिळालें आहे, त्या योगानें त्यांतील भाषेंत

सालंकार कवितेचें लावण्य अधिक देदीप्यमान भासत आहे.

उत्तरगोग्रहणांत उत्तराचें, युद्धास जाण्याविषयीं उत्साहपूर्वक भाषण, बृहन्नडेचें कवचादि धारण, उत्तरेचें भाषण, भयंकर कौरवसैन्यास पाहून उत्तराचें घाबरणें, पळणें आणि बृहन्नडेनें त्यास धरून आणणें, कर्णदुर्योधनांनीं केलेली गुरुनिंदा व त्यावर कृपादिकांचें भाषण इत्यादि सर्वच भाग पंतांनीं फार मनोहर वर्णन केला आहे. हा कवितेचा रसपरिपाक इतका विशुद्ध व अविट उतरला आहे कीं, त्याचें पुनःपुनः ग्रहण केलें तरी तो कंटाळवाणा न होतां, अधिक आनंददायकच होत जातो असें आभास वाटतें. गोपाध्यक्षाचें उत्तराशीं भाषणः—

तो राजगृहीं जाउनि राजाच्या उत्तराख्य-तनयातें ।
नमुनि ह्मणे हो नेतो दुर्योधन घेनु करुनि अनयातें ॥ ४ ॥
गोधन षष्टिसहस्र व्रज ओस करुनि नेतसे कुटिल ।
लुटिल प्रजाहि जो गो-पीडक तो ब्राह्मणां न कां कुटिल॥५॥
कवची धन्वी खड्गी व्हा चित्तीं रामचंद्रहि असा ध्या ।
बैसा रथीं जयश्री गोविप्रावनपरांसि न असाध्या ॥ ६ ॥

हें उत्तराचें भाषण पहाः—

उत्तर ह्मणे असें जरि मी एकाकी लहान परि सवतें ।
यश जोडितोंचि असता सारथि तरि कथन मज न परिसवतें७
कर्णादिकांसि देता समरीं वैराटिकेसरी करिता ।
जिष्णुपुढें असुरजनीं कोणी वैरा टिके सरी करिता ॥ ८ ॥

मिळवा कोणी तरि हो
धैर्याचा मात्र उदधि सारथि जो।
कुरुभट समूह पाहुनि
मज जेविं हिमासि सुदधि-सार थिजो ॥१०॥
ऐसें बहुतचि बोले तो बालिश बोल बायकांमाजी।
चित्रपट कटकसें शिशु-भाषण येईल काय कामा जी॥११॥
उत्तर ह्मणे कुरुकटक न पशूंस यशास हि स्वसे नेतें।
अवकाश पळहि नाहीं कळवाया वृत्त हें स्वसेनेतें ॥१८॥

उत्तरेचें बृहन्नडेशीं भाषणः—

गोधन षष्टिसहस्र स्वपुरा नेताति हरुनि कौरव हो।
गौरव हो न बुधजनीं त्या मेल्याला अनंत रौरव हो॥२०॥
देता झाला पूर्वी तुज निजसारथ्य सव्यसाची हो।
सैरंध्रीची वाणी व्हाया गोवत्सभव्य साची हो॥ २१ ॥

हें ऐकून बृहन्नडेची जी स्थिति झाली ती पंतांनीं किती थोडक्यांत उत्तम वर्णिली आहे पहाः—

उठल्या उत्साहाच्या त्या शांतश्रीमदुदधिवरि लहरी।
धरितां हनु ननु ह्मणतां प्रणतांचें कां न सुदधि वरिल हरी२३
वैराटि ह्मणे नर्तन हो कीं वादन तथैव गायन हो।
सारथि हो या समयीं एकहि वश कौरवासि गाय न हो२७
ऐसें वदे कवच दे त्याश्रितकुशलावहास त्यायाला।
तद्धारणीं चुके तो कन्या पाहोनि हांसल्या याला॥२८॥
ज्याचें किरातरूपि-प्रभु-विकृतिगर्भ गाय नाक वच।
हांसे आपणहि ह्मणे ठावें मज काय गायना कवच ॥२९॥

लेवविलें राजसुतें जाणों त्याला कधीं न तो कवच ।
सच्चरित अप्रगल्भ हि हृदयहर जसें स्वधीन-तोकवच ॥३०॥
होउनि सिद्ध रथावरि चढतांचि सहोत्तरा तिच्या आली ।
ह्मणती बृहन्नडे तुज वीरश्री गौरवावया आली ॥ ३१ ॥
दिव्य-रुचिर-वस्त्रातें आण करायासि बाहुलें कटकें ।
जिंकुनि अरिचीं तूंही बहु शोभाया स्वबाहु ले कटकें॥३२॥
कुरुकटकासि पहातां तो उत्तर बाळ फार गडबडला ।
स्वपर-बळाबळ नेणुनि बालिश बहु बायकांत बडबडला ३९
बोले बृहन्नडे हें कुरुबल कल्पांतसिंधुसमें गमतें ।
ने रथ पुरांत माझें मननयनहि पाहतां बहु भ्रमतें ॥४०॥
दुर्योधन दुःशासन कर्ण कृप द्रोण भीष्म ज्या कटकीं ।
त्यांत मरेनचि शिरतां कांट्यावरि घालितां चिरे पट कीं४१
एकाकी मी रिपु बहु या ऐशा कीर्ति काय हो मरणीं ।
पश्चर्थें कवि करूं सर्व पुमर्थद-सुकाय-होम रणीं ॥४२॥
आज्ञा नसतां आलों रागें न भरेल काय हो तात ।
रोमांच घर्म कंप प्रकट व्यापूनि काय होतात ॥ ४३ ॥
पार्थ ह्मणे राजसुता आतां वदतोसि हें अहा काय ।
शय्येवरि न पडाया योग्य रणक्षिति वरीच हा काय॥४४॥
तेव्हां स्त्रियांत तैसें बोलुनि आतां असें कसें वदसी ।
एकहि बाण न सुटला नाहीं अद्यापि झळकला सदसी ४५
गोमुक्त्यर्थ न शिरतां धैर्यें या वीरनायकानीकीं ।
करिजेल हास्य आस्य प्रेक्षुनि नगरांत बायकांनीं कीं॥४६॥

---

१ सर्व संग्रहांत "सिंधुसें" असा पाठ आहे.

कज्जल कसें करूं जें सैरंध्रीकृत दुग्धासम स्तवन ।
सन्मन अनृता भीतें जेविं कुठारायुधा समस्त वन ॥५२॥
चाल उगाचि अपयशें न तुझें मुखचंद्रमंडळ मळावें ।
होतों बलाब्धि-पारद पारदतुल्य न तुवां डळमळावें ॥५४॥
ऐसें पार्थ वदे तों भिउनि कटक बागुलासि पोर पळे ।
शत्रुप्रताप-दावज्वालांनीं तो कुरंग होरपळे ॥ ५५ ॥
जाय पुरीप्रति जोडी अपकीर्ति सुकीर्ति हातिंची दवडी ।
मातेप्रति पोर जसें मुद्रा हारवुनि मेळवुनि[1] कवडी ॥ ६० ॥
सकला सकला विद्या श्रुतमात्रा[2] ज्यासि राहिली पाठ ।
अरिनीं कुसंगतीस्तव त्या तैशाचीहि पाहिली पाठ॥६२॥
वाटे पुढें पळे तो स्त्रीसंगविरक्तधी-कुमारमणी ।
पुत्रस्नेहें धांवे त्या मागें शंभुची उमा रमणी ॥ ६३ ॥
उत्तर ह्मणे नको गे पायां पडतों बृहन्नडे सोड ।
जोड दिली दुखवुं नको केवळ पितृकरतलस्थ हा फोड ७४
जों जों वैराटि रडे तों तों तो पार्थ सदय परि साचा ।
खळसा हांसे लोहा निंद्य नव्हे ग्रावभाव परिसाचा ॥७५॥

विराटपर्व.

अवयवांत व अलंकारादिकांत अस्ताव्यस्तपणा असून स्वभावतःच भोळवट अशी स्त्री निमुटपणें खालीं पाहून सोंवळ्यानें टांचा उडवीत जाऊं लागली तर, तिच्या लीला रसिकास आनंदजनक होतील काय? होणार

---

१ सर्व संग्रहांत "मेळवी" असा पाठ आहे; त्यापेक्षां वरील पाठ शुद्ध आहे. २ सर्व संग्रहांत "श्रुतमात्र" असा पाठ आहे; त्यापेक्षा वरील पाठ, छंदःशुद्धीस कारण असल्यामुळें शुद्ध आहे.

नाहींत. त्याप्रमाणें आमच्या पंडितांची वाणी मूळची साधी असून, इतिहास लिहिण्याच्या प्रसंगीं ती अस्ताव्यस्त होऊन गेली आहे. कोणत्या ठिकाणीं किती व कसें बोलावें, कोणतें वर्णन विस्तृत केलें असतां गोड होईल, कोणतें कंटाळवाणें होईल ! कोणाचा स्वभाव कसा दाखविला पाहिजे. ग्रंथांचें संग्रथन कसें केलें असतां तो लोकप्रिय होईल, इत्यादि गोष्टींचा विचार वामनानें केला नाहीं. किंवा त्याच्या बुद्धीच्या आटोक्यांत तो आला नाहीं. यामुळें त्याची कविता मनोहर झाली नाहीं. याशिवाय व्याकरणशुद्धि, वाक्यपूर्णता, अलंकारशुद्धि, छंदःशुद्धि इत्यादि गोष्टींकडेही त्यानें लक्ष्य दिलें नाहीं.

तथापि जसा मोरोपंतांत संक्षेपानें अर्थ कथन करण्याचा गुण आढळतो, तसा उक्तार्थाचें विस्तारानें प्रपंचन करण्याचा गुण कोठें कोठें वामनांतही दिसतो. वामनाच्या विराटपर्वांतील कांहीं मासला एथें देतों.

तूं राजपुत्र असतां नगरीं, परांनीं ।
नेले तुझे सकळ गोकुळ गोप रानीं ॥
होते तया रिपु विलंब न लाव राया ।
शत्रूयशास समयो बनला वराया ॥ ८९ ॥
हें वृत्त ऐकुनि नृपात्मज बाप[1]राणी ।
गेहांसि जाउनि वदे बहु गोप राणीं ॥

---

१ बाप-राणी-गेह ह्मणजे आईचें घर ही शब्दयोजना किती अशुद्ध व नीरस आहे !! याप्रमाणेंच द्वारकाविजयांतही "वर-बाप ही प्रतिगृहीं वसुदेव."

गोयुक्त सर्व हरिले कुरु दुर्मदांनीं ।
याकारणें मन अपेक्षित युद्धदानीं ॥ ९० ॥
झांकीन बाणीं जगती नभा जी ।
कीं एक पत्रें जग तीन भाजी ॥
ऐसी रणीं दाविन कूसरी कीं ।
जगांत मी पार्थचि दूसरा कीं ॥ ९८ ॥
कुंती जगीं कीं मम मावली हो ।
सत्पुत्र कीर्तींत न मावली हो ॥
एसें समस्तांस वदावयाचा ।
प्रसंग हा वीर्यमदा वयाचा ॥ ९९ ॥
मदकरि कळपाते एक जेवीं हरी तो ।
निजकर नख शस्त्रें त्याजला संहरीतो ॥
रिपुचमु सगळी ही त्या रिती येकलाही ।
करिन शरहुतांशें सर्वही येक लाही ॥ ४ ॥
बृहन्नळा अर्जुन संगतीसी ।
जाणे रथा वागवि त्या गतीसी ॥
सारथ्य कर्मीं करुनी भली ते ।
महारणीं दुर्धर नीभली ते ॥ ८ ॥
विज्ञापना निकट मानुनि आज योजी ।
हे हस्तें स्यंदन गुणीं उभयो जयोजी ॥
घेऊनियां अखिल तोष जना कराया ।
तूं सूत श्रेष्ठ जव मातलि नाकराया ॥ १६ ॥

---

१ छंदोभंग.

बृहन्नळा घेउनि राजकन्या ।
आली स्वबंधू सदनांत धन्या ॥
विचारिलें तीस विराटबाळें
कीं जाणसी सूतरितीस बाळे ॥ १८ ॥

माझें कार्मुक गांडिवामम रणीं बाणां वितें जेधवां ।
तें तूं पाहुनि भाविसी मज दुजा जो हृत्सखा माधवा ॥
आहे ते जरि कौरवी दळपती विख्यात ते मी न गे ।
लक्षा आणित सर्वबाणं अनळीं भाजू जसे मीन गे॥२१॥

त्यां सत्य पार्थहयरज्जुस वागवीलें ।
या हस्तकें परि बहू दिन त्यागवीलें ॥
आतां करीन रथ सज्जविधी नवा जी ।
वेगीं सशस्त्र रथ सुंदर आण वाजी ॥ २५ ॥

घेऊनि टोप कवचा करि भाव नाना ।
हा देह कीं मम असे नर अंगना ना ॥
या केवि मी करूं विभूषण तें कळेना ।
हा भाव ही मज तनूवर आकळेना ॥ २८ ॥
त्या अंगना सकळ पाहुनि हासती शा ।
जाणोनि पार्थ मग सिंधुसुतासतीशा ॥
ध्यावोनियां रथ यथामति साजवीला ।
लेवोनि टोप कवचा गुण वाजवीला ॥ २९ ॥
जातां वदे नृपसुता गुण उत्तमा जी ।

---

२ संस्कृत नियमाप्रमाणें संधि नाहीं. १ या श्लोकांतील भाषण पार्थास अगदी विशोभित दिसतें.

त्या बंधुवर्यगुरुतें मृगराज माजी ॥
भंगोनि कौरवदळांतिल नायकासी ।
आणा चिरें सरस कृत्रिम पुत्रिकासी ॥ ३२ ॥
तों ईकडे उत्तर नाटकेला ।
ह्मणे वृथा कीं रण आट केला ॥
हे पाहतां कौरवसिंधुवेळा ।
मूर्च्छा मला भेटत वेळवेळा ॥ २३ ॥
हरीच्या सुता तुल्य मी एक बाणें ।
वधीं शत्रुवृंदास निःशंक बाणें ॥
असें बोललासी वधूच्या समाजीं ।
करूनी तया दाखवी विक्रमा जी ॥ ३३ ॥
फिरेना जयावीण मी सर्वथा गा ।
उगा बोलुनी शीणशी कां वृथा गा ॥
स्वभावो तुला विक्रमाचा न ठावा ।
तरी घेतला येवढा कां उठावा ॥ ३४ ॥
रथाखालतें टाकुनीयां दळाला ।
पळाला अशा भूपतीच्या मुलाला ॥
नृपा पाहुनी पार्थ धांवे गतीनें ।
करीच्या मुला जो हरी संगतीनें ॥ ३५ ॥
या वांचवी त्वरित नेउनि मत्पुराशी ।
अर्पीन साच तुज कंकणपुंजराशी ॥ ३७ ॥"

वाम० विराटपर्व.

आतां विराटपर्व आणि सुदामचरित्र या दोन प्रकर-

णांच्या संबंधानें वामनपंडित आणि मोरोपंत ह्यांची तुलना केली; येवढ्यावरून ग्रंथरचनाकौशल्य आणि कवित्वरचना ह्यांत वामनापेक्षां मोरोपंताची योग्यता अधिक दिसून आली. ग्रंथकार आणि कवि ह्यांची तुलना करितांना त्यांचे संपूर्ण ग्रंथ एकमेकांशीं लावून पाहून त्यावरून एकंदरींत त्यांची योग्यता काय आहे हें ठरविण्याची खटपट करून जें ठरतें तेंच स्थालीपुलाकन्यायें त्यांचे एकदोन ग्रंथच तपासून व ताडून पाहिले असतां समजण्याचा संभव आहे. त्याप्रमाणें वरील दोन ग्रंथांच्या संबंधानें उभय कवींविषयीं, ग्रंथरचना व कवित्वशक्ति या संबंधानें अनुमान झालेंच. तथापि वामनपंडिताचीं जीं उत्तम कविताप्रकरणें आहेत, त्यांतील एकाद्याशीं मोरोपंताच्या त्याच प्रकरणाची तुलना करून पाहिल्यावांचून उभय कवींच्या योग्यतेविषयीं निश्चय ठरवितां येत नाहीं.

कारण, महाकवीच्या ग्रंथभांडारांत कधीं कधीं नामसादृश्यामुळें अल्प कवींचे ग्रंथही कालगतीनें प्रविष्ट होऊन ते महाकवीच्याच नांवावर मोडूं लागतात. तसा कांहीं प्रकार सुदामचरित्र आणि विराटपर्व यांत वामनाच्या संबंधानें कदाचित् झाला असेल तर, त्यांतील अनेक दोषांचा आरोप वामनावर विनाकारण येऊन त्याची योग्यता कमी दिसण्याचा संभव आहे. वरील दोन प्रकरणें वामनपंडिताचीं नाहींत, तीं दुसऱ्या कोणी वामनानें रचिलीं असावीं, असें त्यांतील रचनेवरून कोठें कोठें भासतें; परंतु तसें निश्चयानें ह्मणण्या इतका फरक दिसत नसून, तसें ह्मणण्यास अन्य प्रमाणही नाहीं. या-

शिवाय एका कवीचे अनेक ग्रंथ असल्यास ते सर्वच एकसारखे उतरतात असाही नियम नाहीं. तथापि वामनास वाईटपणा आणण्यास वरील दोन प्रकरणें जितकीं कारण आहेत, तितकीं त्याचीं दुसरीं प्रकरणें दिसत नाहींत, यामुळें अन्य प्रकरणांच्या संबंधानें थोडासा विचार करूं.

भगवान् श्रीकृष्णानें भौमासुराचा वध करून सोळा सहस्र स्त्रिया द्वारकेस आणून वरिल्या. हा चमत्कार पहाण्याकरितां नारदमुनि द्वारकेस आले व त्यांनीं श्रीकृष्णाची अगाधमाया अवलोकन केली. हा कथाभाग वामनपंडितानें द्वारकाविजयनामक प्रकरणांत वर्णन केला असून, तीच कथा मोरोपंतानें बृहद्दशमाच्या ६९ व्या अध्यायांत वर्णिली आहे.

हीं उभय कवींचींही वर्णनें श्लोकवृत्तांत आहेत. ह्या वर्णनाच्या संबंधानें पंडित आणि पंत ह्यांची तुलना केली असतां पंडितांची कविता पंतांच्या कवितेपेक्षां सरस आहे असें दिसतें.

आपला उपास्य देव भगवान् श्रीकृष्ण यानें एक समयावच्छेदेंकरून सहस्रावधि रूपें धारण करून सोळा सहस्रस्त्रियांबरोबर विवाह केला, इत्यादि अद्भुत लीला मनांत आणून वामनानें त्या मोठ्या प्रेमोल्हासानें गाइल्या आहेत. वर्णनीय विषयाशीं ग्रंथकर्त्याचें तादात्म्य झालें असतां, वर्णनाचा पाक उत्तम उतरतो, व तो वाचकांसही आनंदजनक होतो. त्याप्रमाणें वामनाच्या द्वारकाविजयांतील कवितांचा रसपरिपाक चांगला उतरला आहे. सोपे शब्द, सरल अर्थ, लहान लहान पदें, मधुर वर्णर-

चना या योगानें नेहमीप्रमाणें वामनाचें हें प्रकरणही माधुर्य आणि प्रसाद यांचें सदन झालें आहे. प्रास, यमकें, स्वभावोक्ति इत्यादि अलंकारही यांत चांगले सांधले असून ग्रंथसंगतिही मनोहर आहे.

हें वामनाचें वर्णन मोरोपंताच्या वर्णनाशीं लावून पाहिलें तर, मोरोपंतानें एका श्लोकांत जी गोष्ट सांगितली आहे, तिचें वर्णन वामनानें एका सर्गांत छप्पन श्लोक करून केलें आहे. तेव्हां विस्तारानें वर्णन करण्याचा जो गुण वामनांत आहे तो मोरोपंतापेक्षां स्तुत्यर्ह आहे. दुसरें माधुर्य, प्रसाद हे गुण वामनांत मोरोपंतापेक्षां स्पष्ट अधिक असून, वामनाचें अंतःकरण जसें कवितेशीं सुलीनतेनें व भक्तीनें तादात्म्यभाव पावलेलें दिसतें; तसें मोरोपंताच्या कवितेवरून त्याचें अंतःकरण त्याच्या कवितेशीं एकीभाव पावलेलें दिसत नाहीं. वामनाच्या ह्या कवितेवरून त्याची भक्ति सोज्वळ व जागृत दिसते, ती खुबी पंतांच्या वर्णनांत नाहीं असें आझास वाटतें. क्वचित् च्युतसंस्कृति, असंगति हे दोष वामनाच्या वर्णनांत आहेत, त्या मानानें ते पंताच्या वर्णनांत नाहींत. तथापि ह्याच गोष्टीवरून कवीचा कवितेशीं झालेला तादात्म्यभाव चांगला व्यक्त होतो. प्रेमपुरःसर वर्णन करण्याच्या भरांत व झोकांत वामनानें क्वचित् स्थलीं व्याकरणाकडे किंवा संगतीकडे लक्ष्य दिलें नाहीं, यामुळें तो दोषच गुणरूपानें त्याच्या या काव्यास शोभा देत आहे.

पंताच्या रचनेवरून त्यानें केवळ कीर्ति संपादनार्थ काव्य करण्यांत कुशलता खर्च केली आहे. यामुळें ठाक-

ठिकीवर त्याची सूक्ष्म दृष्टि फिरली असावी. कसाही विद्वान् असो, कसाही कुशल असो, मोठा कवि असो, वर्णनीय विषयाशीं तो मनानें ऐक्य पावून मिळून जाणार नाहीं तर त्याचा ग्रंथ रसभरित होणार नाहीं. तसा प्रकार वरील वर्णनाच्या संबंधानें पंताच्या कवितेचा झाला आहे.

आतां इतकें मात्र खरें आहे कीं, पंताच्या कवितेची झोकदार भाषा, मोठमोठालीं समासपदें, प्रौढी, वर्णनाची सुसंगति व एकसारखा प्रवाह, मनास आनंदानें पुष्ट करणारे शब्दालंकार व अर्थालंकार, थोड्या शब्दांत पुष्कळ अर्थ, सुशोभित इमारतीस कारागिरीनें जोडलेल्या सुंदर चिऱ्याप्रमाणें केलेली शब्दरचना इत्यादि पंताच्या कवितेचे सर्व साधारण गुण ह्याही प्रकरणांत तसेच चांगले उतरले आहेत. तथापि वर दाखविलेल्या कितीएक कारणांवरून व संस्कृत शब्दांचें मिश्रण फार झाल्यामुळें रुचिभिन्नत्वसंबंधानें पंताचें हें काव्य जितकें लोकमान्य होईल, त्यापेक्षां सुगम व मधुर ह्मणून वामनाचें वर्णन अधिक लोकप्रिय होईल यांत संशय नाहीं.

या कवितासंबंधानें उभय कवींच्या ग्रंथांचे उतारे एथें दिले असतां ग्रंथविस्तार फार होईल यास्तव ते दिले नाहींत.

वामनपंडित आणि मोरोपंत ह्यांची तुलना करितांना आमच्या दृष्टीनें जे गुणदोष दिसले, ते आह्मी वर दाखविले आहेत. त्यांवरून एकंदरींत वामनापेक्षां मोरोपंताच्या गुणाची अधिकता दिसते; परंतु सूक्ष्म विचार केला तर काव्यरचनेच्या व ग्रंथरचनेच्याही संबंधानें एकंदरींत वामनाची योग्यता मोरोपंतापेक्षां कमी

भरेल असें वाटत नाहीं. उभयतांनीं रचिलेल्या ग्रंथांतील पद्यसंख्येचें मान सरासरी सारखेंच आहे, तरी अतिकठिण अध्यात्मविचारावर पंडितानें फार मोठी व सुगम बाळबोध ग्रंथरचना केली, तशी त्या विषयावर पंतांची नसून पंडिताचें काव्य जरी पंताच्या काव्याच्या मानानें थोडें दिसत आहे तरी तें पंताच्या काव्यापेक्षां सुगम व गोड असल्यामुळें अधिक लोकप्रिय आहे. वामनाच्या काव्याची मधुरता व प्रसादवाणी इतकी मोहक आहे कीं, तिच्या योगानें महाकवि मोरोपंतही मोहित झाला. त्यानें वामनाच्या मधुर मोहक वाणीचें वर्णन थोडक्यांत उत्कृष्ट केलें आहे.

वाटे सूक्ति-श्रवणें मस्तक वाल्मीकिनेंहि डोलविला ।
प्रभुनें भुलवाया मन वामन हा वेणुमाचि बोलविला ॥

यांत पंतानें वामनाच्या वाणीची महती लोकोत्तर वर्णन केली आहे. व त्याच्या काव्यांतील कांहीं कांहीं स्थलेंही तशींच मनोहर आहेत, यांत संशय नाहीं. तसेंच ज्या आर्येकडून पंतानें पंडिताचें मोठें गौरव केलें तीच आर्या पंतानेंही चतुर कवि म्हणून मोठेंच गौरव करीत आहे, हें काव्यज्ञास सांगावयासच नको.

चमत्कारिक कल्पना प्रसवण्याची शक्ति हें कवितेचें जीवन आहे. त्या संबंधानें पंत आणि पंडित ह्यांची तुलना केली असतां असें दिसतें कीं, केकावलि, सन्मणिमाला, संशयरत्नमाला, आर्याकेका व अनेक साधूंचे व देवतांचे स्तव इत्यादि प्रकरणें पंतानें स्वतांच्या कल्पनेनें जशीं रचिलीं आहेत, तशीं वामनानें रचिलेलीं आ-

ढळत नाहींत. चित्सुधा, प्रियसुधा, तत्त्वमाला, कर्मतत्त्व, चरमगुरुमंजरी, गीतार्णव इत्यादि अनेक स्वतंत्र प्रकरणें वामनानेंही रचिलीं आहेत; परंतु त्या सर्वांत आत्मज्ञानाचा एकच विषय असल्यामुळें ठरींव आणि तत्त्वसिद्धतेच्या कल्पनांचीच आवृत्ति झाली आहे. तेव्हां चमत्कारिक कल्पना प्रसवण्याचें कारणच वामनास उत्पन्न झालें नाहीं. मोरोपंताच्या वर लिहिलेल्या ग्रंथांत ज्या कल्पना दिसतात त्या मोठ्या मनोवेधक आणि चित्तास चमत्कृतिजन्य आनंद देणाऱ्या आहेत यांत कांहीं संशय नाहीं.

वामनाच्या काव्यांतही कोठें कोठें चमत्कारिक कल्पनांचा मासला आढळतो. परंतु तो पंतासारखा उज्वल दिसत नाहीं. वामनाची अद्वैतशास्त्रावर स्वाभाविक प्रीति असून त्या शास्त्राचा काव्यकल्पनांशीं फारसा मेळ नसल्यामुळें, जरी वामनांत चमत्कारिक कल्पना प्रसवण्याची शक्ति होती तरी तिचा त्यानें काव्यांत हेतुपुरःसर उपयोग केला नाहीं असें वाटतें.

वामनपंडिताप्रमाणें भक्तीनें ईश्वरपदलीन होऊन अद्वैतविचारावर मोठमोठाले ग्रंथ लिहिणारा, अक्षरगणांच्या वृत्तांनीं सोपी, मधुर व पुष्कळ कविता रचणारा आणि निस्पृहतेनें केवळ ईश्वरपर वर्णन करणारा ग्रंथकार, कवि आणि साधु, त्याच्या मागें आजपर्यंत झाला नाहीं. वामनपंडितानें महाराष्ट्रभाषेवर व लोकांवर फार उपकार केले आहेत. देशांत अशा प्रकारचे लोक उत्पन्न करून त्यांच्या हस्तें परमेश्वर, लोकांचें ऊर्जित करित असतो, वामनपंडिताप्रमाणें विद्वान्, उद्योगी,

निस्पृह साधु आणि कवी आमच्या भरतखंडांत जागो-जागीं उत्पन्न व्हावे, आणि त्यांच्या हस्तें देशाची उन्नति व्हावी असें करण्याविषयीं आह्मी अनन्यभावें परमेश्वराची प्रार्थना करितों व प्रसाद मागतों.

गीति.

गगनसम-ब्रह्मातें स्पर्शुनि सानंद लीन मन केलें ॥
वामन असून यानें योगानें सर्व विश्व आक्रमिलें ॥ १ ॥
सरसा वामनवाणी त्यावरि हरिगुणसुधेमधें मुरली ॥
दुग्धीं साकरशी प्रिय भासे प्रभुचीच वाजली मुरली ॥ २ ॥

मंदाक्रांता.

वाहोंलागो सुखकर मरुत्! मेघ वृष्टी करोत ।
वर्षाकाळीं! कण, रस, रसा देउ! सर्वे भरोत ॥
आनंदानें! नरपति करो राज्य लोकांस पाळो!
स्वान्तीं विद्यामृत पसरुनी सच्चिदानंद खेळो ॥ ३ ॥

समाप्त.

वामनपंडितानें ग्रंथ रचिले त्यांपैकीं जे आमच्या पहाण्यांत व ऐकण्यांत आले आहेत ते येणेंप्रमाणें:—

१ अनुभूतिलेश.
२ अपरोक्षानुभूति.
३ अर्जुनभाग्य.
४ अहल्योद्धार.
५ आत्मतत्त्व.
६ उखळबंधन.
७ उपदेशमाला.
८ उपादान.
९ करुणाष्टक.
१० कर्मतत्त्व.
११ कात्यायनीव्रत. (श्लोक)
१२ कात्यायनीव्रत. (सवाया)
१३ कृष्णजन्म.
१४ कंसवध.
१५ कंसवध. (सवाया)
१६ गंगालहरी.
१७ गजेंद्रमोक्ष.
१८ गीतार्णव.
१९ गुरुबोध.
२० गोपीगीत.
२१ गोपीवस्त्रहरण.
२२ गोरसहरण.
२३ चतुःश्लोकीभागवत.
२४ चरमगुरुमंजरी.
२५ चित्सुधा.
२६ जलक्रीडा.
२७ जलक्रीडा. (दुसरी)
२८ जीवतत्त्व.
२९ तत्त्वमाला.
३० दशावतार.
३१ दंपत्यचरित्र.
३२ द्वारकाविजय.
३३ ध्यानमाला.
३४ नवरसमाला.
३५ नामसुधा.
३६ निगमसार.
३७ नृहरिदर्पण.
३८ नौकाचरित्र.
३९ पार्थभाग्य.
४० प्रियसुधा.
४१ प्रेमसरी.
४२ फलतत्त्व.
४३ बालक्रीडा.
४४ बृहत्कथासार.
४५ ब्रह्मबोध.
४६ ब्रह्मस्तुति.
४७ भक्तिमहिमा.
४८ भगवद्गीता.

४९ भगवद्गीतासार.
५० भरतभाव.
५१ भर्तृहरीकृतशतकें.
५२ भागवतरामायण.
५३ भामाविलास.
५४ भीष्मयुद्ध.
५५ भीष्मशरपंजर.
५६ भूगोलवर्णन.
५७ भोक्तृतत्त्व.
५८ भोगतत्त्व
५९ मनाचे श्लोक.
६० मुकुंदविलास.
६१ मृत्तिकाभक्षण.
६२ यत्नतत्त्व.
६३ यथार्थदीपिका.
६४ यज्ञपत्न्याख्यान.
६५ योगवासिष्ठ.
६६ रसनास्तुति.
६७ राजयोग.
६८ राजयोग. (दुसरा)
६९ राधाभुजंग.
७० राधाविरह.
७१ राधाविलास.
७२ रामजन्म.
७३ रामस्तव.
७४ रासक्रीडा.
७५ रासमंडळ.
७६ रुक्मिणीपत्रिका.
७७ रुक्मिणीविलास.
७८ लघुचेंडूफळी.
७९ लोपामुद्रासंवाद.
८० वनसुधा.
८१ वामनचरित्र.
८२ विराटपर्व.
८३ विश्वामित्र
८४ विष्णुध्यान.
८५ वेणुसुधा.
८६ वेदतत्त्व.
८७ व्याधाख्यान.
८८ शबरीआख्यान.
८९ शुकाष्टक.
९० श्रुतिकल्पलता.
९१ समश्लोकी.
९२ सत्यभामाविनोद.
९३ सिद्धांतविजय.
९४ सिद्धांतसवाई.
९५ सीतास्वयंवर.
९६ सुदामचरित्र.
९७ „ (दुसरे.)
९८ स्थालीपाक.
९९ हनुमत्स्तव.
१०० हरिविलास.